# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक – १८

## सभावृत्तांत

दिनांक – २०.०६.२०१३ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे जून-२०१३ ची मा.महापालिका सभा सोमवार दि.२०.०६.२०१३ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर
२. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
३. मा.भालेकर अरुणा दिलीप
४. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
५. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
६. मा.सायकर अजय शंकरराव
७. मा.जाधव साधना रामदास
८. मा.जाधव राहुल गुलाब
९. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१०. मा.काळजे नितीन प्रताप
११. मा.विनया प्रदीप (आबा) तापकीर
१२. मा.जगदीश शेट्टी
१३. मा.बाबर शारदा प्रकाश
१४. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
१५. मा.उल्हास शेट्टी
१६. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
१७. मा.पवार संगीता शाम
१८. मा.उबाळे सुलभा रामभाऊ
१९. मा.बो-हाडे शुभांगी संजय
२०. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित
२१. मा.भारती फरांदे
२२. मा.आर.एस.कुमार

२३.मा.जावेद रमजान शेख
२४.मा.चारुशीला प्रभाकर कुटे
२५.मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
२६.मा.पांढरकर निलेश शंकरराव
२७.मा.तरस बाळासाहेब जयवंत
२८.मा.भोंडवे संगिता राजेंद्र
२९.मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
३०.मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३१.मा.शमीम पठाण (पठाणबाई)
३२.मा.†›.संदीप गुलाब चिंचवडे
३३.मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
३४.मा.अपर्णा निलेश डोके
३५.मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
३६.मा.प्रसाद शेट्टी
३७.मा.अविनाश (दादा) टेकावडे
३८.मा.काळभोर वैशाली जालिंदर
३९.मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
४०.मा.मासुळकर समीर मोरेश्वर
४१.मा.वाबळे संजय मल्हारराव
४२.मा.मडिगेरी वर्षा विलास
४३.मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
४४.मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडूरंग
४५. मा.सुपे आशा रविंद्र
४६.मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
४७. मा.गोफणे अनुराधा देविदास
४८. मा.गव्हाणे सुरेखा शंकर
४९. मा.महेशदादा किसन लांडगे
५०. मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
५१. मा.लोंढे शुभांगी संतोष
५२. मा.विश्वनाथ विठोबा लांडे
५३. मा.ननवरे जितेंद्र बाबा

५४. मा.सावळे सिमा रविंद्र
५५. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
५६. मा.पालांडे सुजाता सुनिल
५७. मा.बहल योगेश मंगलसेन
५८. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
५९. मा.कदम सदगुरु महादेव
६०. मा.गिता सुशील मंचरकर
६१. मा.छाया जगन्नाथ साबळे
६२. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास
६३. मा.चाबुकस्वार गौतम सुखदेव
६४. मा.आसवाणी सविता धनराज
६५. मा.वाघेरे सुनिता राजेश
६६. मा.आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम
६७. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
६८. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ
६९. मा.काळे विमल रमेश
७०. मा.पाडाळे निता विलास
७१. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
७२. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
७३. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
७४. मा.बारणे माया संतोष
७५. मा.ओव्हाळ शेखर अशोक
७६. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
७७. मा.कलाटे स्वाती मयुर
७८. मा.चौंधे आरती सुरेश
७९. मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
८०. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे
८१. मा.बोकड रामदास गेणभाऊ
८२. मा.जवळकर वैशाली राहुल
८३. मा.जगताप राजेंद्र गणपत
८४. मा.शितोळे शैलजा बाबुराव
८५. मा.जगताप नवनाथ दत्तु

८६. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
८७. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे
८८. मा.जम सोनाली पोपट
८९. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
९०. मा.काटे रोहितअप्पा सुदाम
९१. मा.गायकवाड संध्या सुरदास
९२. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
९३. मा.शेंडगे आशा सुखदेव
९४. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण
९५. मा.संजय केशवराव काटे
९६. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती
९७. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब
९८. मा.पाटील सुजित वसंत
९९. मा.बो-हाडे अरुण तुकाराम
१००. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.डॉ.श्रीकर परदेशी–आयुक्त,मा.प्रकाश कदम-अति.आयुक्त, मा.झुरे-सह आयुक्त,मा.गायकवाड,मा.मुंढे,मा.कुलकर्णी,मा.टेकाळे,मा.दुरगुडे-सहा.आयुक्त,मा.घाडगे-मुख्यलेखापरिक्षक,मा.गावडे-नगरसचिव,मा.कांबळे-प्र.शहरअभियंता,मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.चव्हाण,मा.काची-सहशहर अभियंता, मा.भोसले-मुख्यलेखापाल, मा.रॉय-प्र.आरोग्य वैद्य. अधिकारी, मा.भदाणे-उपसंचालक (नगररचना), मा.दुधेकर, मा.साळवी, मा.बरशेट्टी-कार्य. अभियंता,मा.कांबळे-प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर:-** उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.उल्हास शेट्टी** – मा.महापौर साहेब, सभागृहाला विनंती करतो, आमचे सहकारी नेते मा.श्रीरंग बारणे यांचे वडील कै.चंदू बारणे, आमचे सहकारी मित्र मा.अजित गव्हाणे यांचे वडील व माजी नगरसेवक कुस्तीपटू पवना सहकारी बँकेचे अध्यक्ष कै.दामोदर गव्हाणे, माजी नगरसेवक मा.किसन नेटके यांच्या पत्नी कै.गंगूबाई नेटके, माजी नगरसदस्य राजेंद्र काळे, राज साबळे, मोशी गावचे प्रथम सरपंच श्रीपती बोराटे, प्रभाकर धोंडीबा लोंढे, वर्तमान पत्रातील चिंटू मालिकेचे लेखक प्रभाकर वाडेकर, शिंदेवाडी जकात नाका, कात्रज, पुणे याठिकाणी पाण्याच्या जोरदार प्रवाहात वाहून गेलेल्या कै.सौ.विशाखा वाडेकर व त्यांची मुलगी संस्कृती तसेच उत्तराखंड येथे जलप्रलय येऊन मोठा अपघात झाला आहे. देशभरातून

गेलेल्या नागरीकांचे बळी गेले आहेत. या सर्वांना श्रद्धांजली वाहून ही सभा तहकूब करण्यात यावी.

**मा.जितेंद्र ननावरे** – मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.भाऊसाहेब भोईर** – मा.महापौर साहेब, छत्तिसगड येथे काँग्रेस पक्षाचे अनेक ज्येष्ठ कार्यकर्त्यांवर नक्षलवाद्यांनी हल्ला करुन त्यांची हत्या करण्यात आली. नक्षलवादाचे जबरदस्त आव्हान असून त्याचा प्रभाव वाढतो आहे. त्यांची वेगळ्या पद्धतीने हत्या झालेली आहे. अचानक हल्ला केला असल्यामुळे प्रचंड प्रमाणात संपूर्ण प्रमुख कार्यकर्त्यांना जीव गमवावा लागला आहे. या काँग्रेस कार्यकर्त्यांना सुद्धा श्रद्धांजली वाहण्यात यावी.

**मा.योगेश बहल –** मा.महापौर साहेब, मा.भाऊसाहेब भोईर यांनी सूचना केली त्याला अनुमोदन देतो. नक्षलवादाचा बिमोड करण्याच्या अनुषंगाने केंद्र शासन, राज्य शासनाने योग्य ती पाऊले उचलावीत.

**मा.महापौर** – सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली अर्पण करावी.

(उपस्थितांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली अर्पण केली.)

**मा.योगेश बहल** – मा.महापौर साहेब, आत्ताच सभागृहाने श्रद्धांजली अर्पण केली. दोन सन्मा.सदस्यांचे वडील, माजी नगरसेवक यांचे निधन झाले आहे. अजेंडा पाहीला तर महत्वाचे विषय आहेत. पेपरमध्ये त्याअनुषंगाने बातम्या आलेल्या आहेत. सत्ताधारी म्हणून काम करत असताना आमची इच्छा असते ठिक आहे जे काही असेल प्रशासनाने आपल्या पद्धतीने काम केलेले आहे. आम्हाला सुद्धा बाकी लोकांप्रमाणे परिपत्रक उशीरा मिळाले आहे. सर्वांना सखोल अभ्यास करता यावा. ब्ल्यू लाईन, रेड लाईनचे, क्रिडा समितीचे, भूमि आणि जिंदगी विभागाचे महत्वाचे विषय अजेंडावर आहेत. सर्वांना व्यवस्थित अभ्यास करायला वेळ मिळावा, एकंदरीत विकास करण्याच्या अनुषंगाने सर्वांची सूचना महत्वाची असणार आहे. म्हणून ही सभा दिनांक २७ जून २०१३ पर्यंत तहकूब करण्यात यावी अशी विनंती करतो.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन देते.

**मा.महापौर** – आजची सभा दि.२७/६/२०१३ पर्यंत दुपारी १.०० वा. पर्यंत तहकूब करण्यात येत आहे.

(मोहिनीताई विलास लांडे)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८

मा.महापालिका सभा

कार्यपत्रिका क्रमांक – १८

सभावृत्तांत

(दि.२०.०६.२०१३ ची तहकूब सभा)

दिनांक – २७.०६.२०१३ वेळ – दुपारी १.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे जून-२०१३ दि.२०.०६.१३ ची तहकूब मा.महापालिका सभा गुरुवार दि.२७.०६.२०१३ रोजी दुपारी १.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

1. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर
2. मा.राजू मिसाळ - उपमहापौर
3. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
4. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के.बापु.
5. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
6. मा.भालेकर अरुणा दिलीप
7. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
8. मा.थोरात वनिता एकनाथ
9. मा.सायकर अजय शंकरराव
10. मा.जाधव साधना रामदास
11. मा.जाधव राहुल गुलाब
12. मा.आल्हाट मंदा उत्तम
13. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
14. मा.काळजे नितीन प्रताप
15. मा.विनया प्रदीप (आबा) तापकीर
16. मा.जगदीश शेट्टी
17. मा.बाबर शारदा प्रकाश
18. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
19. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
20. मा.उल्हास शेट्टी

21. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
22. मा.पवार संगीता शाम
23. मा.उबाळे सुलभा रामभाऊ
24. मा.तानाजी विठ्ठल खाडे
25. मा.बो-हाडे शुभांगी संजय
26. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर
27. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित
28. मा.भारती फरांदे
29. मा.आर.एस.कुमार
30. मा.जावेद रमजान शेख
31. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
32. मा.पांढरकर निलेश शंकरराव
33. मा.नंदा विकास ताकवणे
34. मा.तरस बाळासाहेब जयवंत
35. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
36. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
37. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
38. मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
39. मा.लोंढे गणेश नारायण
40. मा.शमीम पठाण (पठाणबाई)
41. मा.†›.संदीप गुलाब चिंचवडे
42. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
43. मा.अपर्णा निलेश डोके
44. मा.अनंत सुभाष को-हाळे
45. मा.जयश्री वसंत गावडे
46. मा.पवार मनीषा काळूराम
47. मा.प्रसाद शेट्टी
48. मा.अविनाश (दादा) टेकावडे
49. मा.काळभोर वैशाली जालिंदर
50. सौ.साळुंके सविता सुरेश
51. मा.शेख अस्लम शैकत
52. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

53. मा.मासुळकर समीर मोरेश्वर
54. मा.वाबळे संजय मल्हारराव
55. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
56. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडूरंग
57. मा.सुपे आशा रविंद्र
58. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
59. मा.अजित दामोदर गव्हाणे
60. मा.गोफणे अनुराधा देविदास
61. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
62. मा.गव्हाणे सुरेखा शंकर
63. मा.महेशदादा किसन लांडगे
64. मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
65. मा.लोंढे शुभांगी संतोष
66. मा.विश्वनाथ विठोबा लांडे
67. मा.ननवरे जितेंद्र बाबा
68. मा.सावळे सिमा रविंद्र
69. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
70. मा.भोसले राहूल हनुमंतराव
71. मा.पालांडे सुजाता सुनिल
72. मा.बहल योगेश मंगलसेन
73. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
74. मा.छाया जगन्नाथ साबळे
75. मा.आसवाणी सविता धनराज
76. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)
77. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ
78. मा.काळे विमल रमेश
79. मा.पाडाळे निता विलास
80. मा.विनोद जयवंत नढे
81. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
82. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
83. मा.विमलताई सुरेश जगताप
84. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

***85.*** मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
***86.*** मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदु बारणे
***87.*** मा.ओव्हाळ शेखर अशोक
***88.*** मा.यमुनाताई रमणनाना पवार
***89.*** मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
***90.*** मा.कलाटे स्वाती मयुर
***91.*** मा.नांदगुडे विलास एकनाथ
***92.*** मा.चौंधे आरती सुरेश
***93.*** मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे
***94.*** मा.बोकड रामदास गेणभाऊ
***95.*** मा.जवळकर वैशाली राहुल
***96.*** मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
***97.*** मा.जगताप राजेंद्र गणपत
***98.*** मा.शितोळे शैलजा बाबुराव
***99.*** मा.जगताप नवनाथ दत्तु
***100.*** मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
***101.*** मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे
***102.*** मा.जम सोनाली पोपट
***103.*** मा.प्रशांत शितोळे
***104.*** मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
***105.*** मा.काटे रोहितअप्पा सुदाम
***106.*** मा.गायकवाड संध्या सुरदास
***107.*** मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
***108.*** मा.शेंडगे आशा सुखदेव
***109.*** मा.संजय केशवराव काटे
***110.*** मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती
***111.*** मा.पाटील सुजित वसंत
***112.*** मा.बो-हाडे अरुण तुकाराम
***113.*** मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.डॉ.श्रीकर परदेशी–आयुक्त, मा.गायकवाड, मा.कुलकर्णी, मा.दुरगुडे-सहा.आयुक्त, मा.घाडगे-मुख्यलेखापरिक्षक, मा.गावडे-नगरसचिव, मा.कांबळे-प्र.शहर अभियंता, मा.चव्हाण-सहशहर अभियंता, मा.भोसले-मुख्यलेखापाल, मा.रॉय-प्र.आरोग्य वैद्य. अधिकारी,

मा.भदाणे-उपसंचालक (नगररचना), मा.काची, मा.निकम, मा.साळवी-कार्य.अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौरः-** उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करून सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.संजय काटे** – मा.महापौर साहेब, उत्तराखंडमध्ये गौरीकुंड येथे हवाई दलाच्या हॅलिकॅप्टर अपघातात गणेश अहिरराव व शशिकांत पवार हे जवान शहिद झाले. मा.सौ.माया बारणे-नगरसदस्या यांचे सासरे व माजी विरोधी पक्षनेता संतोष बारणे यांचे वडील नागूभाऊ गतीराम बारणे, माजी विरोधी पक्षनेता मा.मच्छिंद्र तापकीर यांची बहिण गोदाबाई रखमाजी काळभोर, सौ.बारकाबाई हिरामण पठारे यांना श्रद्धांजली वाहून ही सभा अर्धा तासासाठी तहकूब करण्यात यावी ही विनंती.

**मा.जितेंद्र ननावरे** – मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर** – महापालिका सभा दुपारी १.३० वा.पर्यंत तहकूब करण्यात येत आहे.

(मोहिनीताई विलास लांडे)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक – १८

## सभावृत्तांत

(दि.२०.०६.२०१३,२७.०६.२०१३ (दु.१.०० वा.) ची तहकूब सभा)

दिनांक – २७.०६.२०१३ वेळ – दुपारी १.3० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे जून-२०१३ दि.२७.०६.१३ ***(**दु.१.००**)*** ची तहकूब मा.महापालिका सभा गुरुवार दि.२७.०६.२०१३ रोजी दुपारी १.3० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

1. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर
2. मा.राजू मिसाळ - उपमहापौर
3. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
4. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के.बापु.
5. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
6. मा.भालेकर अरुणा दिलीप
7. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
8. मा.थोरात वनिता एकनाथ
9. मा.सायकर अजय शंकरराव
10. मा.जाधव साधना रामदास
11. मा.जाधव राहुल गुलाब
12. मा.आल्हाट मंदा उत्तम
13. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
14. मा.काळजे नितीन प्रताप
15. मा.विनया प्रदीप (आबा) तापकीर
16. मा.जगदीश शेट्टी
17. मा.बाबर शारदा प्रकाश
18. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
19. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
20. मा.उल्हास शेट्टी

21. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
22. मा.पवार संगीता शाम
23. मा.उबाळे सुलभा रामभाऊ
24. मा.तानाजी विठ्ठल खाडे
25. मा.बो-हाडे शुभांगी संजय
26. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर
27. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित
28. मा.भारती फरांदे
29. मा.आर.एस.कुमार
30. मा.जावेद रमजान शेख
31. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
32. मा.पांढरकर निलेश शंकरराव
33. मा.नंदा विकास ताकवणे
34. मा.तरस बाळासाहेब जयवंत
35. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
36. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
37. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
38. मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
39. मा.लोंढे गणेश नारायण
40. मा.शमीम पठाण (पठाणबाई)
41. मा.†›.संदीप गुलाब चिंचवडे
42. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
43. मा.अपर्णा निलेश डोके
44. मा.अनंत सुभाष को-हाळे
45. मा.जयश्री वसंत गावडे
46. मा.पवार मनीषा काळूराम
47. मा.प्रसाद शेट्टी
48. मा.अविनाश (दादा) टेकावडे
49. मा.काळभोर वैशाली जालिंदर
50. सौ.साळुंके सविता सुरेश
51. मा.शेख अस्लम शैकत
52. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

53. मा.मासुळकर समीर मोरेश्वर
54. मा.वाबळे संजय मल्हारराव
55. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
56. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडूरंग
57. मा.सुपे आशा रविंद्र
58. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
59. मा.अजित दामोदर गव्हाणे
60. मा.गोफणे अनुराधा देविदास
61. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
62. मा.गव्हाणे सुरेखा शंकर
63. मा.महेशदादा किसन लांडगे
64. मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
65. मा.लोंढे शुभांगी संतोष
66. मा.विश्वनाथ विठोबा लांडे
67. मा.ननवरे जितेंद्र बाबा
68. मा.सावळे सिमा रविंद्र
69. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
70. मा.भोसले राहूल हनुमंतराव
71. मा.पालांडे सुजाता सुनिल
72. मा.बहल योगेश मंगलसेन
73. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
74. मा.छाया जगन्नाथ साबळे
75. मा.आसवाणी सविता धनराज
76. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)
77. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ
78. मा.काळे विमल रमेश
79. मा.पाडाळे निता विलास
80. मा.विनोद जयवंत नढे
81. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
82. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
83. मा.विमलताई सुरेश जगताप
84. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

**85.** मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदु बारणे
**86.** मा.ओव्हाळ शेखर अशोक
**87.** मा.यमुनाताई रमणनाना पवार
**88.** मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
**89.** मा.कलाटे स्वाती मयुर
**90.** मा.नांदगुडे विलास एकनाथ
**91.** मा.चौंधे आरती सुरेश
**92.** मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे
**93.** मा.बोकड रामदास गेणभाऊ
**94.** मा.जवळकर वैशाली राहुल
**95.** मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
**96.** मा.जगताप राजेंद्र गणपत
**97.** मा.शितोळे शैलजा बाबुराव
**98.** मा.जगताप नवनाथ दत्तु
**99.** मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
**100.** मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे
**101.** मा.जम सोनाली पोपट
**102.** मा.प्रशांत शितोळे
**103.** मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
**104.** मा.काटे रोहितअप्पा सुदाम
**105.** मा.गायकवाड संध्या सुरदास
**106.** मा.शेंडगे आशा सुखदेव
**107.** मा.संजय केशवराव काटे
**108.** मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती
**109.** मा.पाटील सुजित वसंत
**110.** मा.बो-हाडे अरुण तुकाराम
**111.** मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.डॉ.श्रीकर परदेशी–आयुक्त, मा.झुरे-सहआयुक्त,मा.गायकवाड,मा.मुंढे,मा.कारचे, मा.कुलकर्णी,मा.दुरगुडे-सहाआयुक्त,मा.घाडगे-मुख्यलेखापरिक्षक,मा.गावडे-नगरसचिव,मा.कांबळे-प्र.शहर अभियंता,मा.चव्हाण-सहशहर अभियंता,मा.भोसले-मुख्यलेखापाल,डॉ.रॉय-प्र.आरोग्य वैद्यकीयअधिकारी,मा.भदाणे-उपसंचालक(नगररचना),डॉ.देशमुख-वैद्य.अधिक्षक,मा.काची,मा.तांबे, मा.दुधेकर,निकम,मा.पाटील,मा.शरद जाधव,मा.साळवी,मा.पठाण,मा.लडकत, मा.पिरजादे,

मा.सय्यद, मा.बरशेट्टी-कार्य.अभियंता, मा.कांबळे-प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.प्रविण अष्टिकर-जॉईंट एम.डी.(पीएमपीएल) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर**:- उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.आर.एस.कुमार -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये एच.बी.ओ.टी. मशिन खरेदी करण्यात आली होती. याची आवश्यकता आहे असे कोणत्या अधिका-याने किंवा पदाधिका-याने सांगितले होते. ही मशीन पुणे जिल्ह्यात कुठेही नाही. मुंबईत नाही, शासनाकडे नाही. एवढ्या मोठ्या शहरांमध्ये कुठेही मशीन नसताना आपल्या हॉस्पीटलला ही मशीन खरेदी करायची गरज आहे असे का वाटले? निर्णय फक्त २/३ लोकांनी मिळून घेतलेला आहे. मशीन खरेदी करायची गरज का पडली? मी विचारलेल्या प्रश्नांना दिलेली उत्तरे बरोबर नाहीत. आपल्याला आश्चर्य वाटेल, महापालिका सभा किंवा विधी समितीकडे मशिन खरेदीबाबतचा विषय आलेला नाही. याचा अर्थ मांडलेल्या बजेटला पूर्ण मान्यता मिळाली आहे असे मला सांगण्यात आले. आपण जी.बी.मध्ये बजेटला पूर्ण मान्यता कधी देतो का? स्थापत्यसारख्या विभागांची प्राप्त कामांची माहिती दिलेली असते. डांबरीकरण करणे, इतक्या मीटरचा रस्ता करा असा कामांचा ठराव करत असतो. त्यासाठी बजेटमध्ये मान्यता दिली जाते. मेडीकल विभागातील मशीन खरेदीच्या विषयामध्ये पार्टस् खरेदीसाठी साहित्य खरेदी असा उल्लेख घेतला आहे का? साहित्य घेणार असाल तर त्याच्या मान्यतेसाठी विधी समिती, महापालिका सभेतून विषय आणायला नको का? ३ कोटींची मशीन भारतात मोजक्याच २/४ ठिकाणी असेलतर त्याची खरेदी करताना २/३ डॉक्टर्स मिळून निर्णय घेतलेला होता. कुठेतरी सभागृहाला बजेट जाहीर करा. मशीन खरेदी करताना Kasco Environmental Systems Pvt. Ltd. ही कंपनी होती. पुण्यामध्ये कुठेही ही मशीन खरेदी केलेली नाही. त्याचे उत्तर दिले आहे, M/s. Kasco Environmental Systems Pvt. Ltd. C-2, Apnaghar Hsg. Soc., 712/A, ShankerShet Road, Pune-42. याठिकाणी या कंपनीचे ऑफीस नाही. लेन्सेस तयार करणारी कंपनी आहे. मग या कंपनीचे ऑफीस बोगस आहे का? ही कंपनी कुठे मॅन्युफॅक्चरींग करते हे कुठेही दिलेले नाही. या कंपनीच्या दिलेल्या पत्त्यावर मॅन्युफॅक्चरींग  ॅक्टीव्हीटी होऊ शकत नाही. It is a residencial area. मी डिपार्टमेंटकडून माहिती घेतली असता मला कळाले मशीनचे ४५ लाखांचे पार्टस् बाहेरच्या देशातून आणले आहेत. कंपनी पुण्यामध्ये आहे. ट्रान्स्पोर्ट, इंजिनिअरींग, फॅब्रिकेशन हे पिंपरी चिंचवडमध्ये केले आहे. एक पार्ट बाहेरून आणतो. फॅब्रिकेशन पिंपरी चिंचवडमध्ये करतो. मॅनीफॅक्चरींग पुण्यामध्ये आहे असे म्हणतात. यात काय गोलमाल आहे ते समजत नाही. ऑक्ट्रॉय

वाचवण्यासाठी केले आहे का असेच मला वाटते आहे. ऑक्ट्रॉय डिपार्टमेंटकडून ७७ लाख पेनल्टी घेतली आहे. ही पेनल्टी कधी वसूल होणार. यातील ५० टक्के पेमेण्ट कमिशनर यांच्या काळात दिलेले आहे. पेमेण्ट देताना कोणताही अकाऊंटंट मग तो वैद्यकीय विभागातला असो, वायसीएमचा असो त्याने मशीनची जकात भरली आहे का नाही हे चेक केलेले नाही. सुपरिटेंडंट यांनी चेक केलेले नाही. डेप्युटी सुपरिटेंडेंट यांनी बघितलेले नाही. कोणीही बघितलेले नाही. जकात भरली का नाही हे कमिशनर यांनी पॉईंट आऊट केल्यानंतर ७७ लाखांची पेनल्टी त्या कंपनीवर लावण्यात आली आहे. पिंपरी चिंचवडमध्ये मशीनचे मॅनीफॅक्चरींग झाले, पूर्ण रॅकेट आहे. मला वाटत नाही, एवढी मोठी मशीन खरेदी करायचा निर्णय घेतला त्यावेळी कमिटी नेमली होती का. पूर्वी वायसीएममध्ये एक कमिटी असायची. त्यात विरोधी पक्षनेते, पक्षनेते असायचे. त्यांचे † प्रूव्हल असायचे. ही कमिटी सध्या अस्तित्वात नाही. का अस्तित्वात नाही. अधिका-यांवर कंट्रोल नको का. कोणतीही कमिटी का अपॉईंट केली नाही. ३ कोटी किंमतीची मशीनरी पुणे जिल्ह्यात कुठेही नाही. मोठमोठ्या हॉस्पीटल्समध्ये नाही. त्याची आवश्यकता का याबद्दल काहीही माहिती दिलेली नाही. मे.मनाली एंटरप्रायझेस यांना मे.कास्को एनव्हारॉनमेंटल सिस्टीम्स् प्रा.लि. या कंपनीची एजन्सी म्हणतात. मनाली एंटरप्रायझेस यांनी ही मशीन सप्लाय केली आहे का? हे बघितले आहे का? हे संगनमताने आणले आहे. त्यांना एजंट म्हणून अपॉईंट केले होते. ४/५ ठिकाणी त्यांनी सप्लाय केले असेल असे मला वाटत नाही. मे.मनाली एंटरप्रायझेस हे पर्मनन्ट डिस्ट्रीब्युटर असतील तर फक्त आपल्यालाच सप्लाय करण्यासाठी हे डिस्ट्रीब्युटर आहेत असे मला वाटते आहे. यामध्ये ज्यांनी सूचना केली, तिथपासून आत्तापर्यंत जे कोणी जबाबदार आहेत, त्यांना सस्पेण्ड करायला पाहीजे. सरासर महापालिकेला धोका दिलेला आहे. आम्ही कशासाठी निवडून आलेलो आहोत. कॉर्पोरेशनमध्ये निवडून आल्यानंतर कॉर्पोरेटर अधिका-यांच्या चूकांबद्दल बोलणार नसेल तर ते चुकीचे आहे. कमिशनर यांना विचारा. एन्क्वायरी कमिटी का अपॉईंट केली नाही. एनक्वायरी ऑफीसर अपॉईंट केलेला आहे. त्याला स्टाफ काय दिला आहे, १ क्लार्क, १ प्युन. त्यांच्याकडे २० केसेस आहेत. अधिका-याला एन्क्वायरीसाठी पत्र देताय. टाईम बाऊंड देत नाही का. किती काळात रिपोर्ट करायला पाहीजे. वर्षानुवर्षे एन्क्वायरी चालणार का. मुख्य विभागीय एन्क्वायरी कधी सुरु झाली. २००९ मध्ये एन्क्वायरी सुरु झाली. ५ वर्षापासून एन्क्वायरी चालू आहे. महाडीक, डी.एस.काळूस्कर,निवृत्त कार्यकारी अभियंता, उपअभियंता यांची एनक्वायरी सप्टेंबर २०१० मध्ये सुरु झाली. ३ वर्षांमध्ये साधा एन्क्वायरी रिपोर्ट सुद्धा मिळालेला नाही. What is use of enquiry? हिरालाल मेहता – डिलमध्ये ५ कोटींचा भ्रष्टाचार केला आहे. एक एन्क्वायरी ऑफीसर, त्यांची रुम बघा. तिथे ४ माणसे सुद्धा बसू शकत नाहीत अशी जागा दिलेली आहे. स्टाफ दिलेला आहे का? एक ऑफीसर २० केसेस हॅण्डल करणार. मग एन्क्वायरी करताना

टाईमबाऊंड का देत नाही? एका वर्षात, ६ महिन्यांत पूर्ण व्हायला पाहीजे. मॅनीफॅक्चरींग ऑफीस आहे का, प्रोसेसिंग होते का, हे सगळे बघितले पाहीजे. फाईलमधील कागदपत्रे बघून निर्णय देणार. त्यापेक्षा इंडीपेंडंट एन्क्वायरी ऑफीसर अपॉईंट करुन इंडीपेंडंट एन्क्वायरी करा. ३ महिन्यांचा रिपोर्ट मागवा. वायसीएम हे चरायचे कुरण झालेले आहे. ऑपरेशनचा टोटल रेट ३ पट जास्त आलेला होता. ७५,०००ची मशीन खरेदी केली म्हणून अधिका-याला सस्पेण्ड केले होते. कुठेतरी उत्तरे दिले होते, खातेनिहाय चौकशी करायचे काम चौकशी अधिका-याकडून चालू आहे. Is this answer? ऑफीसर जी.बी.ला उत्तर देतोय. कुठे सुद्धा भिती नाही, रिस्पेक्ट नाही. हायपोथेटीकल अन्सर. तो कशाला सहकार्य करणार. चोर कधी सहकार्य करणार का? तो सहकार्य करणार नाही. तुम्ही आम्हाला सांगा. किती महिन्यांत एन्क्वायरी कंम्प्लिट करणार? ३/४ वर्षांपासून एन्क्वायरी कम्प्लिट होत नाही. तुम्ही सांगता, इंडिपेंडण्ट एन्क्वायरी असणार. कम्प्लिट फ्रॉड झालेला आहे. लाखो रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. ३/४ कोटींच्या मशिनरी खरेदीमध्ये जी.बी.ने मान्यता दिलेली असली तरी स्पेसिफिक आयटम दिलेले नाहीत. बजेटमध्ये दिले आहे का? बजेटमध्ये मेंशन केलेले नाही. विधी समिति किंवा महापालिका सभेमध्ये विषय आलेला नाही तरी † प्रूव्ह करुन केलेले आहे. हे उत्तर पटत नाही. चुकीचे उत्तर आहे. संपूर्ण फ्रॉडमध्ये जो कोणी इनव्हॉल्व्ह झाला आहे, मग तो डिस्ट्रीब्युटर असलातरी त्याच्यावर सुद्धा फौजदारी गुन्हा दाखल करा. अजूनही २/४ वेळा ३ ते ४ पार्टस् सप्लाय केल्याचे माहिती पडले. This is not a simple matter. इंडिपेंडण्ट चौकशी करायला इंडिपेंडण्ट ऑफीसर अपॉईंट करा. मी विचारलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे दयायला सांगा. वेळ संपली असे सांगू नका.

**मा.आशा शेंडगे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,ज्येष्ठ सहकारी मा.आर.एस.कुमार यांनी अतिशय महत्वाच्या प्रश्नाला हात घातलेला आहे. एच.बी.ओ.टी. मशिनबद्दल वर्तमानपत्रामधून वारंवार ऐकले आहे. त्याबद्दल मुंबई इथे सुद्धा प्रश्न उपस्थित झाला होता. वर्तमानपत्रांमध्ये बातम्या आल्या तेव्हा सर्व सदस्यांसमोर एकच बातमी होती, नेमके एच.बी.ओ.टी. म्हणजे काय आहे? एच.बी.ओ.टी. मशीनची सिकॅरोस नावाची कंपनी आहे. ही मशीन मुंबईत के.ई.एम. हॉस्पिटल व पुण्यात संचेती हॉस्पिटल इथे आहे. सिकॅरोस कंपनीची मशीन यू.एस.ए. मेड असा उल्लेख सरळ सरळ दिला गेला होता. वायसीएम मध्ये बसवलेली मशीन मुळात यू.एस.ए. बेस्ड कंपनीची नाही. माझ्याकडे पुरावा आहे. Manifest Chamber याचा उल्लेख केलेला आहे. तरीसुद्धा पिंपरी चिंचवडमध्ये सत्ताधिका-यांना वाटले की, Kasco Environmental Systems Pvt. Ltd. या कंपनीची मशिन घ्यावी. तसा उल्लेख केला होता. मोनोफ्रेश ही यू.एस.ए. ब्रँड कंपनी आहे, ती का रिफर केली नाही. साधारणतः ही मशीन बनवणा-या किती कंपन्या आहेत, त्यांचा कुठेही उल्लेख केलेला नाही. उल्लेख करावासा

वाटला नाही. पेपरमध्ये बातमी आली की, मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला आहे. नक्कीच चुकीचे नाही. ७० लाखांची मशिन पुण्यातून ३ कोटींना विकत घेतो. वायसीएम हॉस्पीटलला सुरुवातीला पांढरा हत्ती असे म्हणत होते. पण हा पांढरा हत्ती नसून काळा हत्ती आहे असे मी म्हणते. पूर्णपणे भ्रष्टाचाराचे सेंटर आहे. तुम्ही स्वतः डॉक्टर आहात. तुमच्याकडून चांगल्या पद्धतीने पोस्ट मार्टेम व्हायला पाहीजे आहे. तुमच्याकडून स्वच्छ कामाची अपेक्षा आहे. तुम्ही आमच्यासाठी आदरणीय आहात. वायसीएमचे पोस्टमार्टेम करायला पाहीजे आहे. वरिष्ठ अधिकारी, नेते यांच्यावर सक्त कारवाईची अपेक्षा होती ती झाली नाही. यापुढील काळात जरुर व्हावी. अधिका-यांवर चौकशी लावली आहे अशा पद्धतीचे उत्तर आमच्या ज्येष्ठ सहका-यांना देण्यात आले आहे. इथे काय मोगलाई लागून गेली आहे का? महापालिका म्हणजे तुमच्या घरची प्रॉपर्टी आहे का? इथे दानधर्म करण्यासाठी आलोय का? सामान्य नागरिकाने कर भरला नाही, पाणीपट्टी भरली नाहीतर लगेचच तुमचे अधिकारी नोटीस देतात, कनेक्शन तोडतात. अधिकारी अगदी कर्तव्यदक्ष असल्याप्रमाणे काटछाट करायला सुरुवात करतात. वरिष्ठ अधिका-यांबाबत मात्र ढिलाई होते. त्यांचा आपल्याला सुद्धा दबाव येतो का? कुठेतरी तुमच्या कालखंडात सगळ्या गोष्टी व्यवस्थित होणे अपेक्षित आहे. जी चौकशी लावली आहे त्याला कालखंड ठरवून द्या, मर्यादा द्या. दिलेली उत्तरे तुम्ही स्वतः एकदा वाचा. तुम्हाला वाटेल, अधिकारी किती विद्वान आहेत, याचा तुम्हाला साक्षात्कार घडणार आहे. चौकशी पूर्ण करायचा कालखंड द्यावा. तुम्हाला विनंती आहे, चौकशी लावताना नेमके काय चालले आहे? सदस्य तुमच्यासमोर आहेत. वर्तमानपत्रामध्ये बातम्या येतात तेव्हा कळते. चौकशी कुठपर्यंत आली आहे? प्रत्यक्ष प्रशासनाचा खेळ चालला आहे. मी तुम्हाला खो द्यायचा आणि तुम्ही मला खो द्यायचा. झालेल्या भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करा. नेमके दोषी कोण या सगळ्याचा त्वरित विचार करा. नेमके दोषी कोण, दोषींवर योग्य प्रकारे कारवाई करावी अशी अपेक्षा व्यक्त करते.

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, खरेतर हा विषय माझ्या वॉर्डाशी संबंधित आहे. त्यासंदर्भात याठिकाणी प्रश्नउत्तरे केलेली आहेत. आत्ताच मा.आशा शेंडगे यांनी सांगितले, प्रशासनाचा खेळ कसा असतो? एकमेकांना खो देण्यातच वेळ वाया जातो मग त्यात आपलाही वेळ वाया जातो. पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीतील फुलेनगर झोपडपट्टी, वाय.सी.एम. दवाखान्याच्या मागील यामध्ये एकुण किती झोपड्या आहेत?

**मा.महापौर** – सिमाताई तुम्ही बसा कुमार साहेबांचे प्रश्न संपू दया.

**मा.आर.एस.कुमार** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मी जो विषय मांडला त्याचे उत्तर अधिका-यांनी द्यायला पाहीजे. एखाद्या मोठ्या मॅटरवर उत्तर पाहिजे असे यांना सांगितले होते. कमिशनर यांनी एन्क्वायरी ऑफीसर अपॉईंट करुन कमिशनरांपासून आत्तापर्यंत जे दोषी आहेत त्यांच्यावर कारवाई करा. असे होत नाही. मी आज ३० वर्षांपासून काम करतोय. नवीन प्रोसिजर कशाला सुरु करताय. जो प्रश्न मी विचारलेला आहे तो विषय झाल्यानंतर दुसरा विषय घ्या. पहिले माझ्या प्रश्नांना उत्तर दिले पाहीजे. असे कधीच झालेले नाही. कमिशनर यांच्याकडून याबाबत † श्यूरन्स पाहीजे.

**मा.डॉ.रॉय (प्र.आरोग्य वैद्यकिय अधिकारी)**–मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सदस्य, मा.आर.एस. कुमार यांनी प्रश्न विचारलेला आहे. मशिन खरेदीची नोट पुटअप केली होती. तत्कालिन वैद्यकीय अधिक्षक डॉ.जगदाळे, उपअधिक्षक डॉ.गायकवाड, सर्जन डॉ.पानसे यांनी मशीन खरेदीची मागणी केली होती. त्याप्रमाणे प्रस्ताव पुटअप करण्यात आला. मशीन बघून आले तेव्हा निर्णय फायनल झाला. तेव्हा मनीप्लेक्सपेक्षा मल्टीप्लेक्स जास्त उपयोगी पडेल असे त्यांचे मत झाले. मनीप्लेक्समध्ये एकच पेशंट बसू शकतो. मल्टीप्लेक्समध्ये एकापेक्षा जास्त पेशंट बसू शकतात. त्यानुसार निविदा मागवण्यात आल्या. कोटेशन्स घेतली. दोन पार्टींच्या निविदा आल्या होत्या. मे.अल्मेट व मे.मनाली एंटरप्रायजेस यांनी निविदा भरली होती. मशिन पुरवणारा हा सप्लायर असतो. मॅन्युफॅक्चरींग कंपनी नसते. निविदा भरताना स्पेसिफीक मशीन कशी पाहीजे हे निविदेत जाहीर केलेले असते. २ कंपन्यांची निविदा स्पेसिफिकेशनप्रमाणे असल्यामुळे कंपन्या कमी होत्या. मे.मनाली एंटरप्रायजेस यांना ऑर्डर दिली होती. टेंडर एक्सटेंड केलेले नव्हते.

**मा.आर.एस.कुमार** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, १ कोटींच्यावरील टेंडर असेलतर २ पार्टी आल्या असतील तर टेंडर एक्सटेंड करतो का नाही ते सांगा.

**मा.डॉ.रॉय (प्र.आरोग्य वैद्यकिय अधिकारी) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सदस्य, तत्कालिन आयुक्तांनी मान्यता देऊन ते एक्सटेंड करायला पाहीजे होते.

**मा.आर.एस.कुमार** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, This is the 1st mistake.

**मा.डॉ.रॉय (प्र.आरोग्य वैद्यकिय अधिकारी) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सदस्य, त्याप्रमाणे सदर प्रस्ताव स्थायी समितीसमोर गेला, मंजूर झाला. ऑर्डर प्लेस केली. दि. ३१ मार्च २०१२ रोजी तत्कालिन एम.ओ.एच. यांनी ऑर्डर प्लेस केली होती. त्याचा क्र. ४८ दि.१७/३/१२ अन्वये ही ऑर्डर दिलेली होती.

**मा.आर.एस.कुमार** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, ऐनवेळचा विषय आला होता का?

**मा.डॉ.रॉय (प्र.आरोग्य वैद्यकिय अधिकारी) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा. सदस्य, ही माहिती माझ्याकडे सुद्धा नाही. दि.२१/५/२०१२ मध्ये ऑर्डर देण्यात आली. ऑक्टोबर १२ मध्ये ९० टक्के पेमेण्टची मागणी केली होती. त्यापैकी ५० टक्के पेमेण्ट म्हणजे रु.१,३९,६२,३७५/- इतके देण्यात आले. वर्तमानपत्रात बातमी आली होती. त्यानंतर चौकशी सुरु झाली. जकात कमी भरली म्हणून कंपनीवर दंड लावण्यात आला होता. नंतरचे पेमेण्ट केलेले नाही. जोपर्यंत ते जकातीचा दंड भरत नाहीत तोपर्यंत त्यांचे पेमेण्ट द्यायचे रोखून धरले आहे.

**मा.आर.एस.कुमार** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, ज्यावेळी बिल पास केले त्यावेळी जकात भरली आहे का नाही हे चेक का केले नाही?

**मा.डॉ.रॉय (प्र.आरोग्य वैद्यकिय अधिकारी) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सदस्य, पिंपरी चिंचवड मनपाकडून जे बील दिलेले होते त्यावेळी जकात भरली का नाही हे तपासले नाही.

**मा.आर.एस.कुमार** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, पुण्यामधून मशीन खरेदी केली. मग आपल्याकडे ४५ लाखांची जकात कशासाठी भरली? मे.मनाली एंटरप्रायजेस यांना बील कसे दिले. मशीन कुठे मॅन्युफॅक्चरींग केली आहे?

**मा.डॉ.रॉय (प्र.आरोग्य वैद्यकिय अधिकारी) -**मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सदस्य, मे.मनाली एंटरप्रायजेस यांनी मशीन सप्लाय केली होती. आपण मागणी केल्यानंतर त्यांना ब्रेकअप दिला होता.

**मा.आर.एस.कुमार** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मे.मनाली एंटरप्रायजेस यांनी ४५ लाखांवर जकात पिंपरी चिंचवडमध्ये का भरली?

**मा.डॉ.रॉय (प्र.आरोग्य वैद्यकिय अधिकारी)-**मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सदस्य, ४५ लाखांचे सामान बाहेरून आणले असल्याचे दाखवले आहे. बाकी रु.४३,२२,०००/- ची वस्तू पिंपरी चिंचवडमधील असल्याचे दाखवले आहे.

**मा.आर.एस.कुमार**–मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,डिस्ट्रीब्युटर पिंपरी चिंचवडमधील पार्टी आहे. ४५ लाखांची मशीनरी बाहेरून आणली आहे. फार मोठा घोळ आहे.

**मा.डॉ.रॉय (प्र.आरोग्य वैद्यकिय अधिकारी)-**मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सदस्य, ही वस्तुस्थिती आहे. काही पार्टस् पी.सी.एम.सी. मधून, काही पार्टस् पुणे इथून आले आहेत. त्यांच्यावरच जकात भरली होती.

**मा.आर.एस.कुमार**–मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, जकात निगडी इथे भरली, बरोबर आहे का? जकात कुठे भरली होती ते सांगा.

**मा.डॉ.रॉय (प्र.आरोग्य वैद्यकिय अधिकारी)-**मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सदस्य, जकात भरलेली रिसिट माझ्याकडे आत्ता नाही.

**मा.आर.एस.कुमार**–मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, फुगेवाडीत जकात भरली आहे. माझ्याकडे रिसिट आहे. दि.३० ऑक्टोबर २०१२ची रिसिट आहे. मटेरिअल कुठे मॅन्युफॅक्चरींग केले आहे.

**मा.डॉ.रॉय (प्र.आरोग्य वैद्यकिय अधिकारी)-**मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सदस्य, आळंदी रोड, भोसरी इथे मॅन्युफॅक्चरींग केले आहे

**मा.आर.एस.कुमार**–मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, एक मशीन चार ठिकाणी असेंबल केले. Kasco Environmental Systems Pvt. Ltd. चे युनिट हडपसर इथे आहे. तिथून पार्ट पाठवले व चार ठिकाणी मॅन्युफॅक्चरींग केले. तुम्हाला तरी पटते का? चार ठिकाणी एक मशीन मॅन्युफॅक्चर होते का? टेल्कोमध्ये १२ ठिकाणांहून पार्ट येतात व टेल्कोमध्येच मॅन्युफॅक्चरींग होते. मशीनचे मॅन्युफॅक्चरींग ३ ठिकाणी केले का?

**मा.आशा शेंडगे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मशीन कुठे चालू आहे, असेंबल झालेच नाही.

**मा.आर.एस.कुमार**–मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, चार डॉक्टर मिळून ३ कोटींच्या खरेदीला मंजूरी देतात. कोणत्याही समितीची मान्यता घेतलेली नाही. बिनधास्त उत्तर दिलेले आहे. स्टँडींग कमिटी मान्यता देते. मशीन कुठून आली बघत नाही. तुम्ही उत्तर देऊ शकणार नाही. तुम्ही कमिटमेंट द्या. ज्या कमिशनरांनी वर्कऑर्डरवर सही केली, त्यांच्यावर कारवाई होणार का? संविधानात शपथ घेतो. पण आय.ए.एस. अधिकारी पब्लिक इंटरेस्टमध्ये काम करतात का? कॉर्पोरेटरवर ढकलून द्यायचे. डॉ.जगदाळे, डॉ.पानसे यांची गँग होती. डॉ.गायकवाड हे सुद्धा यात सामील आहेत. This is only one of the main source of the G.B.

मशीन फॉरेनवरुन इम्पोर्ट करणार होतो. पुण्यात अशा प्रकारची मशिन संचेती हॉस्पिटल इथे बघितली आहे. मुंबईमध्ये बघितले तर तिथे यु.एस.ए. मेड मशीनरी आहे.

**मा.डॉ.रॉय (प्र.आरोग्य वैद्यकिय अधिकारी)-**मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सदस्य, डॉ.जगदाळे यांनी मशीन बघितली होती.

**मा.आर.एस.कुमार**–मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, साहेब म्हणतात अजून एक महिना वाढवा. पाणीपुरवठ्याचे टेंडरची मुदत दोनदा, तिनदा वाढवली. एकदाही वाटले नाही आमचे मत घ्यावे. विषयाला मंजुरी दिली. या लोकांना जी.बी.समोर उभे करुन शुट केले पाहीजे. अशाच पद्धतीने कामे होत असतील तर एखादा दिवस असा असेल, कमल हसनच्या पिक्चरमध्ये दाखवल्याप्रमाणे होईल, गोळ्या घालून मारुन टाकतील. चौकशी करुन आमच्यासमोर विषय आणा. नाहीतर उपमुख्यमंत्री यांच्या ऑफीसमध्ये जाऊन बसतो. मला कमिशनर यांचा †श्युरन्स पाहीजे.

**मा.श्रीकर परदेशी** (महापालिका आयुक्त) - मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सदस्य, एचबीओटी मशीनसंदर्भात १९ जानेवारी २०१३ च्या जी.बी.त विषय उपस्थित झाला होता. त्याअनुषंगाने प्राथमिक चौकशी केली होती. सदस्यांनी मुद्दा उपस्थित केला होता. बरेचशे विषय माहिती नसतात. यात गंभीर बाबी आढळून आल्या आहेत त्या थोडक्यात सांगतो - ज्या ठिकाणी ऑक्सिजनची कमतरता जाणवते अशा ठिकाणी त्याचा पुरवठा करावा लागतो. पाणबुडे, सैन्य दल, वायु दल असा ठिकाणी प्रामुख्याने वापरतात. वाय.सी.एम. हॉस्पीटलसारख्या ठिकाणी अशा प्रकारचे मशीन खरेदी करायची आवश्यकता दिसून येत नाही, हे एक डॉक्टर म्हणून माझे स्वतःचे मत आहे. पुणे शहरात रुबी हॉस्पीटल, जहांगीर हॉस्पीटल, संचेती हॉस्पीटल, आदित्य बिर्ला हॉस्पीटल इथे मशीन लावलेली नाही. मुंबईमध्ये बॉम्बे हॉस्पीटल, ब्रीच कँडी अशा नामांकीत खाजगी रुग्णालयांमध्ये सुद्धा अशा प्रकारची मशीनरी लावलेली नाही. मुंबईत के.ई.एम.,सायन इथे मशीन नाही. पुण्यामध्ये ससून हॉस्पीटलमध्ये फक्त एका बेडचे मोनोचेंबर मशीन आहे. संचेती हॉस्पीटल इथे मोनोचेंबर मशीनरी आहे. केईएम मध्ये नुकतीच २ चेंबरची मशिनरी बसविलेली आहे. या उपकरणाची खरेदी अनावश्यक क्षमतेसाठी झालेली आहे. प्राथमिक अहवालात असे दिसून आले आहे, मोनोचेंबरसाठी शिफारस केली असताना ४ बेडसाठी उपकरण खरेदी करायची शिफारस तत्कालिन वैद्यकीय अधिक्षक डॉ.जगदाळे यांनी केलेली होती. इतके महागडे स्वरुपाचे उपकरण खरेदी करताना राज्य स्तरावरच्या सर्वाधिक खप असलेल्या वर्तमानपत्रामध्ये निविदा नोटीस प्रसिद्ध करुन मशीनची खरेदी केलेली नाही. त्यामुळे निकोप स्पर्धा झालेली नाही. दुस-यांदा निविदा प्रसिद्ध झाली. महागड्या, दर्जेदार मशीनसाठी निकोप स्पर्धेसाठी फेरनिविदा काढणे गरजेचे होते. दोन

निविदा प्राप्त असताना निविदा उघडण्यात आल्या व आदेश देण्यात आले. पुरेशी स्पर्धा झाल्याचे दिसून आले नाही. सदरचे उपकरण बसविल्यानंतर रुग्णांना प्रत्येक वेळी शुल्क भरावे लागणार आहे. वायसीएममध्ये दाखल होणा-या रुग्णांची क्षमता आहे का नाही याचा मशिन खरेदी करताना विचार केलेला नाही. वायसीएम हॉस्पीटल मध्ये बसवण्यात आलेले मशीन, दोन्ही बाजुच्या फुटमध्ये अल्सर झाला असेलतर वापरात येऊ शकते. पायाचा अल्सर बरा व्हायला ३० ते ४० वेळा मशीन चेंबरमध्ये पेशंटला बसावे लागते. एका सेटींगचा खर्च रु.५,०००/- इतका आहे. ३० ते ४० सेटींगसाठी दीड ते दोन लाख इतका खर्च होत असेल तर ते भरायची क्षमता वायसीएममध्ये येणा-या पेशंटची नाही. हार्ट पेशंटकडे औषधांसाठी भरायला पैसे नसतात. असे असेल तर एका अल्सरसाठी पेशंट दीड ते दोन लाख भरु शकतो का याचा विचार हे मशीन खरेदी करताना केलेला नाही. प्राथमिक चौकशीत ही गंभीर बाब समोर आलेली आहे. म्हणून तत्कालिन वैद्यकीय अधिक्षक यांची खातेनिहाय चौकशी सुरु केलेली आहे. मशीनचे एकूण पेमेण्ट रु.२ कोटी ७९ लाख आहे. सप्लायर यांना ५० टक्के पेमेण्ट केलेले आहे. ५० टक्के पेमेण्ट बाकी ठेवलेले आहे. दरम्यान जकात भरणे अपेक्षित होते. मशीनचा पुरवठा पुण्यामधून दाखवला आहे. तेवढी जकात मात्र भरलेली नाही. जकात विभागाच्या नियमानुसार बुडवलेली जकात त्याच्या १० पट म्हणजे ७७ लाख इतका दंड आकारलेला आहे. हा दंड वसूल करण्याविषयी संबंधितांना नोटीस दिलेली आहे. उरलेले पेमेण्ट थांबवण्यात आलेले आहे. पहिला मुद्दा सदस्यांनी उपस्थित केलेला आहे की, स्वतंत्र चौकशी होणे गरजेचे आहे. खातेनिहाय चौकशी सुरु केलेली आहे. परंतु दुसरा मुद्दा महत्वाचा आहे. सदरची मशीन ही इपोर्टेड मशीन म्हणून सांगण्यात आली असली तरी असेंम्बल्ड् मशीन दिसते आहे. या मशिनमधून रुग्णाला ऑक्सिजनचा पुरवठा केला जाणार आहे. ऑक्सिजन हा ज्वलनशील घटक सुद्धा आहे. जर त्यात बिघाड होऊन दुर्घटना घडू नये म्हणून सेफ्टी हा † स्पेक्ट बघण्यासाठी दुसरी कमिटी नेमली आहे. त्यात कमिटीला ३ मँडेट दिलेले आहेत. सदरचे उपकरणाच्या खरेदीबाबत, मशिनची उपलब्धतेबाबत महापालिकेने पुरवठाधारकाला उर्वरीत रकमेपैकी किती रक्कम देणे संयुक्तिक ठरेल याबाबत विचार करावा. अशा प्रकारचे उपकरण अन्य हॉस्पीटल्समध्ये खरेदी केलेले आहे. संचेती हॉस्पीटल, केईएम हॉस्पीटलमधील मशीनचा दर्जा व कंपनी तपासून घ्यावी. इम्पोर्टेड मशीनची क्वालिटी काय, कंपनी काय,जकात चुकविल्याबद्दल आकारण्यात आलेला दंड, याचा अंतिम दावा निश्चित करणे गरजेचे आहे. सदरचे उपकरण वायसीएम रुग्णालयामार्फत कार्यान्वित करणे गरजेचे आहे. दुर्घटना होऊ नये ही बाब लक्षात घेणे गरजेचे आहे. या कमिटीत मुख्यलेखापाल श्री.प्रमोद भोसले, डॉ.कनोज, वैद्यकीय अधिक्षक, रुबी एलकेअर यांची समिती नेमली आहे. त्यानुसार उरलेले पेमेण्ट किती करायचे याचा निर्णय घेतला जाईल. सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांतील चौकशीचा कालावधी अवलंबून राहतो. जे अधिकारी सेवानिवृत्त आहेत

त्यांच्या देय रकमा रोखून ठेवल्या आहेत जेणेकरुन चौकशीनुसार निर्णय घेता येऊ शकतो. त्यांची लिव्ह एनकॅशमेंट व ग्रॅज्युईटी रोखून ठेवली आहे. फायनल डिसिजननुसार अंतिम निर्णय घेता येऊ शकेल.

**मा.आर.एस.कुमार** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेबांनी ज्या चुका सांगितल्या, अक्सेप्ट केल्या त्याबद्दल त्यांना धन्यवाद. तुम्हाला माहिती आहे या फाईलमध्ये डॉ.जगदाळे यांच्याबरोबर डॉ.गायकवाड यांची सुद्धा सही आहे. तुम्ही त्यांना सोडून दिले. हे सर्व करताना कमिशनर यांच्या खुर्चीवर जे बसले होते, त्यांच्यावर सुद्धा कारवाई करण्यासाठी हा मॅटर रिफर करा. कमिशनर फाईल चेक करुन सही करतात. ज्या कमिशनर यांनी सही केली त्यांना सुद्धा पनिशमेंट व्हायला पाहीजे.

**मा.भाऊसाहेब भोईर** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, महापालिकेचे विश्वस्त कोण आहेत, याचे भान कुठेतरी मा.आर.एस.कुमार यांच्यासारख्या ज्येष्ठ सदस्यांनी करुन दिले, त्याबद्दल त्यांना धन्यवाद देतो. मा.महापौर साहेब, आपण आदेश द्यावा. यातून निदर्शनास आलेल्या गोष्टी, यात कोणताही विषय असू दे. नेमकी तातडी कशाला म्हणायची? गरजेचा विषय आणला जातो. गरज केव्हा भासते. नैसर्गिक आपत्ती निर्माण झालीतर स्थायी समितीच्या माध्यमातून विषय आणतो. प्रश्नांची उत्तरे दिली होती. कोणताही विषय समितीच्या माध्यमातून न आणता ऐनवेळच्या विषय सादर करुन मंजूर केलातर संशयाला जागा राहते. आपण आलात म्हणून या गोष्टी निदर्शनास आल्यात. हजारो विषय उपसूचनांच्या माध्यमातून आले. झाले ते झाले, ते थांबवू शकलो नाही. या पार्श्वभूमीवर त्या-त्या समितीच्या माध्यमातून ते विषय त्या-त्या समितीत जावेत. या पुढील काळात नियोजन पद्धतीने मूळ समितीकडे विषय जावेत, त्याला आयुक्तांच्या सहीचे पत्र असावे. जेव्हा असे विषय मंजूर होतात तेव्हा डायरेक्ट स्थायी समितीला जबाबदार धरत असतो. स्थायी समितीत सुद्धा आमचेच सभासद असतात. त्यांना केवळ जबाबदार न धरता तातडीचे विषय कोण आणतो? संबंधित अधिकारी असे विषय आणत असावेत. त्या पद्धतीने तातडीने विषय आणून ते मंजूर करुन खरेदी करायची कोणतीही अशी गरज नाही. त्या समितीचे विषय त्या समितीत आले पाहीजेत. सभासदांना देखील विशेषतः गटनेत्यांनासुद्धा विनंती करु इच्छितो की, अधिका-यांचे प्रमोशनचे विषय उपसूचना देऊन महापालिका सभेत आणतो. परंतू हे विषय त्या-त्या समितीतून आले पाहीजेत. त्यावर त्या समितीत चर्चा होईल व आपण निष्कर्षापर्यंत येऊ. येथेच आपण चूक करतो. कोण बरोबर याचे भान ठेवता येईल. मा.महापौर साहेब, आपण संबंधितांना या पद्धतीने आदेश द्यावेत.

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, फुलेनगर झोपडपट्टीसंदर्भात याठिकाणी मी काही प्रश्न विचारलेले होते. प्रश्न क्र. १ पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीतील फुलेनगर झोपडपट्टी (वाय.सी.एम. दवाखान्याच्या मागील) मध्ये एकुण किती झोपड्या आहेत? साधा,सोपा प्रश्न विचारलेला आहे. साध्या,सरळ प्रश्नाचे उत्तर सुद्धा प्रशासनाला नीट देता आलेले नाही. त्यांना नीट उत्तर द्यायचे नव्हते काय अशी शंका आहे. महात्मा फुलेनगर झोपडपट्टीमध्ये एकुण १२८९ झोपड्या आहेत असे उत्तर प्रशासनाने दिले आहे. एकुण झोपडपट्टयांची संख्या ही केवळ घोषीत क्षेत्रातील झोपड्यांची आहे की संपूर्ण फुलेनगर झोपडपट्टीची आहे हा खरा प्रश्न आहे. संबंधित विभागाचे अधिकारी श्री.गावडे साहेब इथे आहेत, त्यांनी माझा मुद्दा लिहून घेऊन नंतर खुलासा दयावा. जर केवळ घोषीत क्षेत्राची संख्या असेल तर, माझा प्रश्न हा घोषीत झोपडपट्टी पुरता नसून तो संपूर्ण फुलेनगर झोपडपट्टीसाठी आहे. माझ्या प्रश्नात मी घोषीत झोपडपट्टीच्या क्षेत्रातील झोपड्यांची संख्या मागीतलेली नाही हे प्रशासनाला कळले नाही का? मी विचारलेल्या प्रश्नांची पूर्ण माहिती मला देण्यात यावी. खरेतर माझा व सभागृहाचा सुद्धा या विषयाला विरोध होता. प्रशासनाने दिलेल्या उत्तरात सन २००२ साली झालेल्या सर्वेक्षणानुसार झोपडपट्टयांची संख्या देण्यात आली आहे. परंतु सदर संख्या ही ११ वर्षांपूर्वीची आहे. त्याठिकाणी मोठ्या प्रमाणात नव्याने झोपड्या झाल्या आहेत. माझ्या प्रश्नाला उत्तर देताना ही सगळी माहिती देणे अभिप्रेत होते. कधी नव्हे इतक्या झोपड्या वाढल्या आहेत. अर्धवट माहिती दिलेली आहे. प्रत्यक्षात किती झोपड्या आहेत हे विचारलेले होते. महापालिका हद्दीतील सर्वच झोपडपट्टयांचे पुर्नसर्वेक्षण होणे अत्यंत गरजेचे आहे. आपले सर्वेक्षण २००२ साली झाले आहे. आपण आत्ता २०१३ मध्ये आहोत. संपूर्ण झोपडपट्ट्यांचे सर्वेक्षण करावे, त्याबाबतची कार्यवाही प्रशासन स्तरावर प्रस्तावीत आहे का? याची माहिती प्रशासनाने द्यावी. प्रश्न क्र. २ विचारला होता – सदर झोपडपट्टीमध्ये असलेल्या झोपड्यांपैकी किती झोपड्या/झोपडीधारक पात्र आहेत? व किती झोपड्या/झोपडीधारक अपात्र आहेत? माझ्या प्रश्नाला प्रशासनाने दिलेल्या उत्तरात सन २००२ च्या सर्वेक्षणातील १२८९ झोपड्यांपैकी ३८४ झोपड्या पात्र असून ९०५ झोपड्या अपात्र आहेत असे नमुद केले आहे. म्हणजेच सुमारे ७० टक्के झोपड्या अपात्र आहेत. इतक्या मोठ्या प्रमाणात झोपड्या अपात्र असतील तर महापालिका स्तरावर त्यासंदर्भात आपले काय धोरण आहे? याचे सुद्धा उत्तर हवे आहे. केंद्र शासनाच्या जेएनएनयुआरएम-बीएसयुपी योजना महापालिकेत मोठ्याप्रमाणात राबविण्यात येत आहेत. महापालिकेने सेक्टर २२ विठ्ठलनगर, वेताळनगर, अजंठानगर, मिलिंदनगर, उद्योगनगरच्या पुनर्वसन प्रकल्पांमध्ये १९९५ च्या पात्रतेचा निकषाऐवजी २००० पर्यंतच्या झोपडीधारकांना लाभ देण्यात येतो. गावडे साहेबांचे म्हणणे आहे की, राज्य शासनाने १९९५च्या पात्रतेच्या निकषाऐवजी सरसकटपणे सर्वच झोपडीधारकांचे पुनर्वसन बीएसयुपी योजनेअंतर्गत करण्यास प्रतिबंध केलेले नाही.

फुलेनगरमध्ये गोरगरीब, मागासवर्गीय व आदिवासी स्तराचे लोक आहेत. या समाजाच्या १९९५च्या पात्रतेच्या निकषाप्रमाणे पात्र असलेल्या झोपडीधारकांचे पुनर्वसन न करताच कायद्याने अपात्र ठरत असलेल्या झोपडीधारकांचे पुनर्वसन महापालिका कोणत्या कायद्याच्या आधारे करते आहे. अशा लोकांना केवळ एमआयडीसी सांगते म्हणून तीच एक प्लॅनिग ऑथोरीटी होऊ शकत नाही, तिथे महापालिका सुद्धा आहे. मी संपूर्ण माहिती घेतली. एमआयडीसीने सुविधा पुरवणे त्यांचे काम आहे. पात्र/अपात्र तपासणे हे महापालिकेचे काम आहे. ते त्यांच्या अधिकारात येत नाही. पावसाळा तोंडावर आला असताना सर्वांना बाहेर काढणार आहात का? सरसकट सगळ्यांनाच देण्याची कार्यवाही झाली पाहीजे. राजकीय दबावाखाली ठराविक लोकांना डोळ्यासमोर ठेवून करणार असाल तर त्याला तसेच उत्तर देऊ. कोर्टाचे सुद्धा दार वाजवू. प्रश्न क्र.३ सदर झोपडपट्टीचे ठिकाणी पात्रता निश्चित करण्याचे काम कधी सुरु करण्यात आले व ते कधी पूर्ण झाले या माझ्या प्रश्नाला प्रशासनाने दिलेल्या उत्तरात सन २००२ पासून फुलेनगर झोपडपट्टीचे ठिकाणी पात्रता निश्चित करणेचे कामकाज सुरु करण्यात आले आहे व ते आजपर्यंत सुरु आहे. अजूनही पात्रता निश्चित झालेली नाही. अंतिम काम सुरु आहे. आपण कोणाला अपात्र ठरवू शकत नाही. ९०५ हा आकडा सांगताय तो सुद्धा चुकीचा आकडा आहे. पात्र अपात्र हे ठरवण्याची लाँग प्रोसेस असताना ९०५ झोपड्या अपात्र आहेत हे कसे सांगताय? कागदपत्रे मागितली तर अनेक लोक सुद्धा पात्र ठरू शकतात. सन २००२ पासून झालेल्या झोपड्याची पात्रता आजपर्यंत निश्चित झालेली नसेलतर नेमके ते कधी होणार आहे? १२८९ झोपड्यांची पात्रता पडताळणी करण्यासाठी ११ वर्षांचा कालावधी पुरेसा थोडाथोडका नाही. बराच मोठा कालावधी आहे. आत्तापर्यंत पात्रता निश्चित करायला पाहीजे होती. तरी फुलेनगर येथिल झोपड्यांचे अंतिम पात्रता निश्चिती कधीपर्यंत करण्यात येईल? याचे सुद्धा उत्तर अपेक्षित आहे. प्रश्न क्र.४-फुलेनगर झोपडपट्टी क्षेत्रात महापालिकेच्या मंजूर विकास आराखड्यातील ३५ मी. एच.सी.एम.टी. आर. रस्त्याच्या क्षेत्रामध्ये एकुण किती झोपड्या आहेत? – ३५ मी. एच.सी.एम.टी.आर. च्या डीपी रस्त्याच्या क्षेत्रामध्ये ३४५ झोपड्या येत असल्याचे उत्तर प्रशासनाने माझ्या प्रश्नाला दिले आहे. प्रथमतः हा ३४५ चा आकडा २००२ च्या सर्वेक्षणाच्या आधारे दिला गेला आहे की आजरोजीच्या प्रत्यक्ष पाहणीच्या आधारे देण्यात आला आहे? याचा खुलासा प्रशासनाने करावा. जर २००२ च्या सर्वेक्षणाच्या आधारे असेल तर या ३५ मी. एच.सी.एम.टी.आर. च्या डीपी रस्त्याच्या क्षेत्रात किती झोपड्या आहेत हा प्रश्न आहे. माझ्या प्रश्नात मी. २००२ साली सदर रस्त्याच्या क्षेत्रातील झोपड्यांची संख्या किती होती असे विचारले नाही हे प्रशासनाला कळले नाही का? माझ्या प्रश्नाला उत्तर देताना सद्यस्थिती काय आहे याची माहिती देणे अभिप्रेत होते. ही माहिती आपल्याला देता आली नाही. २००२ साली सर्वेक्षण सुरु केले ते २०१३ आलेतरी अजून संपलेले नाही. पात्र अपात्रतेचे निकष कोणी कसे लावले. ९०५ हा आकडा कसा दिला? आपण

या लोकांवर अन्याय तर करत नाही ना? यांची दखल घेणे तुमचे काम आहे. फुलेनगर झोपडपट्टीचे ठिकाणी ३५ मी. एच.सी.एम.टी.आर. च्या डीपी रस्त्याच्या क्षेत्रात आजरोजी प्रत्यक्षात किती झोपड्या आहेत याचे उत्तर प्रशासनाने द्यावे. मा.महापौर साहेब, महापालिकेच्या डीपीतील एच.सी.एम.टी.आर. रस्त्याचे क्षेत्र सन २००६ पासून टिडीआरच्या मोबदल्यात ताब्यात घेण्याची प्रक्रिया जोमाने सुरु आहे. डिआरसी क्र. १८६ ते १९०, १९७ ते २१५, २२६, २४६ ते २४८, २७४, २९९,३१०,३२७, ३३८ ते ३४१, ३५१ ते ३५४, ३५८, ३६४, ३६५, ३७३, ३८८, ३९१, ३९४ ते ३९७, ४०६, ४०८ ते ४१९, ४३५ ते ४३९, ४४३, ४४७ ते ४५१, ४६०, ४६२, ४६६, ४६७, ४८०, ४८१, ४९८, ४९९, ५१३ ते ५१५, ५१८, ५३८ व ५५५ प्रमाणे जवळपास ५० प्रकरणांमध्ये आरक्षणांच्या काही क्षेत्रासह जवळजवळ १० लाख चौ. फुटांचे क्षेत्र डिआरसी क्र. चे वाटप करुन ताब्यात घेण्यात आले आहे. सदर क्षेत्र ताब्यात येऊन ९ वर्ष झाली असली तरी एच.सी.एम.टी.आर. रस्त्याच्या विकसनाबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही. डीआरसी विरुद्ध टीडीआरचे वाटप झालेतरी अजूनही कारवाई करत नाही. त्याठिकाणी वायसीएम हॉस्पीटलच्या कडेने रस्ता नेला आहे. या रस्त्याच्या कारवाईला कोणाचा विरोध असायचे कारण नाही. मुंबई-पुणे हायवेवर कलासागर हॉटेलच्या बाजूचा नाला टर्न करुन आतमध्ये वळवला आहे. तिथून पुढे एच.सी.एम.टी.आर. चा डिपी येतो. नेहरुनगर स्मशानभुमी इथे बस स्टॉप होणार आहे. ३४५ झोपड्या कोणत्या आहेत. यात आतमध्ये कारवाई करता येऊ शकत नाही. त्यांच्यावर कारवाई करायची तर पात्र अपात्रतेचे काम अजून पूर्ण झालेले नाही. एकिकडे एम.आय.डी.सी.ला त्याठिकाणी माहिती पुरवतो. दुसरीकडे हीच एम.आय.डी.सी. त्या-त्या ठिकाणी गार्डनचे ओपन आरक्षण असेल तरी ते बिनबोभाट केलेले नाही. आमच्याकडे प्लेग्राऊंड नाही. प्लेग्राऊंडचे आरक्षण वगळलेले असताना त्याच्यावर दबाव वाढवण्याऐवजी पावसाळ्याचा सुद्धा विचार केलेला नाही. झोपड्या खाली करुन घेताना त्याठिकाणी आपण पात्र अपात्र कसे ठरवणार आहात. एच.सी.एम.टी.आर. चा डीपी रस्ता करणार असलात तरी फुलेनगरचा संपूर्ण भागातील २०० ते ३०० झोपड्यांतील लोकांना तुम्ही बेघर करणार आहात का? पात्र लोक कसे पात्र झाले आहेत याचे पुरावे मी दिलेले आहेत. त्यांच्यावर कारवाई करत नाही. मात्र १९९५ आधीपासून जो तिथे राहतोय त्याला तुम्ही बेघर करणार असाल तर त्याला असे बेघर करता येणार नाही. भारताच्या संविधानाने सर्वांना समान न्याय दिलेला आहे. माझी कळकळीची विनंती असेल की, मी ज्या वॉर्डाचे नेतृत्व करते, त्या भागातील झोपडीधारकांचे पात्र अपात्रधारकांचे निकषांची प्रायोरीटी जोपर्यंत प्रशासनाकडून निश्चित होत नाही, तोपर्यंत या लोकांना बेघर करु नये. तसे एम.आय.डी.सी. यांना सुद्धा आदेश द्यावेत.

**मा.तानाजी खाडे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, फुलेनगर झोपडपट्टीचा विषय निघाला, त्यांचे अभिनंदन करतो. त्या विषयाला धरुन सेक्टर २२ चा एक विषय होता. शहर सुधारणा समितीचा सभापती असताना अतिशय चांगल्या पद्धतीने त्या परिसरातील झोपडपट्टयांचे पुनर्वसन व्हावे. या योजनेतून महापालिका प्रशासनाने त्यांच्या संगनमताने लक्ष घातले. पुनर्वसनासाठी प्रयत्न केले. त्यातून महापालिकेच्या जागेवर ज्या-ज्या ठिकाणी झोपडपट्ट्या झालेले आहेत, त्यांचे पुनर्वसन करण्याचा हेतू ज्यावेळी धरला होता त्यावेळी म्हटले होते, काही एम.आय.डी.सी. भागातील झोपड्यांचे सुद्धा पुनर्वसन करावे. आम्ही देखील राजकारणातून लोकांना न्याय मिळावा, पुनर्वसन व्हावे, निकष ठरवू नयेत, लोकांना घर द्यावे यासाठी आजपर्यंत प्रयत्न केले. परंतू आपला तो बाबा, लोकांचं ते कार्ट. काही जणांनी माझ्या परिसरात चांगल्या पद्धतीने पुनर्वसन चालू असताना मनात द्वेष निर्माण करुन कोणताही मार्ग धरुन त्या परिसरात एक-एक प्रश्न उपस्थित केला. त्यामुळे त्या परिसरात काही सुविधा देता येत नाही. दीड वर्ष झाले, त्या परिसरातील नागरीकांच्या अडचणी सोडवता येत नाहीत. सेक्टर २२चा प्रश्न चालू असताना रेड झोनमध्ये असताना लाखो लोकांना भूर्दंड भरावा लागतो आहे. कामे बंद पडलेली आहेत. द्वेषाचे एकच कारण आहे. काही राजकीय पक्षांनी लोकांमध्ये संभ्रम निर्माण करुन त्याठिकाणी विरोध केलेला होता. तळवडे असेल, त्रिवेणीनगर असेल, रावेत असेल, चिखली असेल, त्या सर्व परिसरातील लाखो लोकांना रेडझोनचा त्रास सहन करावा लागतो आहे. नागरीक हवालदील झाले आहेत. दोन पैसे खर्च करुन जागा विकत घेतल्या होत्या. त्यावर घरे बांधली आहेत. भविष्यकाळात मुलांचे काय होणार या विचाराने या लोकांना झोपा येत नाहीत. लोकांना त्रास होतो आहे. आज आपल्याला हा त्रास झालातर कळतेय किती त्रास होतो ते. हेच मला ताईंना सांगायचे होते. सर्वांना नम्र विनंती आहे, आपण ज्या प्रभागातून निवडून आलेलो आहोत, तिथेच चांगले लक्ष घातले तर निश्चितच प्रभागात चांगली कामे होणार आहेत. दुस-याच्या प्रभागात ढवळाढवळ केलीतर आपल्याला सुद्धा त्यांची मानहानी सहन करावी लागते आहे. भारतीय संविधान काय सांगते आहे, आज या सभागृहात चांगल्या पद्धतीने संभाषण घडो. हे लोकशाहीचे मंदीर आहे. सत्ता, न्याय, शांततेचे दार आहे. विकासाचा मार्ग चांगल्या पद्धतीने सुकर होण्यासाठी इथे संभाषण घडो. लोकांनी अर्वाच्य शब्दांत बोलू नये. एखाद्या विषयाला हात घातला असताना, लोकांना त्रास देत असताना आनंद होतो, पण स्वतःला तोच त्रास भोगावा लागतो आहे.

**मा.गावडे (सहा.आयुक्त,झो.नि.पु.)** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सदस्य, महात्मा फुलेनगर, भोसरी ही झोपडपट्टी एमआयडीसीच्या जागेवर वसली आहे. ज्यावेळी ही झोपडपट्टी घोषित केलेली होती, त्यावेळी झोपडपट्टी क्षेत्र १९८७८ इतके होते. २००२ साली जेंव्हा पुर्नसर्वेक्षण केले तेव्हा हे क्षेत्र ३३६२८ असल्याचे आढळून आले. १९८७ साली पिंपरी

चिंचवडमध्ये प्रथम झोपडपट्ट्यांची गणना झाली. त्यावेळी ४४४ झोपड्या होत्या. त्या क्षेत्रावर २००२ साली पुर्नसर्वेक्षण केल्यानंतर ही संख्या १२८९ आढळून आली. त्यात ३८४ पात्र व ९०५ अपात्र झोपडीधारक आहेत. ज्याप्रमाणे झोपडीधारक पुरावे सादर करतात, त्याप्रमाणे पात्रतेचे काम होते. हे काम विभागामार्फत चालू असते. निरंतर प्रक्रिया आहे. पुरावे सादर केल्याशिवाय त्यांना पात्र करु शकत नाही.

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, खरेतर मी २००२ बद्दल काहीच विचारले नव्हते. आपल्याला सद्यस्थितीची माहिती आहे का? प्रशासनाकडे माहिती उपलब्ध नव्हती तर माहिती उपलब्ध नाही असे कळवायचे होते. सभागृहाला खोटी माहिती का देता? माझ्या प्रश्नांत २००२ चा उल्लेख आहे का? तुमच्याकडील माहितीचे मला देणेघेणे नाही. मी तुम्हाला आजच्या सद्यस्थितीचा प्रश्न विचारलेला आहे.

**मा.गावडे (**सहा.आयुक्त,झो.नि.पु.**)** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सद्यस्थितीची माहिती उपलब्ध होऊ शकत नाही. पुनःश्च सर्व्हे करावा लागेल.

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, तुम्ही तसे सांगा तुमच्या शब्दांत तसे आले पाहीजे.

**मा.गावडे (**सहा.आयुक्त,झो.नि.पु.**)** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सदस्य, पिंपरी चिंचवडमध्ये अपात्र झोपडीधारक यांना लवकरात लवकर ओळखपत्र मिळावे म्हणून नागरी सुविधा केंद्रातून सेवा सुरु केली आहे. केवळ ७ दिवसांत काम पूर्ण केले जाते. ७ दिवसांत ओळखपत्र देण्यासाठी सर्वांच्या सोयीसाठी पुरावे निश्चित केलेले आहेत. साधारणतः १ महिन्यानंतर त्या-त्या ठिकाणी नागरी सुविधा केंद्रात सेवा उपलब्ध होऊ शकेल. पात्रता निश्चित करण्याची प्रोसेस आहे ती सुरु राहणार आहे. एमआयडीसीच्या जागेवरील झोपडपट्टीचे पुनर्वसन करताना एमआयडीसी महामंडळाकडून राबवण्यात येणार असलेबाबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड यांना कळवले होते. त्याची प्रत महानगरपालिकेकडे उपलब्ध आहे. पुरावे सादर केल्यानंतर ते पात्र होऊ शकतात. १९९५ पूर्वीचा पुरावा सादर केल्यानंतर त्यांना पात्र ठरवता येते, याचे पेपरमध्ये जाहीर आवाहन केलेले आहे. मूळात महापालिकेकडून ही कारवाई प्रस्तावित नाही. त्यांनी आम्हाला पुरावे दिले तर पुरावे तपासून देता येतील. त्यांनी पुरावे सादर केलेतर पात्र अपात्र आहेत का नाही त्याची माहिती देता येईल.

**मा.जितेंद्र ननावरे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, माझ्या सहकारी मा.सिमा सावळे यांनी अतिशय चांगले प्रश्न विचारलेले आहेत. वास्तविक पाहता, झोपडपट्टी वाढली आहे. त्यांनी आत्ताच सांगितले, विकास झालाच पाहीजे. आम्हीही त्याच मताचे आहोत. कुठेतरी एका ठिकाणी १०० मते पडली म्हणून ३४० झोपडपट्ट्यांवर कारवाईची कृति करावी हे चुकीचे मत आहे. रस्ता झालाच पाहीजे, विकास झालाच पाहीजे. आम्ही कोर्टात जाणार नाही. ज्या झोपड्या बाधीत आहेत, त्यांचा त्याच ठिकाणी विकास झाला पाहीजे. यामागे राजकीय हेतू नाही. आपल्यावर अन्याय झाला म्हणून इतरांवर अन्याय झाला पाहीजे असे आमचे म्हणणे नाही.

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, माझी विनंती आहे, एम.आय.डी.सी. ला स्वतः पत्र लिहून झोपडीधारकांचे पुनर्वसन करायचे काम आपले आहे. पात्र अपात्रची एंट्री आपल्याकडे असल्यामुळे त्याची डेडलाईन द्यावी. शहरातील सगळ्या झोपड्यांची पात्र अपात्रता तपासून घ्यावी. एमआयडीसी यांना पत्र द्या. आपण ऑथोरीटी आहात. आपण झोपडपट्ट्यांत सेवासुविधा पुरवल्या आहेत. अजंठानगरमध्ये आपण पुनर्वसन केलेले आहे. तिथे हा न्याय असेलतर इथे सुद्धा तोच न्याय असला पाहीजे. खरेतर चर्चा खूप जास्त झाली आहे. सहकारी नगरसेवकांना एकच सांगायचे आहे, आपला तो बाब्या दुस-याच ते कार्टं असे आम्ही कधीच करत नाही. महापालिकेच्या विरुद्ध निर्णय लागायचे एकच कारण आहे, सर्वसामान्य नागरीक घर बांधताना त्यांना खास असा अभिप्राय रेडझोनच्या हद्दीत देत होतो. त्याच ठिकाणी महापालिकेसारखी संस्था ४० कोटींचा प्रोजेक्ट राबवते म्हणून न्यायालयात दाद मागायला गेलो होतो. त्यामागची भूमिका समजून घ्या. एका प्रोजेक्टसाठी तत्कालिन आयुक्त पाच दिवस दिल्लीत मुक्काम ठोकून होते. मा.महापौर साहेब, आपली इच्छा असेल तर तिथून रेड झोन जाईल या आशेने आम्हाला अपेक्षा होती. जोपर्यंत महापालिका नाक दाबत नाही तोपर्यंत सर्वसामान्य नागरीकाचा श्वास मोठा होऊ शकत नाही. झोपडीधारकांच्या विरुद्ध असते तर दुस-यांदा नगरसेवक झाले नसते. शंभर मतांसाठी काम करणारे, झोळी घेऊन फिरणारे आम्ही निश्चितच नाही. ज्यांना अपात्र सांगितले त्यांचे पात्रतेचे निकष तपासून घेऊन त्यांचे पुनर्वसन करा. त्यांना पत्र द्या.

**मा.योगेश बहल** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आपल्या शहराच्या प्रवेशद्वारावर असे लिहिले जाणार आहे, आओ जाओ घर तुम्हारा है। पिंपरी चिंचवड तुम्हारा है। दोन वर्षांपूर्वी फुलेनगरबद्दल चर्चा झाली होती. नाल्याला खोदून नाल्यामध्ये बांधकाम चालू होते. रोजच्या रोज झोपड्यांमध्ये वाढ चाललेली आहे. अर्धा नाला काबीज करुन टाकला आहे. तुम्ही शिस्त पाळा. सगळ्यांना ज्ञान नका शिकवू. त्याठिकाणी गोरगरीब स्वतःचे पैसे खर्च करुन कष्टाने

घर घेतो, त्याच्यावरच शास्ती लावली जाते. घर पाडले जाते. बुलडोझर फिरवला जातो. झोपडीधारक शहराचा मालक झाला का काय? सरळ कुठेतरी जागेचा कब्जा करायचा. अशा झोपडपट्टया घोषित करा. कोट्यावधी रुपये पैसे खर्च करुन सगळे करुन द्यायचे. यांना जावईच करुन घ्यायचे राहीले आहे. स्वतःचा खिसा कापून घर बांधतो त्याच्या घरावर बुलडोजर फिरवतात. दुसरीकडे नवीन झोपडपट्टी होणार नाही यावर नियंत्रण कोण करणार? जाऊन बघा दोन वर्षांत काय कंडीशन होते. पाणी, लाईट फुकट, ते बंद करुन पहा. तिथे नको ती व्यवस्था आहे. भंगारवाल्यांनी सगळा जागांचा कब्जा केला आहे. ते तिथले एजंट आहेत. दलाली करतात. संत तुकाराम नगरमधील लोकांनी घरे बांधायची नाहीत. यांनी झोपड्या बांधल्यातरी त्यांचे कोणी काय वाकडे करणार नाही. ही दहशत दुस-यांना द्या. कष्टाने पण झोपडी बांधता येते. शहरात इथून पुढे झोपडपट्टी होऊ नयेत ही काळजी घ्यायचे,संरक्षण द्यायचे काम प्रशासनाचे नाही का? २००० पर्यंतच्या झोपड्यांचे पुनर्वसन करत असताना दुसरीकडे जे लोक स्वतःच्या पैशाने घर घेतात, त्यांच्यावर किती अन्याय करतो. कोट्यावधी रुपये खर्च करुन घरे बांधून देतो. बाहेरून येऊन लोक घरे बांधतात. गरीबाला दंड होतो हे ठिक आहे का? पक्की घरे बांधणारे चोर आहेत का? या लोकांना बेघर करायचे का? रोडला खेटून, पुलाला खेटून इथपर्यंत बांधकाम चालू आहे ते काढायला नको का? जुनी घरे आहेत ते ठिक आहे. सर्वांना न्याय सारखा असावा. पिंपरी कॅम्पमध्ये स्मशानभूमीच्या कडेने गेलात तर तिथे सुद्धा झोपडया झालेल्या आहेत. शहरात झोपडया होऊ नयेत याची दखल कोण घेणार आहे. हा फक्त फुलेनगरचा प्रश्न नाही. कासारवाडीत काय चालले आहे, ते तुम्ही बघा. तुम्ही म्हणाल नवीन पोलिस यंत्रणा घेतोय. त्यालासुद्धा आम्ही मान्यता देणार आहोत. यांची जबाबदारी तुम्ही सुद्धा स्विकारा. हे थांबले पाहीजे यावर कार्यवाही झाली पाहीजे. झोपडपट्टयांचे निरीक्षण करा, चौकशी करा. पावसाळ्यानंतर कारवाई व्हायला पाहीजे.

**मा.महापौर** – प्रश्नोत्तरांचा तास संपलेला आहे.

-------------

**मा.तानाजी खाडे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक - १

दिनांक - २७/६/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भः-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.प्रशा/१अ/कावि/२८/२०१३ दि.८/१/२०१३

२) मा.स्थायी समिती सभा दिनांक १५/०१/२०१३ठराव क्र.२४२३ नुसार

३) मा.महापालिका सभा ठ.क्र.२८७ दि.२०/०५/२०१३

मनपा परिसरातील अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण नियंत्रण व निर्मुलनासाठी महापालिका क्षेत्रात एक विशेष पोलिस ठाणे प्रत्येक अ, ब, क ड प्रभागासाठी चार पोलिस चौक्या याकरिता पदे निर्मिती करणेकामी प्रस्तावात नमुद परिशिष्ट अ प्रमाणे ७८ पदे,परिशिष्ट ब प्रमाणे २८ पदे अशी एकूण १०६ पदे राज्य शासनाच्या आस्थापनेवर निर्माण केली जाणार असून त्यावरील खर्चाची प्रतिपुर्ती आगावू (Advance Payment) च्या स्वरूपात मनपाने करावयाची असून ही बाब विचारात घेता अ) प्रस्तावात नमुद शासन निर्णयात नमुद केलेल्या आणि मनपासाठी अनुज्ञेय असलेल्या पोलिस अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व भत्ते, निवृत्तीवेतन अंशदान होणा-या खर्चास व सदर खर्चाची रक्कम आगावू तिमाही हप्त्याच्या स्वरूपात राज्य शासनाकडे/संबंधीत पोलिस आयुक्तालयाकडे भरण्यास ब) सदर अधिकारी व कर्मचारी यांना पुरविण्यात येणा-या वाहन, कार्यालय व इतर सुविधांवर येणा-या खर्चास व तो शासनाकडे/संबंधीत विभागाच्या पोलिस आयुक्तांकडे आगावू स्वरूपात भरण्यास क)सदर कक्षाच्या निर्मितीमुळे होणा-या खर्चाची पुर्तता करण्यासाठी मनपाच्या अंदाजपत्रकात नवीन लेखाशिर्ष निर्माण करून त्याखाली आवश्यक तरतूद प्रतिवर्षी करण्यास मान्यता देणेत येत आहे तसेच दिनांक २ मार्च २००९ च्या शासन निर्णयानुसार अनाधिकृत बांधकाम निर्मूलनासाठी स्वतंत्र, सक्षम व समर्पित यंत्रणा निर्माण करणेस मान्यता देण्यात येत आहे.

**मा.संजय काटे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.योगेश बहल** – मा.महापौर साहेब, सदरचा विषय महापालिका सभेसमोर आला आहे. शासनाचा जी.आर. २ मार्च २००९ च्या शासन निर्णयानुसार अनधिकृत बांधकामांसाठी जे काही अधिकारी †डिशनल स्टाफ लागणार आहे. या विषयाच्या सोबत गव्हर्नमेंट जी.आर.प्रमाणे रेव्हेन्यूचा अधिकारी घ्यावा लागणार आहे. ४ ऐवजी ६ प्रभाग करणार आहेत. स्वतंत्र यंत्रणा राबविण्यासाठी अधिकारी आहेत. स्वतंत्र यंत्रणा राबविण्यासाठी तुम्हाला अधिकारी,स्टाफ सर्वांची मान्यता घ्यावी लागणार आहे. अशी उपसूचना देऊन मान्यता देतोय. शासनाचा माणूस नियुक्त करायचा आहे. इन्फ्रास्ट्रक्चरची आवश्यकता लागणार आहे. भविष्यात शहरात बेकायदेशीर बांधकामे होऊ नयेत ही सर्व पक्षांची इच्छा आहे. परंतू भविष्यात शहरात एकही झोपडपट्टी वाढता कामा नये. त्यासाठी जी काही यंत्रणा लागणार आहे. त्या विषयाच्या अनुषंगाने उपसूचना मांडतो आहे - दिनांक २ मार्च २००९ च्या शासन निर्णयानुसार अनाधिकृत बांधकाम निर्मूलनासाठी स्वतंत्र, सक्षम व समर्पित यंत्रणा निर्माण करणेस मान्यता देण्यात यावी.

**मा.उल्हास शेट्टी** - मा.महापौर साहेब, सदर उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.तानाजी खाडे** – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.शमिम पठाण** – मा.महापौर साहेब,आयुक्तांच्या अतिशय आवडीचा, जिव्हाळ्याचा असलेला विषय आज आपण इथे मंजूर करतोय. संपूर्ण महाराष्ट्रात काय तर भारतात पिंपरी चिंचवड महापालिकेला प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळाले आहे. सध्या आयुक्तांच्या कर्तृत्वामुळे अतिशय बकाल वस्तीचे शहर म्हणून सगळीकडे त्याचा प्रचार-प्रसार व प्रसिद्धी सुद्धा होते आहे. असे बकाल वस्ती होण्यापासून शहर वाचवण्यासाठी आयुक्तांनी २००९च्या परिपत्रकानुसार व शासनाच्या निर्णयानुसार आपल्यासमोर आज विषय आणला आहे. विषयाला विरोध नाही परंतू आपल्या आवडीचे डिपार्टमेंट कशासाठी पाहीजे. आपण बोललोतरी लोक पाळत ठेवतात. मनात नसले तरीही कितीही टेन्शन आलेतरी छोटी-छोटी कामे करतो, डिपार्टमेंटच्या कामात मदत करतो असे मला वाटत नाही. त्यांचा फक्त सपोर्ट आपल्याला असतो. तुमचा धाक असल्यामुळे आपले लोक हे काम करतात. त्यांचे काम नसले तरी करत आले होते. जबाबदारी नसलीतरी जबाबदारी ढकललेली नाही. तुम्ही जी काही कारवाई केलेली आहे, त्यांना अधिकार नसताना, काम नसताना मर्यादेपलिकडे जाऊन आपण सांगितल्यामुळे काम केलेले होते. माझा कोणी नातेवाईक नाही. परंतू जो अधिकारी पोटतिडकीने आम्ही सांगितलेली कामे करतो. आमची स्वतःची कामे नाहीत. आमच्या वॉर्डातली कामे करतात त्यांना आमच्याकडून ही वागणूक मिळाली आहे त्याबद्दल खरेतर दुःख होते व खेदसुद्धा वाटतो. आत्ताच मा.अध्यक्ष यांनी सांगितले आहे. आपण पोलिसांची १०० पदे मंजूर करतोय. मागील वर्षी असेच सांगितले होते. कायदा सुद्धा झालेला आहे. तुम्ही बाहेरुन जी मदत घेता, यासाठी कोट्यावधी रुपचे खर्च करतो आहोत. त्याआधी कोणासाठी परिपत्रकामध्ये शासनाचा, तुमच्या हितात असलेला अधिकार असलेला अधिकारी याची नेमणूक तुम्ही केलेली आहे काय? याआधी सुद्धा आपण पोलिस डिपार्टमेंट मागवून घेतलेले होते. नियुक्ती केलेली होती. त्याची थोडी माहिती घ्या. अनुभवी लोक असतील तर त्यांचा अनुभव ऐकून घ्या. नंतर १०६ लोकांना याठिकाणी बोलवा. तो अनुभव आम्हाला आधी सांगावा. नाहीतर वाघाच्या गळ्यात घंटा बांधल्यासारखे होते. यावरुन काम असेलतर ओळखून घ्या. या परिपत्रकाप्रमाणे आधी अधिका-याची नियुक्ती करा नंतर काम सुरु करा. वॉर्डाचा, पिंपरी चिंचवड शहराचा विकास करताना, विकास कामे करणा-यांनाच अतिक्रमण कामासाठी पाठवतो. म्हणून तुम्ही आधी अधिका-याची नियुक्ती करा. त्यासाठी अतिरिक्त लोक लागतात त्यांची नेमणूक करा. नंतर पोलिस डिपार्टमेंटकडून आणखी ६०० लोक बोलवा. एका डेप्युटीबरोबर एक पोलिस राहू द्या. आधी अधिकारी वाढवा. विशेष म्हणजे स्थापत्य विभागाची कामे अजून ठप्प झालेली आहेत. तुम्ही आल्यापासून कोणतीही स्थापत्यची कामे होत नाहीत. १/१ फाईलसाठी कोट्यवधी रुपये कन्सल्टंट यांना देतो. साधा खड्डा बुजवायचे काम सुद्धा होत नाही. कोणतीही

स्थापत्यची कामे आहेत. तुमच्यापुढे एकच एक काम आहे अतिक्रमणाचे. त्यासाठी हे लोक दुसरे कोणतेच काम करत नाही. मागील वर्षी बोलायला मिळाले नाही. आम्ही तुमच्याकडे काम घेऊन आलो, आमच्या दृष्टीने महत्वाचे काम होते. ते काम बजेटप्रमाणे मांडल्यामुळे तसेच आमच्याकडे राहीले. प्रत्येक नगरसेवकाला आश्वासन दिले होते. जाहीरनाम्यात काम सांगितले होते ते तसेच राहीले. आमच्या दृष्टीने पहिले वर्ष फुकट गेले. तुमच्या अंदाजपत्रकातील कामे सुद्धा झालेली नाहीत. दुसरे वर्ष आलेतरी त्यामध्ये तुम्ही लॉक केलेली अंदाजपत्रकातील कामे आमच्यासमोर आणावीत. आपल्याला कामे सोडवता आली नाहीत. आमच्या काही नेत्यांनी सांगितले, १० ऐवजी ५ ठेवली. १० मधील ५ कामे काढली. आम्ही नव्याने सुचवलेली कामे त्यांना निधी दिलेला नव्हता. त्यासाठी ५ वेळा एस्टीमेट करताना ५ लाखाऐवजी दीड पट करायचे असेलतर ते फक्त अधिका-यांनाच करता येते. तेव्हाच साडेसात लाखाचे काम होईल. आम्हाला वाटले नुसते हेड ओपन केलेतरी काम करता येईल. वाढवून घेता येईल. कुठून वाढवायचे, कुठे वाढवायचे. कामाचे बजेट बदलता येत नाही. आपल्या मनातील आपण ठरविलेली कामे यासंदर्भात सुद्धा होणे नाही. आम्हीच देणार, कुठून देणार. सिमाताईकडून घेऊन कोणी प्रभागातील आमच्या तुमच्यात वाद निर्माण करतोय. कामाचा बट्ट्याबोळ करताय. तुम्ही किती कामांचे नियोजन केलेले आहे. लोकांना २००९ मध्ये कामावरुन काढले होते, त्याप्रमाणे २००४ पासून निवृत्तीवेतन मिळत नाही. पूर्वीचे लोक, १०६ पदे भरणार त्यामध्ये मिळाले तरी शंका व्यक्त केलेली आहे. सरकारकडे तसा खुलासा मागवला आहे का. खर्च करताना १०६चा फक्त पगार देणार. २ वर्षांत रिटायर्ड होणार आहेत. अशा लोकांच्या निवृत्ती वेतनाचे काय. आपण ते देणार आहात का. सरकारी किंवा गव्हर्नमेंटकडे लोक घेताना १०६ पदे भरताना आपल्या सुद्धा अटी ठेवा. नियुक्ती केली असेल तर काय झाले? कोणीही शाळेने अपॉईंट केलेले लोक घेणार का ते विचारा. विभागाला नको असलेले लोक ते आपल्याकडे देतील, ते आपण घेणार आहोत का. आपल्याला काही बंधन नाही. काही अटी ठेवणार आहोत. त्यांचा पगार आपण देणार आहोत. लोकांचे निवृत्ती वेतन देऊ शकतो का ते पहा. आपण डबल खर्च पुरवणार नाही या दृष्टीकोणातून आत्ता सांगितले असेल तर आत्ता निम्मे लोक घ्यावेत अशी तुम्हाला विनंती करतो. अनुभव पाहून पूर्ण १०६ जण मागवतात. या सर्क्युलरप्रमाणे आधी अधिकारी नेमा. अनुभवी अधिका-याची नेमणूक करा. आमच्याकडे जे.ई. नाहीत. दोन प्रभागांसाठी एक जे.ई. नुसता पोलिस नियुक्ती किंवा डिपार्टमेंट नियुक्तीसाठी हा जी.आर. वापरु नका. आस्थापना, इंजिनिअर, सहाय्यक आयुक्त लागणार आहेत. त्यांचा नेमणुकीसाठी सुद्धा उपयोग करावा. नंतरच विभागाचे लोक मागवावेत.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक – २९६ विषय क्रमांक – १

दिनांक - २७/६/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.प्रशा/१अ/कावि/२८/२०१३ दि.८/१/२०१३

२) मा.स्थायी समिती सभा दिनांक १५/०१/२०१३ठराव क्र.२४२३ नुसार

३) मा.महापालिका सभा ठ.क्र.२८७ दि.२०/०५/२०१३

मनपा परिसरातील अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण नियंत्रण व निर्मुलनासाठी महापालिका क्षेत्रात एक विशेष पोलिस ठाणे प्रत्येक अ, ब, क, ड प्रभागासाठी चार पोलिस चौक्या याकरिता पदे निर्मिती करणेकामी प्रस्तावात नमुद परिशिष्ट अ प्रमाणे ७८ पदे,

**परिशिष्ट अ**

नागरी पोलिस यंत्रणेसाठीचा आकृतीबंध

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी (असुधारीत) | क वर्ग मनपासाठी पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | सहा.पोलिस आयुक्त/पोलिस उप अधिक्षक | ८०००-२७५-१३५०० | १ |
| २ | पोलिस निरीक्षक | ७४५०-२२५-११५०० | १ |
| ३ | सहा.पोलिस निरीक्षक | ६५००-२००-१०५०० | — |
| ४ | पोलिस उप निरीक्षक | ५५००-१७५-९००० | ६ |
| ५ | सहा.पोलिस उप निरीक्षक | ४५००-१२५-७००० | — |
| ६ | पोलिस हवालदार | ४०००-१००-६००० | ६ |
| ७ | सशस्त्र पोलिस शिपाई | ३०५०-७५-४५९० | ३६ |
| ८ | महिला पोलिस शिपाई | ३०५०-७५-४५९० | २४ |
| ९ | पोलिस नाईक | ४०००-१००-६००० | ४ |
| | **एकूण** | | **७८** |

परिशिष्ट ब प्रमाणे २८ पदे

## परिशिष्ट ब

## नागरी गुन्ह्यांच्या नोंदणी, तपास व खटला भरणेकामी स्थापन करावयाच्या विशेष पोलिस स्टेशनसाठीचा आकृतीबंध

| अ. क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | अ/ब/क मनपांसाठी पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | सहा.पोलिस निरीक्षक | ६५००-२००-१०५०० | १ |
| २ | पोलिस उप निरीक्षक | ५५००-१७५-९००० | १ |
| ३ | सहा.पोलिस उप निरीक्षक | ४५००-१२५-७००० | २ |
| ४ | पोलिस हवालदार (सशस्त्र) | ४०००-१००-६००० | ६ |
| ५ | पोलिस शिपाई (सशस्त्र) | ३०५०-७५-३९५०/८०/४५९० | १४ |
| ६ | कनिष्ठ लिपिक | ३०५०-७५-३९५०/८०/४५९० | २ |
| ७ | वाहन चालक | ४०००-१००-६००० | २ |
| | **एकूण** | | **२८** |

अशी एकूण १०६ पदे राज्य शासनाच्या आस्थापनेवर निर्माण केली जाणार असून त्यावरील खर्चाची प्रतिपुर्ती आगावू **(Advance Payment)** च्या स्वरूपात मनपाने करावयाची असून ही बाब विचारात घेता अ) प्रस्तावात नमुद शासन निर्णयात नमुद केलेल्या आणि मनपासाठी अनुज्ञेय असलेल्या पोलिस अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व भत्ते, निवृत्तीवेतन अंशदान होणा-या खर्चास व सदर खर्चाची रक्कम आगावू तिमाही हप्त्याच्या स्वरूपात राज्य शासनाकडे/संबंधीत पोलिस आयुक्तालयाकडे भरण्यास ब) सदर अधिकारी व कर्मचारी यांना पुरविण्यात येणा-या वाहन, कार्यालय व इतर सुविधांवर येणा-या खर्चास व तो शासनाकडे/संबंधीत विभागाच्या पोलिस आयुक्तांकडे आगावू स्वरूपात भरण्यास क)सदर कक्षाच्या निर्मितीमुळे होणा-या खर्चाची पुर्तता करण्यासाठी मनपाच्या अंदाजपत्रकात नवीन लेखाशिर्ष निर्माण करून त्याखाली आवश्यक तरतूद प्रतिवर्षी करण्यास मान्यता देणेत येत आहे तसेच दिनांक २ मार्च २००९ च्या शासन निर्णयानुसार अनाधिकृत बांधकाम निर्मूलनासाठी स्वतंत्र, सक्षम व समर्पित यंत्रणा निर्माण करणेस मान्यता देण्यात येत आहे.

अनुकूल - ६७ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

**मा.अपर्णा डोके** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक - २

दिनांक - २७/६/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.भूजि/१/कावि/१३६/२०१३ दि.१०/०४/२०१३

२) मा.स्थायी समिती सभा दिनांक १६/०४/२०१३ ठराव क्र.३२७७ नुसार

३) मा.महापालिका सभा ठ.क्र.२८८ दि.२०/०५/२०१३

प्रस्तावासोबत जोडलेल्या पिंपरी चिंचवड मनपा भूमि जिंदगी विभागाच्या मिळकत वाटप नियमावली २०१३ यास मान्यता मिळणेकामी व त्यानुसार शासनास सादर करणेकामी सदरच्या विषयास मान्यता देणेत येत आहे.

**मा.सविता साळुंके** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.तानाजी खाडे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ तहकूब ठेवण्यात यावा अशी सूचना करतो.

**मा.मंगलाताई कदम**– मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

विषय क्रमांक – २ ठराव क्रमांक - २९७

दिनांक - २७/६/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.भूजि/१/कावि/१३६/२०१३ दि.१०/०४/२०१३

२) मा.स्थायी समिती सभा दिनांक १६/०४/२०१३ ठराव क्र.३२७७ नुसार

३) मा.महापालिका सभा ठ.क्र.२८८ दि.२०/०५/२०१३

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल - ६७ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

**मा.साधना जाधव** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ३ ठराव क्रमांक - २९८
दिनांक - २७/६/२०१३ विभाग - मा.आयुक्त

**संदर्भः-** १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.भुजि/१/कावि/२०१/२०१३ दि.९/५/१३.
२) मा.स्थायी समिती सभा दि.२१/५/२०१३, ठराव क्रमांक ३३८२ नुसार

राष्ट्रीय फेरीवाला धोरण अंमलबजावणी करणेबाबतची मा.शहर फेरीवाला समितीची बैठक दि.५/४/२०१३रोजी अध्यक्ष शहर फेरीवाला समिती मा.महापौर यांचे अध्यक्षतेखाली पार पडली. सदर बैठकीमध्ये खाली नमुद केल्याप्रमाणे शहर फेरीवाला समिति ठराव क्र.१ मध्ये नमूद केलेप्रमाणे फेरीवाल्यांसाठी नोंदणी फी, विक्रेता फी, नुतणीकरण फी, आणि दंड इ. ठरविणेत आले आहेत. सदरचे दरास मान्यता देणेत येत आहे.

**मा.मंदा आल्हाट-** मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.प्रशांत शितोळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, हा विषय बघायला गेलोतर शहराच्या दृष्टीकोणातून महत्वाचा आहे. नुसते फेरीवाला धोरण ठरवून चालणार नाही. गेले १२ ते १३ वर्षे कितीतरी वेळा हे धोरण आमच्यासमोर आले आहे. त्याचे पुढे काय केले. अगदी राष्ट्रीय पातळीपासून शासनस्तरावर असले तरी फेरीवाल्यांचा विषय गोरगरीबांशी निग़डीत असल्यामुळे या विषयाबाबतीत अतिशय चांगल्याप्रकारे पूर्णपणे नियमावली होणे फार गरजेचे आहे. मागील वर्षी आपल्या शहरातील सर्व फेरीवाल्यांना आय कार्ड देण्याबाबत विषय आला. त्यानंतर काय होते. काही नाही. दर २ वर्षांनी विषय येणार. रिवाईज होणार. आपल्या शहरात इतकी लोकसंख्या वाढते आहे. नुसत्या सांगली परिसरातील सांगितले तर विश्वास बसणार नाही. सांगवीमध्ये किमान ४,००० फळवाले, हातगाडीवाले आहेत. पहिली गोष्ट या फेरीवाल्यांना लायसन्स देणार का. दरवर्षी धोरण ठेवून काय करताय. सोयीसुविधा उपलब्ध करुन देणार का. प्रशासनाची, आमची सुद्धा हिच भावना आहे. कोणालाही त्रास व्हावा. कोणी शहरात येऊ नये अशी भावना नाही. दरवर्षी धोरण ठरवून तुम्ही मात्र अंमलबजावणी करायची नाही. आज शहरातला बकालपणा वाढल्याशिवाय राहणार नाही. छोट्या गल्लीबोळांत फेरीवाले फिरत असतात. बाहेरुन आलेल्या या लोकांमधील किमान ३० टक्के चोर असतात. त्यांची जबाबदारी कोणी घ्यायची. आयडीया द्यायला पाहीजे. एरिया ठरवून द्यायला पाहीजे. सुरक्षित सोडून द्या. आपल्या शहरातील नागरीकांचे आयुष्य, भवितव्य धोक्यात येत असेल तर या लोकांना कुठेतरी बांधून ठेवले पाहीजे. आपल्याला भिड नडली

आहे. धोरण ठरवले आहे. खडकी, बोपोडी हा आपल्या महापालिकेचा परिसर नाही. तरीसुद्धा तिथून दररोज किमान ५०० हातगाड्या सांगवीत येतात. याबाबत नियंत्रण कोण ठेवणार. सर्व सांगून पोलिसांना सांगून सुद्धा त्यांचा विषय म्हणून त्यांच्यावर सुद्धा बंधन घातले पाहीजे की, एका परिसरातून दुस-या जागी जाता येणार नाही. दुस-या परिसरात धंदा करता येणार नाही. आयकार्ड द्या. गाड्यांना नंबर द्या. कारवाई केलेल्या गाड्या सोडून द्या. शहरात किती बकालपणा वाढतो आहे. फळवाले यांच्याकडून वसूली होणार नसेलतर शहराची सगळी मोठी दुर्दशा होते. हा विषय कित्येक वेळा मंजूर होतो. सगळ्या जुन्या लोकांना विचारा. कितीतरी वेळा विषय आला. धोरण मंजूर का होत नाही. नवीन विकसित परिसरात लोकसंख्या वाढतच राहणार आहे. त्याप्रमाणे फळवाल्यांची संख्या वाढवली पाहीजे. नवीन लायसन्स दिले पाहीजेत. २/४ वेळा लायसन्स दिले पाहीजे. एकदा दिल्यावर पुन्हा देत नाहीत. चोरीचे प्रमाण वाढते आहे. यासाठी अंमलबजावणी करणारे शंभर टक्के प्रशासन जबाबदार आहे असे मला वाटते. हा विषय इथे अशा पद्धतीने यायची गरज नाही. महापौर हा प्रत्येक समितीचा अध्यक्ष असतो. हा विषय अजेंडावर यायची गरज नाही. तिथे आत्ताच्या विषयासाठी राजकीय लोकांना पुढे करतो हे बरोबर नाही. जेव्हा चांगल्या प्रकारच्या धोरणाची अंमलबजावणी करुन आत्ताच्या विषयात सोयीनुसार वसुली करतो. आमच्या अंगावर ढकलून देणार. अंमलबजावणी करणारे तुम्ही. तुम्ही अंमलबजावणी करत नाही. धोरण नीट ठरवत नाही. मग आम्हाला का जबाबदार ठरवताय. आम्ही मान्यता दिल्यानंतर त्याची अंमलबजावणी करणे तुमचे काम आहे. विरोधाभास करणारे विषय आमच्यासमोर आणायचे. आमच्याच माथी मारुन द्यायचे. हे १०० टक्के चुकीचे आहे. शहरातील गोरगरीबांना सुद्धा न्याय मिळाला पाहीजे. त्यांची उपजिविका शहरातील लोकांवर अवलंबून आहे. ते शहराचे रहिवासी आहेत. मतदार आहेत. त्याला फळवाल्याचा व्यवसाय करायचा असेल तर रहिवास व इतर सगळे पुरावे देता आले पाहिजेत. परिसरातील फळवाल्यांकडे नाव नसते, पत्ता नसतो. फेरीवाला संघटनांनी केलेल्या मागण्या योग्य आहेत. शहरात चांगल्या पद्धतीने धोरण राबविता येईल. त्याचा सुद्धा विचार करावा. त्याप्रमाणे महापौरांनी त्यांना आदेश द्यावा.

**मा.तानाजी खाडे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, फेरीवाला धोरणाचा विषय मंजूर करावा अशी विनंती करतो. दुसरी गोष्ट, हे होत असताना फेरीवाला धोरण ठरवतात. मा.प्रशांत शितोळे यांनी काही अडचणी व्यक्त केल्या, निश्चितच महत्वाच्या आहेत. मा.उपमुख्यमंत्री यांच्या दालनात मिटींग झाली. त्यावेळी अतिक्रमणाचा दोष मा.महापौर, मा.उपमहापौर यांच्यावर आला. मा.महापौरांना दोषी धरु नये. पिंपरी चिंचवडचे पर्यटन स्थळ म्हणून भक्ती-शक्तीकडे पाहिले जाते. एवढे मोठे स्थळ केले पण प्रत्येक ठिकाणी पार्किंगसाठी जागा नाही. पावभाजी विकणारे, हॉकर्स यांना बसायला जागा नाही. गाडया लावतात.

संध्याकाळी लोकांची सोय करतात. पाणीपुरीवाले, भेळवाले थांबलेले असतात. लोकांचे पोट भरतात. त्यावर त्यांचे घर चालवतात. त्यांचा इतर काही हेतू नसतो. निगडी जकात नाक्यावर ट्रॅफिकसाठी अडचण होते हा महत्वाचा विषय आहे. त्या लोकांची सोय आपण पाहिली नाही. त्यांची सोय कशी करता येईल याचीदेखील काळजी घेतली पाहिजे. भक्ती-शक्तीच्या पाठीमागे नाला आहे. त्यावरील अतिक्रमणे रस्त्यात गेलेली आहेत. बाजुच्या लोकांना प्राधिकरणाने एन.ओ.सी. दिलेली आहे. काही ठिकाणी चुकीचे झालेले आहे. त्यामध्ये छोटे-छोटे व्यवसाय करणा-यांना त्रास होतो आहे. सेक्टर २२ मध्ये एवढी मोठी स्किम केलेली आहे. १०० एकर जागेमध्ये झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प १०९०-९१ साली राबविला होता. तिथे भाजीमंडईची सोय नाही. रुपीनगर इथे रस्त्यावर भाजी मंडई बसते. त्यामुळे यायला-जायला जागा नसते. हा देखील विचार फेरीवाल्यांच्या संदर्भात करणे गरजेचे आहे. भाजी मंडईला अधिकृत जागा देण्यासाठी सहकार्य करावे. मा.प्रशांत शितोळे यांना जी सूचना मांडला त्याचादेखील विचार करावा.

**मा.श्रीरंग बारणे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सभागृहात हॉकर झोनसंदर्भात विषय आला. आत्ता फेरीवाल्यांच्या दरासंदर्भात विषय येत असताना एक गोष्ट निदर्शनास आणून देतो. आपण फेरीवाल्यांचे धोरण करत असताना महापालिका क्षेत्रात अ,ब,क व ड सर्व भागात महापालिकेच्या वतीने सर्व केले गेले. त्यात प्रामुख्याने प्रत्येक प्रभागात टपरीवाले किती, हातगाडीवाले किती, पथारीवाले किती, स्टॉलवाले किती आहेत याची संपूर्ण माहिती प्रशासनाने घेतलेली आहे. प्रशासनाच्या गोळा केलेल्या माहितीसंदर्भात विचारले होते. त्यावेळी मला माहिती देण्यात आली की,

| प्रभाग | | | एकूण संख्या |
|---|---|---|---|
| अ प्रभाग | - | हातगाड्या | १०२९ |
| | | | ३५ |
| | | पथारीवाले | ३८३ |
| | | सायकल वापर करणारे | १०३६ |
| | | व इतर | ४०३ |
| | | एकूण | ३२१५ |
| ब प्रभाग | - | एकूण | २९४१ |
| क प्रभाग | - | एकूण | २४२१ |
| ड प्रभाग | - | एकूण | ३४६८ |

शहरात एवढे विक्रेते,टपरीधारक व्यवसाय करुन त्यांची उपजिविका भागवतात. शहरात अनधिकृत बांधकामांवर कारवाई करताना एका वर्षात जे व्यापारी स्वतः दुकानांपुढे,

महापालिकेच्या रस्त्यांवर अशा प्रकारचा व्यवसाय करतात. या टपरीधारकांकडून ������भाडे घेतात. यासंदर्भात अनेक वेळा तक्रारी केल्या. परंतू आजपर्यंत संबंधीत व्यावसायिकांवर कारवाई केली गेली नाही. दुकान मालकावर कारवाई केली गेली नाही. रस्ता अडवून व्यवसाय केला जातो. नागरीकांची एकप्रकारे अडवणूक केली जाते. धोरण करत असताना हे काम कागदावरच राहून जाते का याचा सुद्धा विचार केला गेला पाहीजे. शहरातील गोरगरीब नागरीकांची संख्या १२,००० वर पोचली आहे. या संपूर्ण नागरीकांना व्यवसाय करायला परवानगी देत असताना कुठेही व्यवसाय करु नये. ट्रॅफीक नियम धाब्यावर बसवू नयेत. नागरीकांना अडवल्याची परिस्थिती निर्माण झाली नाही पाहीजे. हातगाडीवाले, पथारीवाले व्यवसाय करतात. प्रामुख्याने रस्त्यावर उभे राहून ट्रॅफीक जाम करतात. अनेक वेळा तक्रारी केल्या. लाखो पत्रे दिली. आपण स्वतः यासंदर्भात कोणत्याही प्रकारे कारवाई केलेली नाही. केवळ धोरण आखत असताना धोरण कागदावरच राहणार का याबाबत मनात शंका निर्माण होते. सभागृहात जवळपास ४ वेळा हा विषय आला आहे. परंतू यावर अद्याप ठोस निर्णय झालेला नाही. ठोस प्रक्रिया व्हायला पाहीजे होती. ती केवळ कागदावरच दाखवली आहे. आपण त्यांच्याकडून दरवर्षी हजारो रुपये घेणार आहोत. पाचशे रुपये घेणार आहोत. यातून महापालिकेला किती उत्पन्न मिळते. यापेक्षा कुठेतरी नागरीकांची अडवणूक होता कामा नये हेदेखील पाहीले पाहीजे. व्यवसाय होत असताना एक गोष्ट निदर्शनास आणून देतो की, हातगाडीवाले, फेरीवाले, टपरीधारक, व्यवसाय करणा-यांवर प्राथमिक शाळांच्या आवारात बंदी घातली पाहीजे. तिथे गैरकारभार केला जातो. नशिले पदार्थ विकण्याचे काम केले जाते. यात जातीने लक्ष घालावे.

**मा.सुलभा ऊबाळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आजचा अजेंडा हा ऐतिहासिक अजेंडा म्हटला तरी वावगे ठरणार नाही. भिजत पडलेले अनेक विषय या अजेंडावर आहेत. यात फेरीवाला धोरण हा सर्वसामान्य नागरीकांशी निगडीत असलेला विषय आहे. आधीच्या सदस्यांनी सांगितले प्रामुख्याने मा.प्रशांत शितोळे, मा.आप्पा बारणे यांनी जे मुद्दे सांगितले, त्याला प्रथमतः अनुमोदन आहे. सकाळी ६.०० पासून भंगारवाले, हातगाडीवाले रेसिडेन्शियल एरियातून फिरत असतात. आपण परवानगी देत असताना या गोष्टीचा विचार केला पाहीजे. फेरीवाल्यांचा टाईम काय असला पाहीजे. कोणता व्यवसाय करायला कोणत्या ठिकाणी परवानगी दिली गेली पाहीजे. प्राधिकरणासारख्या एरियात सकाळी संध्याकाळी सामसूम असते. अशा ठिकाणी या मंडळींकडून चोर शिरकाव करुन चेंबर उघडण्यासारखा प्रकार बाहेरुन आलेल्याकडून होत असतो. फेरिवाला धोरण राबवित असताना तुमच्याकडून अपेक्षा आहे की, या गोष्टी घडू नयेत म्हणून आमच्या सूचना विचारात घ्याव्यात. वॉर्ड स्तरावर, प्रभाग स्तरावर या गोष्टी विचारात घेण्याची आवश्यकता आहे. प्रामुख्याने पेपर विक्रेते,

दूधवाले, भाजीवाले यांना प्रत्येक वॉर्डस्तरावर फिक्स जागा दिली पाहीजे. त्यांना अडचणी आल्या नाही पाहीजेत. अतिक्रमण कारवाईपासून त्यांना बाजूला ठेवले पाहीजे. ब-याचदा यांनाच पहिले उचलले जाते. टप-या जप्त करतात. परत त्या जागेवर अतिक्रमण होते. बीएमसीकडून यासंदर्भात माहिती घ्या. बीएमसीने डिजाईन करुन पेपर विक्रेते, दूधवाले, फळवाले, भाजीवाले यांना शाळा, भाजी मंडई, हॉस्पिटल्स अशा ठिकाणी जागा दिलेल्या आहेत. त्यामुळे शहराच्या सुशोभिकरणात भरच पडलेली आहे. मध्यंतरी कारकर साहेबांनी अपंग, निराधार महिलांसाठी जाहीर करुन वर्तमानपत्रातून अर्ज मागविले होते. त्याचा पुढे फॉलोअप झाला नाही. अशा ब-याच योजना येतात. यात आपण काही करु शकलेलो नाही. हे धोरण स्वागतार्ह असले तरी मुख्य जागेतून बसस्टॉपकडे, शाळेसाठी अनेक मुले जात असतात. सायकलवरुन जातात. तिथे त्यांच्यावर कारवाई झाली नाही पाहीजे. अधिकृत परवाना देत असताना रिस्ट्रीक्शन्स केले पाहीजेत. शहरात जिथे ब्लाईंट टर्न आहेत तिथे फेरीवाले थांबले नाही पाहीजेत. हे फेरीवाले शहराचे रहिवासी किती वर्षांपासून तिथे आहेत. यांच्यावर बंधन असले पाहीजे. एक पर्सन १० हातगाड्या घेऊन येतो. गरीब माणसाची, स्वतःची हातगाडी नसते. तो व्यवसाय करताना प्रत्येकाला एकच परवाना एकाच नावावर दिला पाहीजे. एका कुटूंबात ४ परवाने दिले जातात याची दक्षता घेतली पाहीजे. भाजीच्या हातगाड्या एका एरियात किती असाव्यात. रेसिडेन्शियल हायसोसायटी एरिया इथे रिस्ट्रीक्शन्स असली पाहीजेत. ज्या ठिकाणी जास्त गर्दी आहे, तिथे सुद्धा याची अंमलबजावणी केली पाहीजे. हा विषय आज मंजूर होतो आहे. मी सूचना देतेय. हा विषय परत जाऊन दत्परातच पडणार आहे का याचा सुद्धा खुलासा करावा. आम्ही दिलेल्या सूचनांची दखल घेणार आहात का याची सुद्धा माहिती द्यावी.

**मा.मंगला कदम** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, जे फेरीवाला धोरण ब-याच वर्षांपासून, ब-याच वेळापासून महापालिका सभेपुढे मंजुरीसाठी येते आहे. १९९२ साली मी प्रथम निवडून आल्यानंतरसुद्धा टपरीधारकांसाठी पहिली कमिटी स्थापन झाली होती. तेव्हापासून आजपर्यंत या विषयावर कुठेतरी पिंपरी चिंचवड शहरात चांगल्या प्रकारचा चांगला निर्णय किंवा धोरण आखण्यात आलेले नाही. पूर्वी टपरीधारकांना लायसन्स दिले जात होते. तो भाडयाने दुकान घेऊन व्यवसाय करतो. मध्यंतरीच्या काळात कुठेतरी काहीतरी बिनसले होते. प्रत्येक वॉर्डात प्रत्येक सदस्यांच्या डोक्यात वेगवेगळ्या योजना असतात. वेगवेगळी गणिते आखली जातात. त्या दृष्टीकोणातून महापौरांच्या नावासहीत ठराव घेतला आहे. इथून पुढे तसे करु नका. महापौरांच्या अनुषंगाने डिक्लरेशन करत असतात. आम्ही सगळे या गोष्टीला जबाबदार आहोत. या विषयाला पूर्ण अनुमोदन आहे. तुमच्याकडे बघून या विषयाला मंजुरी देणार आहोत. आम्ही स्वतः हा विषय मांडला होता. मा.आप्पा बारणे डांगे चौकाबद्दल

वारंवार सांगत असतात. बाहेरुन येऊन लोक अतिक्रमण करतात. मी सुद्धा कितीवेळा कल्पना दिलेली आहे. थेरगाव चौकातून मिना शिकवण नावाची बाई दिवसभरात धुणीभांडी करत होती. भाजी मंडई परिसरात तिचा एक्सिडंट झाला. त्या दिवशी वायसीएममध्ये आयसीयूची सोय करता आली नाही. तिला दुस-या दिवशी वायसीएममध्ये † डमिशन मिळाली. मिना शिकवण नावाची बाई जागेवर गेली. कोणाकोणाला पाठीशी घालण्यासाठी कितीतरी गोष्टी घडल्या आहेत हे कुठेतरी थांबले पाहीजे. किती लोकांचा जीव गेलेला आहे. स्थापत्य विभागाला १०० वेळा सांगितले आहे. आम्ही कोणत्याही प्रकारच्या अतिक्रमणाला सहमत नाही. फेरीवाल्यांना कुठेतरी फिक्स जागा द्या. ते सोसायटीच्या दारात बसतात व तिथेच कचरा ठेवतात. कितीतरी ड्रेनेजच्या जागा ओपन झालेल्या आहेत. गटारे दुरुस्त करायची वेळ आलेली आहे. कितीवेळा सांगणार. अतिक्रमणाची गाडी आली की ते माल घेऊन उठून जातात. परत ते लोक येऊन बसतात. शहरात दुकानदारासमोरच्या जागा सगळीकडे आहेत. कोणताही सोसाय़टीवाला भाडे घेत नाही. महापालिकेच्या जागेवरील भाडे दुसराच घेतो. संपूर्ण फुटपाथवरुन फळवाले, भाजीवाले बसलेले असतात. लोकांना जायला जागा नसते. खरोखरच चांगले डिजाईन बनवून महापालिकेने टप-यांसाठी जागा ठरवून द्याव्यात. त्यांच्याकडून भाडे घ्यावे. खूप धंदा झालातर त्यांना सुद्धा परवडण्यासारखे आहे. फक्त लोकेशन्स फिक्स झाल्या पाहीजेत. आपण सगळीकडे दर निश्चित करतोय. माणसाला गरज असते. खूप चांगले डिजाईन असते. वॉर्डवाईज डिजाईन करा. बर्ड व्हॅलीचेच उदाहरण घ्या. अतिक्रमण विभागाकडून गाडया घेऊन गेले. पुन्हा तितक्याच गाडया आल्या आहेत. गरीब लोक काय करणार. कुठेतरी यांना परवानगी द्या की, इथपासून इथपर्यंतच गाडया लावता येतील. भक्ती-शक्ती इथे अशी परवानगी दिली आहे का. दुर्गा टेकडी, बर्ड व्हॅली, बोटक्लब कुठेही अशी परवानगी दिलेली नाही. शहरात कुठेही टपरीधारकांना लायसन्स किंवा परवाने दिलेले नाहीत. आजूबाजूचा कोणी भाई असतो. तो एका गाडीचे १५००/- रु. घेतो. हे लोक काम करताना महापालिकेचे उत्पन्न या गोष्टीकडे कोण पाहतो. महापालिकेकडे बोट दाखवतात. हा रोड पहा. कच-याने भरलेला आहे. अधिकृत बिजनेस करण्यासाठी परमिशन मिळाली असलीतरी लोक कचराकुंडींत कचरा टाकत नाहीत. गरीब बायका,कचरा-पत्रा गोळा करणा-या बायका कुंडीतला कचरा विस्कटतात. माझ्या वॉर्डात मी अक्षरशः वॉचमनसारखी उभी राहते. कोणी हॉटेलवाला कचरा टाकतो. मोकळ्या जागेत कचरा टाकतो. आपले कर्मचारी व्यवस्थित पगार घेणारे असताना आम्ही त्यांना दम देत कामे करायची का? आरोग्य विभागाचे लोकच सांगतात, कचरा विस्कटला आहे. त्यातूनच काढून घ्या. एक वॉर्डात एक कचराकुंडी तिथे अशी परिस्थिती आहे. आम्ही कोणत्याही चांगल्या कामाला पिंपरी चिंचवडमध्ये विरोध केला आहे का. मा.आर.एस.कुमार यांनी विषय मांडला. एवढा मोठा गोंधळ होतो. तरीसुद्धा हे सभागृह वायसीएममध्ये मशीन येणार असेल, गोरगरीबाला सर्व सुविधा मिळणार असतील तर

नगरसेवक कधीही विरोध करत नाही. आज या खूप चांगल्या पद्धतीने विषय मांडला आहे. शहर फेरिवाला समितीचे बाबा कांबळे यांचा सुद्धा विचार करावयाचा होता. महापौरांच्या अध्यक्षतेखाली मिटींग झालेली होती म्हणून विषय मंजूर करतोय. सर्वांचा विचार केला पाहिजे. या विषयाला उशीर लावू नका. १९९२ साली तो विभाग वेगळा होता. त्याच पद्धतीने वेगळा विभाग करुन लवकरात लवकर मंजूरी द्यावी. हा विषय मंजूर करावा अशी विनंती करते.

**मा.राजेंद्र जगताप** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, चौकाचौकातून थांबणार आहोत का. रस्त्यावरुन फिरणार आहोत का याची माहिती द्या. १८ मी. २४ मी. चा रस्ता असला तरी त्यामध्ये † क्सिडंटचे प्रमाण वाढले आहे. प्रत्येक दुकानदार त्याच्या समोरच्या हातगाडीवाल्याकडून पैसे घेत असतो. महापालिकेचा फुटपाथ असला तरी, १८ मी. चा रस्ता असेल तरी ते थांबत असतात. दुकानदार त्याचे भाडे घेत असतात. अतिक्रमणाची गाडी येते ती रोज आली पाहीजे. १५ दिवसांतून एकदा येते. हातगाडीवाले यांना माहिती असते. आपले अधिकारी लोकांना फोन करतात. हातगाडीवाले लगेच बाहेर निघून जातात. फेरीवाले गल्लीगल्लीत फिरले तरी ठिक आहे. चौकाचौकातून जागा असेल तर लायसन्स देऊन करा. काय कसा रेट ठरवणार आहोत याची माहिती सांगावी.

**मा.अजित गव्हाणे** – मा.महापौर साहेब, आपली बैठक झाली असल्याचे आम्हाला कळवले आहे. सदस्यांनी जे मुद्दे उपस्थित केले ते महत्वाचे आहेत. याठिकाणी आयुक्त साहेब पाहिजे होते. अनेक वेळा भोसरीतील नगरसेवकांनी, आमदारांनी सांगितले होते की, भोसरी उड्डाणपुलाखाली हातगाडया लागतात. तिथे वाईन शॉपसमोर दारुची हातगाड्यांवर विक्री चालते. दारु व सर्व प्रकारची व्यवस्था असते. अनेक वेळा सांगून सुद्धा कोणत्याही प्रकारची कारवाई केली जात नाही. एकीकडे अनधिकृत बांधकामासंदर्भात शहरात एवढ्या मोठ्या प्रमाणात काम करताय. ज्यांच्या रस्त्यावरची घरे पाडलीत व फूटपाथ केले, तिथली परिस्थिती पाहिलीत का? कोणताही माणूस फूटपाथवरुन चालत असतो तिथेच अतिक्रमण होते. गाडयाचे पार्कींग केलेले असते. हातगाडया लावलेल्या असतात. या हातगाडीवाल्यांकडून बरेचसे लोक पैसा घेत असतात. एवढे वारंवार सांगून सुद्धा काही होत नसेल तर या गोष्टीचे कारण शोधले पाहिजे. आधीच कळवले जाते की, अतिक्रमणवाल्यांची गाडी येणार आहे. तेव्हा हातगाडया निघून जातात. महापालिका कर्मचारी व अधिकारी अशी भूमिका घेत असतील तर, या गोष्टीवर जोपर्यंत कडक अंमलबजावणी करत नसतील तर फेरीवाला धोरण राबवले तरीपण शहरातील परिस्थिती सुधारणार नाही. मा.महापौरांनी आदेश द्यावा. भोसरी उड्डाण पुलाखालील फूटपाथवरील अनाधिकृत धंदे बंद करायला लावा अशी सूचना द्यावी. तरच याचा

फायदा आम्हाला फेरीवाल्यांना होईल. फेरीवाले शहरात फिरले पाहिजेत. त्यांनी एका जागेवर थांबता कामा नये.

**मा.अनिता तापकीर** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, तापकीरनगरमध्ये एम.एम. शाळेबाहेर हातगाड्या उभ्या असतात. एक/दोन गाड्या उचलल्या जातात. हातगाड्यांवर कारवाई केली तरीही त्या परत येतात. पुढील हातगाडयांवर कारवाई होत नाही. चायनीज गाडयापाशी कुत्री खाण्यासाठी फिरत असतात. या चायनीज गाड्यांवर कारवाई करण्यात यावी.

**मा.प्रशांत शितोळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, फी ची डिटेल्ड माहिती देण्यात यावी.

**मा.धनंजय आल्हाट** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, जी शहर फेरीवाला समिती नेमण्यात आली आहे. त्या समितीची बैठक होऊन त्यात जे दर निश्चित झालेले आहेत त्याचा तक्ता इथे दिलेला आहे. हे करत असताना आपल्याला याठिकाणी विनंती आहे की, ही समिती स्थापन केलेली आहे. कृपया हे सांगण्यात यावे की, या समितीत सदस्य कोण कोण आहेत. ही समिती केव्हा गठीत करण्यात आली. कोणत्या नियमाच्या आधारे गठीत करण्यात आली. कोणत्या प्रकारची मान्यता आहे का याचा सविस्तर खुलासा केला तर सभागृहाच्या माहितीत भर पडली जाईल. संबंधित अधिका-यांकडून उत्तर अपेक्षित आहे. यासंदर्भात अंमलबजावणी करत असताना अनेक सदस्य मंडळी या विषयावर बोलली आहेत. मा.सुलभा ऊबाळे, मा.प्रशांत शितोळे, मा.अजित गव्हाणे सर्वांनी यासंदर्भात त्यांची मते नोंदवली आहेत. त्यावरून एक गोष्ट स्पष्ट झाली आहे की, शहरभर फेरीवाले बोकाळले आहेत. चौकाचौकात चालणा-या नागरीकांना, वाहतुकीला प्रचंड अडथळा निर्माण होतो आहे. त्यातून अपघात घडत आहेत. संपूर्ण परिस्थिती अतिशय विदारक झाली आहे. माझी स्पष्ट विनंती आहे की, अटी व धोरण ठरवले गेले नाहीतर सदरची परिस्थिती आणखी विदारक होईल. आयुक्त साहेबांनी सांगावे की, संपूर्ण फेरीवाले, टपरीधारकांना सांगितले होते त्यानुसार अशा जागा किती असाव्यात. त्यांचे दर किती असावेत. जागा कुठल्या असाव्यात हे निश्चित करावे. नाहीतर परिस्थिती अतिशय अवघड होईल. शहरातील बरेच रस्ता अरुंद आहेत. फेरिवाल्यांना मान्यता दिली, लायसन दिलेतरी त्यांच्या नावाखाली वाहतुकीला अडथळे निर्माण केलेतर परिस्थिती अतिशय गंभीर होईल. या धोरणाची अंमलबजावणी करताना अतिशय चांगल्या पद्धतीने एका बाजूला शहर आणि शहरातील विकासाचे प्रश्न असताना अतिक्रमणे, अनधिकृत घरासंदर्भात अतिशय चांगली पाऊले उचलताना फेरीवाले यांना सुद्धा रोजगार मिळाला पाहीजे. प्रामुख्याने जे काही फेरीवाले, हातगाडीवाले शहरात व्यवसाय करत

आहेत. त्यात जवळजवळ ८० टक्के परप्रांतिय आहेत. ज्यांचे वास्तव्याचे कोणत्याही प्रकारचे पुरावे नाहीत असे लोक व्यवसाय करत असतात. हे धोरण करत असताना तो नागरीक त्याठिकाणचाच असावा. त्याचे निश्चित वास्तव्य असावे. या सगळ्या गोष्टी लक्षात घेऊन हे धोरण आखावे. या समितीत जे सभासद आहेत त्यांना शासनाची मान्यता आहे का. त्यांना कोणत्या मुद्यांच्या आधारे सभासद केलेले आहे याचे उत्तर संबंधित अधिका-यांनी द्यावे अशी विनंती करतो.

(मा.गायकवाड (सहा.आयुक्त, करसंकलन) यांनी प्रथम आपला परिचय करुन दिला.)

**मा.गायकवाड** (सहा.आयुक्त, करसंकलन) – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब व सर्व सन्मा. सदस्य, माझ्याकडे भूमि आणि जिंदगी विभागाचा अतिरिक्त कार्यभार दिलेला आहे. सन्मा.सदस्यांनी मा.शहर फेरीवाला समितीत कोण सदस्य आहेत. यासंदर्भात माहिती विचारलेली आहे. त्यासंदर्भात माहिती सादर करतो – अध्यक्ष म्हणून महापौर आहेत. सदस्य म्हणून उपमहापौर आहेत. स्थायी समितीचे अध्यक्ष हे सुद्धा सदस्य आहेत. सभागृह नेते, विरोधी पक्षनेते हे सुद्धा सदस्य आहेत. आयुक्त, पोलिस उपआयुक्त, वाहतूक हे सदस्य आहेत. मा.आयुक्त यांच्याकडून नामनिर्देशित केलेल्या व्यक्ती यात आहेत. यात शहर अभियंता, उपसंचालक नगररचना, सहा.आयुक्त भुमि आणि जिंदगी, सहा.आयुक्त झो.नि.पू, कामगार कल्याण अधिकारी, सहा.आयुक्त नागरवस्ती विभाग, समाज विकास अधिकारी हे सदस्य आहेत. सार्वजनिक जमिन मालक हे सुद्धा असून प्राधिकरणाचे प्रतिनिधी, मुख्य कार्यकारी अधिकारी प्राधिकरण, मुख्य कार्यकारी अभियंता एमआयडीसी व म्हाडा हे सदस्य आहेत. बाजार व्यापार संघटना या संघटनेचे ३ प्रतिनिधी व १ महिला सदस्य हे सदस्य आहेत. प्रशासक म्हणून कृषि उत्पन्न बाजार समितीचे अधिकारी सुद्धा या समितीचे सदस्य आहेत. फेरिवाला संघटनेचे २ प्रतिनिधी आहेत. टपरी व पथारी हातगाडी पंचायत, महाराष्ट्र, महाराष्ट्र फेरिवाला महासंघ, पथारी पंचायत, पुणे, क्रांती महासंघ, बँक ऑफ महाराष्ट्र हे सुद्धा सदस्य आहेत. कमाल २ महिला सदस्य आहेत. नागरी सुरक्षा समिती, जवान हक्क समितीचे सदस्य सूचक म्हणून आहेत. सहा.आयुक्त, भूमि आणि जिंदगी हे यात आहेत. या समितीच्या आत्तापर्यंत ३ बैठका झालेल्या आहेत. या समितीचे कार्यक्षेत्र महापालिका आहे.

**मा.बाबासाहेब धुमाळ** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, टपरीधारक आणि फेरवाले धोरण या विषयावर आज चर्चा चालू आहे. मी मा.महापौर व मा.आयुक्त साहेबांना सांगू शकतो की, आत्ता गायकवाड साहेबांनी इथे एवढी मोठी यादी वाचली आहे. आख्खे मंत्रीमंडळ या कमिटीत आहे तरी प्रश्न सूटत नाही. म्हणून मुद्दाम आयुक्त साहेबांना सांगतो की, आत्ता ज्या-ज्या नगरसेवकांनी इथे आपली व्यथा मांडली. टपरीवाले, फळवाले, भाजीवाले

यांच्यासाठी जागेची अडचण आहे. यांच्यामुळे चो-या होतात. हे माझे व्यक्तिगत मत आहे. प्रत्येक नगरसेवकाने त्याच्या वॉर्डाचे निकष स्वतः तयार करावेत. रस्त्यांची माहिती घ्यावी. रस्त्यावर किती टप-या असाव्यात, फळवाले किती असावेत, किती सोसायट्या, बंगले यांमध्ये असावेत, त्याठिकाणी कुठेतरी फळवाले असले पाहीजेत. योग्य नियोजन करुन दिलेतर हा प्रश्न लवकर सुटायला वेळ लागणार नाही. प्रत्येक नगरसेवकाची ही जबाबदारी राहील. वाहतुक कोंडी होणार नाही. ज्याठिकाणी टप-या लावल्या जातील. नगरसेवकाच्या माहितीतून त्याच्या हातून त्या लावल्या जातील. मंगलाताईंनी आत्ता सांगितले. आपल्या वॉर्डात एलबीटी आल्यामुळे वेगळे धोरण झालेले आहे. जकातीमधून उत्पन्न मिळत होते, त्याच्या कितीतरी पटींनी उत्पन्न कमी झालेले आहे. म्हणून नगरसेवकांनी आपल्या वॉर्डात फुल न फुलाची पाकळी द्यावी. नगरपालिकेत फार मोठे कार्य होईल. प्राधिकरणातील वस्तुस्थिती सर्वांना माहित आहे. घरातली मंडळी बाहेर जात नाहीत. फेरीवाले आल्यानंतर वॉचमनला भाजी आणायला पाठवतात. अशीच व्यवस्था तिथे आहे. थेरगाव चौकात अडचणी आहेत. वाहतुक कोंडी होते. मा.आप्पा बारणेंसारख्या माणसाला प्रत्येक ठिकाणी अडचणी येत आहेत. मेन मेन नगरसेवकांना त्या कमिटीत घेतले, स्वतः आयुक्तांनी सर्व केले तरी हा प्रश्न सुटायला वेळ लागणार नाही. दुस-यांना शहाणपणा शिकवण्यापेक्षा आपण शहाणे कधी होणार. पुण्यातील २०/२० लोक या कमिटीत आहेत. महापौर, आयुक्तांपासून सुशिक्षित नगरसेवकांपर्यंत माहिती आहे. हातगाडी व टपरी धारकांना काय ते माहित आहे. त्यांना बरोबर घ्यावे अशी सूचना करतो.

**मा.रामदास बोकड** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, या विषयावर बरेच वेळा चर्चा झाली आहे. आयुक्त साहेबांना विनंती करायची आहे. आपण अतिक्रमण विभागाला व्हिजिट दिली असेल नसेल आपण एकदा व्हिजिट द्या. ते काय काम करतात. टप-या ख-या अर्थाने रस्त्यावरुन अतिक्रमण हटवायचे काम करतात का. कोणाला तरी बोलवून हप्ता घ्यायचे काम करतात. याची शहानिशा करणे गरजेचे आहे. प्रभाग मिटींगमध्ये या विषयावर वारंवार बोलत असतो. संध्याकाळ येऊ द्या. ज्येष्ठ नागरीकांना रस्त्याने चालता येत नाही. आम्ही सुद्धा ओरडतोय. १२ मी. रस्ता केला, ४० मी. रस्ता केलातरी हप्ता घेऊन हातगाड्या लावून शहराचा प्रश्न सुटणार नाही. या विषयाला महत्व राहणार आहे. पिंपळे गुरव सारख्या ठिकाणी माझ्या प्रभागात ५/६ मिटींगांमध्ये अतिक्रमणासंदर्भात सांगीतले होते, कोणीही येतो, बिहारमधून येतो. शहरात गाडी लावतो. रस्ता अडवतो. आमचे प्रशासन याठिकाणी काही करत नाही. कोणताही माणूस शहरात बसून कपडे घेऊन येतो. तो टपरीधारक भाजीपाल्याचा व्यवसाय करतो. त्याला संध्याकाळी फोन येतो. ७५ पासून माझा व्यवसाय आहे. या बाजूने गाडी लागलीतर सायकल सुद्धा नेता येत नाही. पायाने चालता येत नाही. माझ्याकडे १२

मी.चा रस्ता आहे. झुरे साहेबांना सांगितले, लक्ष द्या. अतिक्रमणाच्या गाड्या मात्र दुपारी कोणीही नसताना हेलपाटा मारुन जातात. संध्याकाळी गाडया पुन्हा उभ्या असतात. आपल्या अतिक्रमण विभागाला संध्याकाळी वेळ मिळाला नाही. ७ ते ९ च्या दरम्यान कोणत्याही प्रभागात, वॉर्डात जाऊन बघा. आपल्यासमोर पूर्ण चित्र निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही. १८ मी.चा रस्ता केलातरी हातगाडीवाल्यांनी अतिक्रमण करुन तो रस्ता बंद केला आहे. आमच्याकडे दैनंदिन जीवन जवळजवळ सांगवीपासून थेरगावपर्यंत विस्कळित झालेले आहे. यावर प्रशासनाचा अंकुश राहीलेला नाही. अधिका-यांना आदेश द्यावा.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ६७ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

**मा.तानाजी खाडे**– मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो

विषय क्रमांक – ४

दिनांक - २७/६/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.भुजि/१/कावि/२०२/२०१३ दि.९/५/२०१३

२) मा.स्थायी समिती सभा दि.२८/५/२०१३ ठराव क्रमांक ३४२४ नुसार

प्रस्तुत निविदा नोटीस क्र.१/२०१२-१३ अंतर्गत प्रस्तावा सोबतचे प्रपत्र अ मध्ये नमूद केलेप्रमाणे एकुण १७ गाळयांसाठी स्पर्धात्मक दर प्राप्त झाले असून मनपा दरापेक्षा व इतर निविदाधारकांचे तुलनेने सर्वात जास्त दराने आलेल्या निविदा अ) २५ वर्षे लिजने तसेच ब) ५ वर्षे भाडेकराराने स्विकृत करणेस व त्याप्रमाणे करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.राजेंद्र जगताप** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.शांताराम भालेकर** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो - गट नं.९४ मौजे चिखली येथील शाळेचे आरक्षण क्रमांक १३३ यातील काही क्षेत्र महापालिकेच्या ताब्यात आलेले आहे ते क्षेत्र “सुभद्रा एज्युकेशन सोसायटी” यांस महापालिकेच्या नियम व अटीनुसार ३० वर्षे लीजने देणेस मान्यता देणेत यावी.

**मा.राजू मिसाळ** – मा.महापौर साहेब, सदर उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.प्रशांत शितोळे** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो - सांगवी येथील स.नं. ६ मधील उद्यानातील ३ गाळे भाडेकराराने देणेबाबतचे विषय दसरी दाखल करणेत यावा. सदर ३ गाळे केवळ अपंग व्यक्तींना देणेचे धोरणास मान्यता देणेत येत असून याबाबत गत महापालिका सभेतील या गाळयांबाबतचे निर्णयाप्रमाणे अंमलबजावणी करणेस मान्यता देण्यात येत आहे. त्यामुळे सांगवी येथील स.६ मधील ३ व्यापारी गाळे (फूड स्टॉल) केवळ अपंग व्यक्तींना देणेस व सदर प्रस्ताव कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.प्रसाद शेट्टी** – मा.महापौर साहेब, सदर उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.तानाजी खाडे** – मा.महापौर साहेब, दोनही उपसूचना स्विकारल्या आहेत.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक – २९९ विषय क्रमांक – ४
दिनांक - २७/६/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.भुजि/१/कावि/२०२/२०१३ दि.९/५/२०१३
२) मा.स्थायी समिती सभा दि.२८/५/२०१३ ठराव क्रमांक ३४२४ नुसार

प्रस्तुत निविदा नोटीस क्र.१/२०१२-१३ अंतर्गत प्रस्तावा सोबतचे प्रपत्र अ मध्ये नमूद केलेप्रमाणे एकुण १७ गाळयांसाठी स्पर्धात्मक दर प्राप्त झाले असून मनपा दरापेक्षा व इतर निविदाधारकांचे तुलनेने सर्वात जास्त दराने आलेल्या निविदा अ) २५ वर्षे लिजने तसेच ब) ५ वर्षे भाडेकराराने स्विकृत करणेस व त्याप्रमाणे करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.तसेच गट नं.९४ मौजे चिखली येथील शाळेचे आरक्षण क्रमांक १३३ यातील काही क्षेत्र महापालिकेच्या ताब्यात आलेले आहे ते क्षेत्र “सुभद्रा एज्युकेशन सोसायटी” यांस महापालिकेच्या नियम व अटीनुसार ३० वर्षे लीजने देणेस तसेच सांगवी येथील स.नं. ६ मधील उद्यानातील ३ गाळे भाडेकराराने देणेबाबतचे विषय दसरी दाखल करणेत यावा. सदर ३ गाळे केवळ अपंग व्यक्तींना देणेचे धोरणास मान्यता देणेत येत असून याबाबत गत महापालिका सभेतील या गाळयांबाबतचे निर्णयाप्रमाणे अंमलबजावणी करणेस मान्यता देण्यात येत आहे. त्यामुळे सांगवी येथील स.६ मधील ३ व्यापारी गाळे (फूड स्टॉल) केवळ अपंग

व्यक्तींना देणेस व सदर प्रस्ताव कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ६७ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक – ३०० विषय क्रमांक – ५

दिनांक - २७/६/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/ड-४/३४/१३, दि.२९/०३/२०१३

२) मा.शहर सुधारणा समिती सभा दि.११/०६/२०१३ ठ.क्र.५ नुसार

मनपाचे मौजे पिंपळे निलख येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील स.नं.६५ पै. ते ६७ पै. १८.०० मी. रस्त्याची आखणीमध्ये बदल करुन रस्त्याची रुंदी २४.०० मी. करणेबाबत म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ कलम ३७ अन्वये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.शुभांगी बो-हाडे –** मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.राजेंद्र काटे –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, पिंपळे निलखमधील हा विषय आहे. मंजूर विकास योजनेत बदल करताय. समाविष्ट गावांचा विषय तिथेसुद्धा ब-याच अडचणी आहेत. तरी विकास योजनेतील रस्ते आहेत. त्यात सुद्धा समाविष्ट गावात बदल करणे गरजेचे आहे. पिंपरी चिंचवड मंजूर विकास योजनेतील जाधववाडी ६५० पासून ६८६ मुख्य रस्त्यावर बदल करणे गरजेचे आहे. तिथे गोरगरीबांची घरे आहेत, कंपनी सुद्धा आहे. त्या वहीवाटीचा रस्ता विकसित करुन तोच आपण पुढे आणावा. त्याप्रमाणे फुगेवाडी सर्व्हे नं. मंजूर विकास योजनेतील आरक्षणात बदल करुन जुना रस्ता विकसित करावा. अर्धा गुंठा, एक गुंठा घेण्याआधी जुना वहिवाटीचा रस्ता विकसित केलातर जनतेचे हाल होणार नाहीत. ज्याठिकाणी टिडीआर बदलतात, तिथे त्यांना काही दिलेले नाही. हा विषय मंजूर करावा.

**मा.विलास नांदगुडे –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,पिंपळे निलखचा हा विषय आहे. १८ मी.चा रस्ता २४ मी. करतोय. कोणताही रस्ता कमी करत नाही. आयुक्तांनी

व्हिजिट दिल्यानंतर त्यांनी सांगितले, बाकी रस्ता २४ मी. असताना एवढा १८ मी. का ठेवताय? तो २४ मी. करावा. त्याला त्यांनी संमती दर्शविलेली आहे. दुसरा विषय विशालनगरमधून वाकड इथे ८० फूटी रस्ता जातो. त्याला ४० फुटी रस्ता करावा अशी संमती दिली आहे. त्याला लागून दुसरा ८० फुटी रस्ता मिळतोय. १०० फुटी एकाच रस्त्यावर २ चौक निर्माण होत आहेत. १०० फुटी रस्ता शिफ्ट केलातर एकच चौक निर्माण होईल. त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होणार नाही. मागील महापालिका सभेत विषयाला मंजुरी दिली. सर्व झाले. अभिप्राय झाला. आपण येथे चर्चा सुद्धा केली. आमच्याकडून चुक झाली म्हणून हा रस्ता करत नाही. हा सुद्धा भाग आहे. व एका बाजुला विरोध होणार, चुक होणार. कामे करत असताना खरी परिस्थिती काय. तिथली परिस्थिती कशी याचा अंदाज घेणे गरजेचे आहे. २ चौक निर्माण करणार का हा खरा प्रश्न आहे. तिथे इतके ट्रॅफीक जाम असते. २ लोक येथे चूक करतात म्हणून हा रस्ता शिफ्ट करणे योग्य नाही. हा रस्ता मोठा करुन शिफ्ट केलातर निश्चितच ट्रॅफिकला त्याचा फायदा होणार आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ६७ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

**मा.तानाजी खाडे** -मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक - ६

दिनांक - २७/६/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/ड-१/२०४/१३, दि.१०/०५/२०१३

२) मा.शहर सुधारणा समिती सभा दि.११/०६/२०१३ ठ.क्र.६ नुसार

पिंपरी चिंचवड मनपाने मौजे वाकड ता.मुळशी येथील मंजुर विकास योजनेतील मिळकती (मौजे पिंपळे निलख शीव ते वाकड चौक शाळा) ४५ मी. व २४ मी. रस्ता रुंदीकरणासाठी भुसंपादन करणेकामीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीचे मंजुरीने मा.जिल्हाधिकारी यांना सादर केलेला आहे. प्रस्तावातील बाबी विचारात घेता भूसंपादन प्रक्रियेबाबत कायदेशीर गुंतागुंत टाळणेचे दृष्टीने मौजे वाकड ता.मुळशी येथील मंजूर विकास योजनेतील मिळकती (मौजे पिंपळे निलख शीव ते वाकड शाळा चौक

स.नं.२४२पै., २४४पै ते २४९ पै,  २५१पै, २५७ पै ते २६३ पै, २६५ पै व २६६ पै, २६९ पै ते २७२ पै, २७६ पै ते २७८पै.) ४५ मी. व २४ मी. रस्ता रुंदीकरणासाठी सदर जमिनीचे म.प्रा. व न.र.अधिनियम १९६६ चे कलम १२६ मधील तरतूदीनुसार भूसंपादन करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**मा.रामदास बोकड** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.राहूल जाधव –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, या विषयाला धरुन च-होली इथे इंद्रायणी नदी आहे. ४५ मी. चा रस्ता प्रोजेक्टला जोडला जातो. पूर्वी ३० मी. होता तो ४५ मी. रस्ता केला. शासनाच्या मंजुरीसाठी पाठवतोय. भूसंपादनाची नोटीस पाठवली होती. त्यात टीडीआर घ्यायला गेलोतर सांगितले जाते, विषय मंजूर नाही. भूसंपादनाची नोटीस पाठवणार आहे. त्यांनी पैसे घ्यायचे म्हटले तर त्यांना पैसे घ्यावे लागतील माझी विनंती आहे, या लोकांना टीडीआर द्यावा नाहीतर जोपर्यंत शासनाकडे विषय मंजूर होत नाही तोपर्यंत रस्त्यासाठी भूसंपादन कारवाई करु नये.

**मा.स्वाती कलाटे –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, वाकड चौकातून ४५ मी. व २४ मी. चा रस्ता रुंदीकरणासाठी भूसंपादन करण्यासाठीचा विषय मंजुरीसाठी आलेला आहे. संबंधित अधिकारी यांच्या निदर्शनास आणून देते की, या विषयासाठी संबंधित कायदेशीर दावा न्यायालयात दाखल आहे. न्यायालयाने काही निर्देश नोंदवलेले आहेत. तोपर्यंत जैसे थे च परिस्थिती ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिलेले आहेत. समितीतून विषय आला म्हणजे न्यायालयाचा अवमान झाल्यासारखे आहे. न्यायालयाचा आदेश मानणे माझ्या दृष्टीने महत्वाचे आहे. स्थानिक नगरसेविका म्हणून या विषयाच्या अनुषंगाने न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन होऊ नये. यासाठी या प्रस्तावाला मंजूरी दिलीतर माझा विरोध राहील. जोपर्यंत न्यायालयात निर्णय होत नाही, तोपर्यंत हा विषय तहकूब करण्यात यावा अशी विनंती आहे.

**मा.वैशाली जवळकर -** मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रमांक ६ तहकूब करणेत येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ३०१ विषय क्रमांक - ६
दिनांक -२७/६/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/ड-१/२०४/१३,
दि.१०/०५/२०१३
२) मा.शहर सुधारणा समिती सभा दि.११/०६/२०१३ ठ.क्र.६ नुसार

विषय क्रमांक ६ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल - ६७ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

**मा.भारती फरांदे** -मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ७

दिनांक - २७/६/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/४-क/५३०/१३,
दि.१०/०५/२०१३
२) मा.शहर सुधारणा समिती सभा दि.११/०६/२०१३ ठ.क्र.७ नुसार

पिंपरी चिंचवड मनपाच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये विशेष नगर वसाहतीच्या नियमावली म.प्रा. व न.र अधि. १९६६ च्या कलम ३७ (१ कक) अन्वये तरतुद समाविष्ट करणेकरीता शासनाने नोटीस जाहिर केली आहे. उपसंचालक नगररचना पुणे विभाग यांनी शासन सुचनेवर प्राप्त झालेल्या २५ हरकती पाठविल्या असुन सदर हरकती व शासन सुचना यावर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचे मत मागविले असल्याने, त्याबाबत मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**मा.विनया तापकीर** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.मंगला कदम** – मा.महापौर साहेब, सभागृहाला या विषयाची संपूर्ण माहिती देण्यात यावी.

**मा.महापौर** - संबंधित अधिका-यांनी माहिती द्यावी.

**मा.भदाणे** (उपसंचालक, नगररचना) – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सदस्य, सदरचा विषय महाराष्ट्र शासनाकडून कलम ३७ १के खाली घेतलेला विषय आहे. सदरच्या फेरबदलाची संपूर्ण प्रक्रिया शासनस्तरावर नोटीस पब्लिश होऊन डेप्युटी डायरेक्टर यांनी पार

पाडली आहे. प्राप्त झालेल्या २५ हरकती/सूचनांवर महासभेचे असाईन असावे, त्यांचे मते घ्यावे यासाठी हा विषय आपल्याकडे पाठवला आहे. २५ हरकती/सूचनांवर महासभेचे मत डेप्युटी डायरेक्टर यांच्याकडे पाठवून शासनाकडे प्रस्ताव सादर करणार आहोत. यासाठी प्रस्ताव आलेला आहे. या विषयाची संपूर्ण माहिती सांगायची म्हटले तर, हा विषय स्पेशल टाऊनशिपसाठी आहे. पिंपरी चिंचवडमध्ये ऑलरेडी अशा प्रकारच्या टाऊनशीप्स् इनट्रॉड्युस झालेल्या आहेत. २००६साली शासनाने ठरवले होते, यात कमिटी असावी.

**मा.प्रशांत शितोळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, हा विषय शासन स्तरावरील आहे. या विषयाबाबत संभ्रम आहे म्हणून हा विषय तहकूब ठेवण्यात यावा.

**मा.शेखर ओव्हाळ** – मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रमांक ७ तहकूब करणेत येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक -३०२ विषय क्रमांक - ७
दिनांक -२७/६/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/४-क/५३०/१३, दि.१०/०५/२०१३
२) मा.शहर सुधारणा समिती सभा दि.११/०६/२०१३ ठ.क्र.७ नुसार

विषय क्रमांक ७ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल -६७ प्रतिकूल - ०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

**मा.नंदा ताकवणे**-मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -३०३ विषय क्रमांक - ८
दिनांक - २७/६/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:१) मा.महापालिका आयुक्त यांचेजा.क्र.नरवि/कावि/पिंपरी/११/७२/१३, दि.२९/०५/२०१३
२) मा.शहर सुधारणा समिती सभा दि.११/०६/२०१३ ठ.क्र.८ नुसार

पिंपरी चिंचवड मनपाचे सुधारित मंजूर विकास योजनेतील मौजे पिंपरी स.नं.७ पै,२२४ पै,२२५ पै, या जागेवरील १८.०० मी.रुंद रस्त्याचे बाधितक्षेत्र महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना भूसंपादन अधिनियम १९६६ चे कलम १२६ अन्वये भूसंपादन करुन मनपाच्या ताब्यात घेणे आवश्यक आहे. सदर रस्त्याचे भूसंपादनाचे खर्चास भूसंपादन अधिकारी कळवतील त्याप्रमाणे खर्चास मा.स्थायी समितीची आवश्यकता असल्याने मान्यता देणेत येत आहे.

**मा.मंदाकिनी ठाकरे –** मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.नितीन काळजे –** मा.महापौर साहेब, सदर विषयाचा भदाणे मॅडम यांनी खुलासा करावा.

**मा.भदाणे** (उपसंचालक,नगररचना)– मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सदस्य, सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे. च-होलीमधील रस्ता ३० चा ४५ मी. करतोय. देहू-आळंदी तिर्थक्षेत्राचा विकास आरक्षणातील हा रस्ता आहे. अतिरिक्त विभागीय आयुक्त यांनी सुचवलेला रस्ता आहे. त्यावेळी फेरबदल केला. त्याची प्रक्रिया पूर्ण करुन शासनाला सादर केलेले आहे. तो विकास आरक्षणातील रस्ता असल्यामुळे देवदर्शनाचे त्याचे सेक्शन ४ नुसार भूसंपादन चालू केलेले आहे. विकास योजनेव्यतिरिक्त कायद्यातील सेक्शन ४ नुसार भूसंपादन चालू करतो त्यानुसार ४ व ६ हा क्लॉज लावून भूसंपादन चालू करतो. टीडीआर डीपी रस्ता मंजूर झाल्याप्रमाणे देत असालतर, †डव्हान्स पझेशन देत असालतर, सँक्शन झाल्याप्रमाणे टीडीआर घ्यायची तयारी असेलतर ते चालू शकते.

**मा.नितीन काळजे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आपण आधी टीडीआर एकत्र दिल्यानंतर रस्ता शिफ्ट केलेला आहे. जोपर्यंत शासनाची मंजूरी नाही, तोपर्यंत भूसंपादन कारवाई थांबवली आहे.

**मा.भदाणे** (उपसंचालक,नगररचना)– मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सदस्य, सदरची अरेंजमेंट डिव्हिजनल †डीशनल कमिश्नर यांनी सुचवली आहे. त्यातून अलाईनमेंट जात नाही. कुठे व्यवस्था केलीतरी बराचसा पोर्शन नाल्यातून जातो आहे. एक्स्ट्रा जागा असतील, घेतलेल्या टीडीआरमध्ये पार्किंग किंवा इतर युज करता येईल.

**मा.नितीन काळजे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, तोपर्यंत हा विषय करु नका. या विषयाची कधी चर्चा आलेली नाही. भूसंपादनाची कारवाई करत आहेत म्हणून विषय मांडला आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल - ६७ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

**मा.आशा सुर्यवंशी** - महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ३०४ विषय क्रमांक - ९

दिनांक - २७/५/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/EWS/२०८/२०१३, दि.१०/०६/२०१३

२) मा.शहर सुधारणा समिती सभा दि.११/०६/२०१३ ठ.क्र.१० नुसार

JnNURM-BSUP अंतर्गत चिखली येथील से.१७ व १९ मधील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी बांधावयाच्या गृहप्रकल्पास (EWS) Consent to Operate मिळणेकामी प्रकल्पातील मलनि:सारण व्यवस्था व घनकचरा प्रक्रियेची जबाबदारी कायमस्वरुपी (Life Time) स्विकारणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुभद्रा ठोंबरे** - मा.महापौर साहेब ,सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, जेएनएनयुआरएम अंतर्गत चिखली येथील सेक्टर १७ व १९ मधील **EWS** गृहप्रकल्पास **Consent to Operate** मिळणेकामी प्रकल्पातील मलनिःस्सारण व घनकचरा प्रक्रियेची जबाबदारी कायमस्वरुपी **(Lifetime)** स्विकारणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव सभागृहासमोर मांडण्यात आला आहे. तसेच विषय क्र. १० नुसार सेक्टर २२ विठठलनगर, वेताळनगर, अजंठानगर व मिलिंदनगर येथील झोपडपटटी पुनर्वसन प्रकल्पासाठी **Consent to Operate** मिळणेकामी प्रकल्पातील मलनिःस्सारण व घनकचरा प्रक्रियेची जबाबदारी कायमस्वरुपी **(Lifetime)** स्विकारणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव सभागृहासमोर मांडण्यात आला आहे. याठिकाणी **Consent to Operate** कशासाठी लागतो. त्याठिकाणी खरोखरच ताबा द्यायचा आहे म्हणून हा विषय इथे खरोखर आणला आहे. मा.सभागृह व मा.आयुक्त साहेबांना विनंती आहे, विकसकाने **Consent to Operate** घेतला नसेलतर तो ताबा देऊ शकतो का. आज आपण प्रकल्प बांधून झाल्यानंतर **Consent to Operate** घेतो. यात खरेतर दोन्ही प्रकल्प आहेत. याला राज्य पर्यावरण विभागाने या सर्व प्रकल्पांसाठी दिनांक १० ऑक्टोबर २०११ रोजी सशर्त परवानग्या दिल्या होत्या. पर्यावरण

विभागाच्या परवानगी नुसार प्रकल्पाच्या ठिकाणी मैलाशुध्दीकरण प्रकल्प व म्युनिसीपल सॉलिड वेस्ट प्रकल्प हे प्रकल्पाच्या ठिकाणीच राबविण्याची अट महापालिकेला घालण्यात आली होती. आज हे वगळण्यात आले आहे. सेक्टर १७ व १९ मधील **EWS** गृहप्रकल्पात सुमारे ६७२० सदनिका बांधून तयार आहेत आणि सर्व झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांमध्ये सुमारे १८००० गाळे बांधण्यात येणार आहेत. **Census** च्या आकडेवारी नुसार एका कुटुंबात किमान ५ व्यक्ती असतात म्हणजेच **EWS** गृहप्रकल्पाचे ठिकाणी सुमारे ३३६०० इतकी लोकसंख्या वास्तव्य करणार आहे तर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पात सुमारे ९० हजार इतकी लोकसंख्या वास्तव्य करणार आहे. प्रशासनाच्याच आकडेवारीनुसार प्रती कुटूंब प्रती दिन ७२ लिटर मैला निर्माण होतो. म्हणजेच १७ व १९ मधील **EWS** गृहप्रकल्पातील ३३६६० इतकी लोकसंख्येमुळे सुमारे ४.८ एमएलडी मैला प्रती दिन निर्माण होणार आहे आणि सर्व झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पात मिळून सुमारे १३ एमएलडी मैला प्रती दिन निर्माण होणार आहे. प्रती एमएलडी मैलाशुध्दीकरणासाठी सुमारे ३२००/- रु. खर्च सध्या होतो आहे. त्याप्रमाणे **EWS** गृहप्रकल्पातील मैलाशुध्दीकरणासाठी प्रती वर्ष ५५ लाख रुपये खर्च करावे लागणारे आहेत व झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांचे मैलाशुध्दीकरणासाठी प्रती वर्ष १.५ कोटी रुपये खर्च करावे लागणार आहेत. हे याठिकाणी आपल्या निदर्शनास आणून द्यायचे आहे. ज्याठिकाणी प्रकल्प बांधायचा आहे, त्याठिकाणी मैल्याची विल्हेवाट लावायची सोय त्या-त्या प्रकल्पाच्या ठिकाणी केलेली नाही. ही जबाबदारी स्वतःवर घेऊन त्या ठिकाणाहून जमा झालेला मैला दुसरीकडे वाहून नेण्याची प्रक्रिया राबवण्यासाठी खर्च येणार आहे. प्रती व्यक्ती प्रती दिन अंदाजे ४५० ग्राम कचरा निर्माण होतो व **EWS** गृहप्रकल्पाचे ठिकाणी सुमारे १५.१२ टन कचरा दररोज निर्माण होणार आहे. तर सर्व झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पात मिळून सुमारे ४०.५ टन कचरा दररोज निर्माण होणार आहे**.** **EWS** गृहप्रकल्पाचे कच-याची विल्हेवाट लावण्यासाठी प्रती वर्ष ७० लाख रुपये खर्च करावे लागणार आहे तर सर्व झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांत निर्माण होणा-या कच-याची विल्हेवाट लावण्यासाठी प्रती वर्ष १.९० कोटी रुपये खर्च करावे लागणारे आहे. हा आकडा महापालिकेच्या पर्यावरण विभाग किंवा आरोग्य विभागाकडून घेतलेला आहे. या सर्व प्रकल्पातील मलनिःस्सारण व घनकचरा प्रक्रियेची जबाबदारी कायमस्वरुपी **(Lifetime)** स्विकारली तर महापालिकेला किमान ४.६५ कोटी रुपयांचा बोजा दरवर्षी सोसावा लागणार आहे व आजच्या दरांचा विचार केला पुढील ३० वर्षात महापालिकेवर सुमारे १५० कोटी रुपयांच्या खर्चाचा पडणार आहे. महापालिकेत सुमारे २७० एलएलडी मैला निर्माण होतो. त्यापैकी केवळ २१० एमएलडी मैल्याचे शुध्दीकरण केले जाते व ६० एमएलडी मैल्याचे शुध्दीकरण करण्यात येत नाही. तसेच मोशी कचरा डेपो येथील **Mechanical Solid Waste Composting** प्रकल्प पुर्ण क्षमतेने काम कार्यरत नसल्याने ३०० मेट्रीक टन कच-याचे दररोज उघडयावर डंपींग करण्यात येत होते व आता नोटीस

मिळाल्यानंतर हा सर्व कचरा लॅंडफिलींग केला जातो. बीव्हीजीला टेंडर दिलेले आहे. कच-याचे वाढते प्रमाण पाहता मोशी येथील कचरा डेपोची जागा लॅंडफिलिंगसाठी १ ते २ वर्षच पुरणार आहे अशा परिस्थितीत कचरा व मैलावर **At Source** प्रक्रिया करणे हे अत्यंत गरजेचे आहे. हे न करता मोशी कचरा डेपो इथे जी प्रक्रिया केली जाते त्यासाठी ही जागा अपुरी आहे. कच-यावर प्रॉपरली प्रक्रिया करत नाहीत. कोट्यावधी रुपये देऊन सुद्धा प्रक्रिया होत नाही. तरीसुद्धा ही जबाबदारी स्विकारत आहेत. जबाबदारी स्विकारण्याला विरोध नाही. असे आपण प्रायव्हेट कंपनीला केले नसते. त्यांना कायद्याचा बडगा दाखवला असता. आपले प्रकल्प आहेत, तिथला मैला व कच-याचा जागच्या जागी निचरा करत नाहीत. आपण हे ओझे का वाहतोय. आपण त्याठिकाणी या गोष्टी केलेल्या नाहीत याचा खुलासा खोटा देतोय. या सर्व बाबींचा विचार करता सेक्टर १७ व १९ मधील **EWS** गृहप्रकल्पातील आणि सर्व झोपडपटटी पुनर्वसन प्रकल्पांतील मलनिःसारण व घनकचरा प्रक्रियेची जबाबदारी कायमस्वरुपी **(Lifetime)** स्विकारणे ही मनपाच्या आर्थिक हिताविरुध्द असून पर्यावरणाच्या दृष्टीने देखील विघातक असल्याने सदर प्रस्ताव नामंजूर करुन प्रकल्पाचे ठिकाणीच मलनिःसारण व कचरा विल्हेवाट प्रकल्प राबविण्यात यावा. मा.महापौर साहेब सेक्टर २२ च्या प्रकल्पाबाबत मी स्वतः मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. व मा. उच्च न्यायालयाने सदर प्रकल्पास स्थगिती देखील दिली आहे. माझी आपल्याला विनंती आहे. आपण अत्यंत सूचक, नियमावर बोट ठेवून बोललात. मुंबई उच्च न्यायालयात मी सुद्धा प्रिटीशनर आहे. अशा परिस्थितीत सेक्टर २२ च्या प्रकल्पाबाबत कोणताही निर्णय घेतल्यास मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाचे अवमान होणार आहे त्यामुळे सेक्टर २२ चा विषय वगळावा. कोर्टाच्या नियमाच्या अधिन राहून याठिकाणी आपण कामकाज करावे.

**मा.ऊल्हास शेट्टी** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, JnNURM-BSUP अंतर्गत चिखली येथील से.१७ व १९ मधील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी बांधावयाच्या गृहप्रकल्पास (EWS) Consent to Operate मिळणेचा विषय इथे मांडला आहे. अधिका-यांकडून चूक झालेली आहे. बिल्डींग बांधताना EWS किंवा झोपडपट्टी पुनर्वसन STP साठी जागा सोडली नसल्यामुळे अडचण निर्माण झालेली आहे. यागोष्टी समोर असताना कन्सल्टंट काय करत होते. ज्यावेळी आपण कन्सल्टंट लोकांना लाखो करोडो रुपये देत असतो, त्यात जागा सुटली नाही का. WTP STP तिथे का राबविली नाही. बिल्डरला कॉन्ट्रॅक्ट दिले, टेंडर दिले आहे. त्याला XYZ हा रेट दिला. त्याच्याकडून पैसे काढून घेणार का. त्याच्याकडून ट्रिटमेंट प्लॅन्ट करुन उपयोगात आणणार आहोत का? बिल्डरला जे पैसे दिले, जो रेट दिला, त्यासंदर्भात काय निर्णय घेणार आहोत. गावडे साहेब, राजन पाटील यांना मी आठवड्यातून २ ते ३ फोन करत असतो. टेंडर दिल्यानंतर कामकाज झाले आहे. लोकांचे लोन सॅंक्शन केलेले आहे.

लोकांचे लोनचे हप्ते सुरु झालेले आहेत. त्यांना आशेवर बसवले आहे. त्यांची काय चूक आहे. नागरीकांना आम्ही सांगू शकत नाही, हप्ते थांबवा. या गोष्टी तुम्ही आम्ही सर्वजण सदस्य करत आलेलो आहोत. यांची परिस्थिती काय आहे. Consent to Operate मिळावा म्हणून हे लाभार्थी आशेवर बसले आहेत. तिथे बिल्कूल सुखसोयी नाहीत. ड्रेनेज प्रॉब्लेम आहे. लोकांना चांगल्या घरात शिफ्ट व्हायचे आहे. त्यांच्या नावाने लोन मंजूर झालेले आहे. त्यांचा हिस्सा त्यांनी भरलेला आहे. माझ्या माहितीप्रमाणे ईलिगल लोकांनी बाकी ठिकाणी घुसखोरी केलेली आहे. XYZ मध्ये माझा नंबर आहे. त्याठिकाणी घुसलेले आहेत, त्याला माहिती आहे. दादांनी सांगितले होते, त्यावर कारवाई करा. हे योग्य नाही. ज्यांची घरे आहेत, तिथे लाईट, पाणी नसल्यामुळे थांबले आहेत. काही अधिकारी म्हणतात, काही करु शकत नाही. तुम्हाला घुसायचे आहे, घुसा. तिथे ड्रेनेज, लाईट, पाणी काही देऊ शकत नाही. NOC नसल्यामुळे ही वेळ आपल्यावर आलेली आहे. तुमची अडचण आहे. तुम्ही देऊ शकत नाही. घर द्यायचे आहे. कितीतरी महिने घरे तयार होऊन पडली आहेत. फक्त १ NOC नाही म्हणून देत नाही. कन्सल्टंट यांना एवढे पैसे देतात. त्यांची सुद्धा चूक आहे. अधिका-यांकडून दूर्लक्ष झालेले आहे. प्रायव्हेट बिल्डर हे लोक व्यवस्था करतात. आपण का करु शकत नाही. तेवढे ओपन ठेवा. WTP STP साठी मोठमोठे बिल्डर प्रकल्प राबवू शकत नाहीत. झोपडपट्टीवाले कसे करतील. ५०/- रु. मेंटेनन्ससाठी कॉन्ट्रीब्यूशन म्हटले तरी ते भरायची मारामार. गोरगरीब, झोपडपट्टीतील नागरीक यांना सहारा आहे का. ट्रिटमेंट प्लॅन्ट केला तरी मला वाटते, पिंपरी चिंचवड शहरातील कोणताही ट्रिटमेंट प्लॅन्ट त्याठिकाणी सर्व्हीस करत असलोतरी जेएनएनयूआरएम संदर्भात गाईडलाईन असल्यामुळे तिथे करावा लागणार आहे. त्याठिकाणी दरवर्षी तो इम्प्लिमेंट होईल असे वाटत नाही. प्रामाणिकपणे विनंती आहे, त्याठिकाणी लोकांची दिशाभूल झाली आहे. गैरविश्वास निर्माण झाला आहे. काही लोक पाटीलसाहेब, गावडे साहेब यांच्याकडे मोर्चा घेऊन जातात. त्याठिकाणी नाईलाज होतो. माझी कळकळीची विनंती आहे, झोपडपट्टीतील लोक आशा लावून बसले आहेत. लाचार झाले आहेत. त्यांचे पुनर्वसन लवकरात लवकर करावे अशी विनंती आहे.

**मा.गोरक्ष लोखंडे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, Consent to Operate या विषयी सभागृहाला विचारण्यात आलेले आहे. महापालिका ही सर्वीस देणारी संस्था आहे. प्रॉफीट करणारी संस्था नाही. गोरगरीब हा बंगल्यात राहतो का तो झोपडीत राहतो. त्याला नागरी सुविधा देणे आपले पहिले काम आहे. प्रशासनाने याबाबतीत निश्चित कटिबद्ध राहीले पाहीजे. एखादा प्रोजेक्ट टक्केवारीवर आल्यानंतर सगळे जागरुक असतात. नंतर त्याचे काय होते? याकडे आजपर्यंत प्रशासनाने बघितले गेलेले दिसत नाही. बीएसयूपीच्या गाईडलाईन म्हणून करायचे आहे असे नाही, करावे लागणार आहे. पावसाळा तोंडावर आला आहे. पहिल्या

आठवड्यात पाऊस आल्यानंतर निम्म्या लोकांना ताबा दिलेला आहे. ते लोक तिथे रहात आहेत. विठ्ठलनगरमधील ६७२ लोकांना पहिला ताबा दिला. १४१८ घरे बांधून तयार आहेत. ६७२ लोकांनी ताबा घेतलेला नाही. झोपडपट्टी पुनर्वसनासाठी ख-या अर्थाने महापालिकेचे अधिकारी जबाबदार आहेत. आम्हाला वाटत नाही, कोणी हौसेने झोपडपट्टीत रहात नाही. आपण प्राधिकरणात बंगल्यात हौसेने राहतो. ४ ते ५ वर्षांत एक झोपडीत राहणा-यांची संख्या ४ वरुन १० झाली आहे. अशा परिस्थितीत हे लोक कुठेतरी सुंदर, देखण्या घराची वाट पाहत आहेत. अशा परिस्थितीत तुम्ही आम्हाला का अडवताय. पात्र अपात्रचा विषय झाला आहे. त्यामुळे बरीचे माणसे घर मिळण्यापासून वंचित राहीली आहेत. SRA ची एकही योजना कार्यान्वित नाही. EWS योजना आपली आहे. जेएनएनयूआरएम अंतर्गत असणारे पुनर्वसन प्रकल्प आपल्याकडे आहेत. विठ्ठलनगरचा ८ एकरचा प्लॉट मिळाला आहे. पात्र अपात्रतेच्या घे-यात १५० लोक सापडले आहेत. भूसंपादनाबाबत सुप्रिम कोर्ट सांगते. दरवर्षी शासनाचे आलेले नोटीफीकेशन्स सांगतात. कायदा सांगतो. ९५ चा जी.आर. कायम केलातरी २००२ च्या सर्वेक्षणात जो मनुष्य तिथे राहतो. त्याच्याकडे रेशन कार्ड आहे. त्याची कागदपत्रे पाहून मग त्यांना पात्र करा. हे शासनाने सुद्धा अनेक वेळा सांगितले आहे. तरी पुन्हा सांगतो. पात्र अपात्र करण्यासाठी लाख/दोन लाखांपर्यंत घेतले आहेत. नवगुणे यांना विचारा, आढारी यांना विचारा, गावडे साहेबांना माहित आहे. वेताळनगर इथे एका माणसाने आत्महत्या केली. वायसीएममधील भ्रष्टाचाराबद्दल निश्चित बोलतो. पण झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पात ज्या अधिका-यांचे हात रंगलेले आहेत त्यांची चौकशी झाली पाहीजे. विदाऊट इव्हिडन्स मी बोलणार नाही. गरीब माणसाला स्वतःच्या घरात राहण्यापासून दसरी दिरंगाई होते आहे हे सुद्धा कारण आहे. श्री.राजन पाटील यांची प्रदूषण नियंत्रण मंडळाबरोबर झालेल्या मिटींगला मी सुद्धा हजर होतो. हे चालणार नाही. सभागृहातील मंडळी मजूर अड्ड्यावरील मजूर नाहीत. आम्ही सर्व लोक लोकसेवक आहोत. हे काम करावे लागणार आहे. हे दोन्ही विषय मंजूर करुन गरीब माणसाला हक्काचे घर देण्यात यावे.

**मा.सुलभा ऊबाळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, याठिकाणी प्रथमतः आपण जे शहर सुधारणा समितीमध्ये मान्य केलेले विषय आयुक्त साहेबांनी घेण्याचा प्रयत्न केला असे मी वर्तमानपत्रामध्ये वाचले आहे. EWS च्या पुढील गृहयोजना खरोखरच राबविल्या जाणार नाहीत. वैयक्तिकरित्या या गोष्टीचा मी निषेध करते. सत्ताधारी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षासाठी ही अत्यंत शरमनाक बाब आहे. २००७च्या निवडणूकीच्या वेळी शहरातील सर्वसामान्य गोरगरीब जनतेला स्वप्न दाखवले. त्यात नागरिकांना स्वप्नातील घरकुल देणार असल्याचे सांगितले होते. आपल्याकडे आम्ही घरकुल मागायला आलो नव्हतो. हे सगळे करत असताना Consent to Operate हा विषय ज्या नागरीकांना माहिती नव्हता. तरी आपण त्यांना

रात्रभर लाईनमध्ये थांबवून फॉर्म वाटले. १५,००० लोकांनी फॉर्म घेतले. योग्य व्यक्तीला घर मिळणार होते. त्याचे अल्प उत्पन्न पाहीजे होते. त्यांनी २ महिने कागदपत्रांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या फे-या केल्या. ५/- रु. च्या फॉर्मसाठी ५०० रुपये खर्च केले. आत्ता घराची वाट बघतो आहोत. घर मिळायची वेळ आलीतर त्यावेळी आपल्याकडून अशा बाबी निदर्शनास येत आहेत. कन्सल्टंट यांची जबाबदारी आहे का. एक्झिक्युटीव्ह ऑफीसर म्हणून आयुक्त बसतात. त्यांची सुद्धा मोठी जबाबदारी आहे. स्वप्नातील घर लोकांसाठी आहे. हा ड्रीम प्रोजेक्ट तत्कालिन आयुक्त दिलीप बंड यांचा होता. ही त्यांची जबाबदारी आहे. अशाप्रकारे प्रकल्प कायदेशीर अडचणीत येणार असेलतर त्यासाठी काय केले पाहीजे. संपूर्णपणे दिलीप बंड यांचा सहभाग होता. अर्धवट स्वप्न टाकून रिटायर्ड झाले. आयुक्त साहेब, तुम्हाला विनंती आहे, तत्कालिन आयुक्त दिलिप बंड यांना या प्रोजेक्टसाठी सल्लागारपदी नियुक्त केलेतर निश्चितपणे यातून मार्ग निघेल. त्यांना त्या प्रोजेक्टकरिता नेमले पाहिजे होते. सत्ताधारी पक्षातील लोकांशी त्यांचे चांगले संबंध होते. त्यांचे मा.अजित पवार यांच्याशी चांगले संबंध होते. ही त्यांची जबाबदारी आहे असे म्हटले तरी वावगे होणार नाही. असे विषय स्थायी समिती सभागृहापुढे येतात तेव्हा त्याचा ऊहापोह केला जातो. स्थायी समितीचे प्रोसिडींग ठेवले जात नाही. सभागृहात या विषयावर कितीवेळा बोललो. महापालिकेचे प्रोसिडींग तपासून पहा. त्या लोकांचा काय दोष आहे. पुढील प्रोजेक्ट करताना या गोष्टीसाठी आम्ही कधी मंजूरी दिलेली नाही. आपण केलेल्या बाबी निस्तरल्या पाहिजेत. याठिकाणी सांगितले पाहिजे. प्रायव्हेट बिल्डरला जसे अटी/नियम लावले जातात तसे या प्रोजेक्टला लावायला पाहीजे होते, ते लावलेले नाहीत. ते लावल्यानंतर शहरात बकालपणा यायची वेळ येणार नाही. सर्वसामान्य लोकांचा विषय आहे. त्याबाबत कायदा आहे. कायद्यासाठी सर्वसामान्य लोक नाहीत. येथे कोणी नियम मोडणार, कायद्याचे उल्लंघन करणार नाही. हा विषय घेऊन त्यांनी त्यांचा ठसा दाखवला होता. निश्चितपणे विनंती करेल की, त्या लोकांची घरे तयार आहेत. शहरातील मूळ माणूस कुठेतरी रस्त्यावर जातोय. शहरात एवढ्या टप-या होत आहेत. कायद्यावर बोट ठेवून विक्रेते जागा मागत असतील तर एक जबाबदार नगरसेवक म्हणून माझी सुद्धा विनंती आहे की, या लोकांना किती दिवस तिष्ठत ठेवणार आहात? हा राष्ट्रवादी काँग्रेसच्या मंडळींना माझा प्रश्न आहे. तुमचा जाहिरनामा ही तुमची जबाबदारी आहे. प्रत्येक माणसाला तुम्ही तपासले पाहीजे. हे आयुक्तांचे काम नाही. त्यांनी हा प्रकल्प केलेला नाही. त्यांनी कोणाला सांगितले नाही. फाईल उघडून पहा. प्राधिकरणाकडून जागा घेतली त्यावेळी १०० कोटी भरावे लागतील असे सांगितले होते. त्यावेळी कोणी लक्ष दिले नाही. १२ कोटींची निविदा काढून वॉल कंपाऊंड बांधले. कोणीतरी रडल्यासारखे करायचे, कोणीतरी मारल्यासारखे करायचे. म्हणून प्रोजेक्ट सुरु केला. काही ठिकाणी मंजूरी दिल्या. त्याचा आत्ता उपयोग होत नाही. एवढ्या मोठ्या बिल्डींग्ज् तशाच

ठेवायच्या का? त्यातील १० टक्के लोक मृत्यू झाले असतील, गावाला निघून गेले असतील. अननेसेसरी प्रत्येकाला यांची हाय, तळतळ लागणार आहे. काम करत असताना कायदेशीर कामे करा. न्यायालयाच्या चौकटीत राहून काम करा. आपण कोणाची तळतळ घेत नाही ना ही जबाबदारी स्विकारली पाहीजे. पुढील विषय न्यायालयात असेल तर तपासून पहा. फक्त Consent to Operate साठी न्यायालयाचे दरवाजे बंद आहेत का. न्यायालयाचा निकाल लागले तेव्हा लागेल. सेक्टर २२ मध्ये शटडाऊन करुन टाका. पुनर्वसनाची जबाबदारी तुमची आहे. शहरात त्यांचे पुनर्वसन दुसरीकडे करुन द्या. दुसरीकडे करता येत नाहीतर त्यांचा विचार निश्चितपणे केला पाहीजे. काय परिस्थिती आहे. सेक्टर २२ मध्ये तीच परिस्थिती आहे. पात्र लोकांना अजंठानगरमध्ये सुविधा देण्यासाठी वाद व्हायला लागले आहेत. लोकांना न्याय मिळत नाही. हाणामा-या करतात. लोकांमध्ये संभ्रम निर्माण करुन आपल्याला काय मिळणार आहे. आयुक्त साहेबांना विनंती करते की, तांत्रिक बाबींकडे गांभिर्याने लक्ष घालावे. येणा-या काळात लवकरात लवकर घरे कशी मिळतील, याकडे आपण लक्ष द्यावे.

**मा.श्रीरंग बारणे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,खरेतर हा प्रकल्प होत असताना आपल्याला डी.सी. रुलमध्ये सर्वसामान्य बांधकाम नियमावलीत जे नियम लागू करतात, तेच नियम लागू आहेत. आज या प्रकल्पात कन्सल्टंट, या प्रकल्पावर काम करणारे प्रमुख अधिकारी त्यांच्यावर काय कारवाई करणार आहात. सर्वसामान्य बांधकाम नियमावलीत २०,००० स्क्वे. मी.वर बांधकाम करीत असताना पर्यावरण विभागाची परमिशन घ्यावी लागते. त्यांचे नियम लागू करतात. एवढा मोठा प्रकल्प होत असताना जे अधिकारी, कन्सल्टंट नेमले आहेत त्यांच्या लक्षात ही बाब आली नाही का. हा प्रकल्प लवकरात लवकर कसा पूर्ण होईल हे पाहत नाही. या प्रकल्पाची सुरुवात होत असताना मूळ रु.७००/- प्रति स्क्वे.फूटाचे काम रु.१२६०/- ते रु. १४६०/- पर्यंत पोहोचले आहे. हे मात्र पाहत असतो. प्रकल्पातील त्रुटींकडे मात्र आपण पाहत नाही. मा.सिमा सावळे ताईंनी, मा.ऊल्हास शेट्टी यांनी सांगितलेल्या बाबी लक्षात घेतल्या होत्या का? कन्सल्टंट नेमले होते. महापालिकेवर आर्थिक बोजा पडणार आहे या गोष्टी आपण पाहिल्या पाहिजेत. प्रकल्प कोणी खड्डयात घातले हे पाहिले गेले पाहीजे. केवळ या प्रकल्पाला उशीर होतो आहे म्हणून त्यात एखाद्या व्यक्तीला दोष दिला गेला नाही पाहीजे. जे दोषी अधिकारी, ज्या प्रमुख अधिका-यांकडे हा प्रकल्प होता, ही त्यांची जबाबदारी आहे. हे केलेतर आपण पाहून केवळ हा प्रकल्प पूर्ण करायचा हे न पाहता प्रकल्पातील त्रुटी धरुन त्यावर कारवाई झाली पाहीजे.

**मा.तानाजी खाडे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सभागृहात हा विषय आलेला आहे. शहरात लोकवस्ती वाढत असताना त्याभागातल्या लोकांना सुखसुविधा देणे महापालिकेचे

कर्तव्य आहे. आपण नागरीकांकडून टॅक्स घेत असतो. योग्य पद्धतीने सेक्टर २२ मध्ये ड्रेनेज व्यवस्था व्हावी. नियम आम्हाला माहित नाही. त्या परिसरात आम्ही राहतो. जागेवर रिझर्वेशन टाकले आहे. त्यात हा विषय नाही. या परिसरात पुनर्वसन होत असताना महापालिकेमार्फत मोशी कचरा डेपो आहे. बरेचसे ड्रेनेज प्रकल्प अपूर्ण आहेत. जुन्या लाईन तोडल्या आहेच. काही ठिकाणी जुन्याच लाईन चालू आहेत. शहरात काही ठिकाणी लोक EWS योजनेची देखील वाट पहात आहेत. लोकांना घरे कधी मिळतील. झोपडीधारक अटींमुळे विषय थांबत असेलतर विनंती आहे की, मा.सुलभा ताईंनी सांगितले. त्यांनी फक्त पक्षाला दोष दिला. पक्षाचे काम योग्य आहे. चांगले काम आहे. मोठमोठे प्रोजेक्ट इथे आणले जातात. विरोधी पक्ष या नात्याने तुम्ही विरोध करता. हे तुमचे काम आहे. विरोध वरवर असतो. आतून काही लोकांनी कायदेशीर केले.  त्याचे खरे कारण सांगतो, एका भागात एक खासदार आहे. दुस-या भागात दुसरा खासदार आहे. या खासदाराला त्रास देण्यासाठी त्या भागातील प्रस्तावाल विरोध केलेला आहे. हा विषय अतिशय महत्वाचा आहे. खासदारांत वाद चाललेला आहे. त्याचा त्रास स्थानिक नागरीकांना किती होतो आहे. आज लाखो लोक गॅसवर आहेत. रेडझोनमध्ये नगरसेवक आहेत. त्यांना त्यांच्या प्रभागतली कामे करता येत नाहीत. असा विरोध होत असेल तर माझा यासाठी विरोध राहील. या परिसरात प्रोजेक्ट झाला, त्यात ज्या लोकांसाठी प्रोजेक्ट झाले आहेत, त्या-त्या लोकांना घरे दिली पाहीजेत. आपण कायदेशीर बाबी पाहून या. मा.सिमाताईंना विनंती आहे, काही गोष्टी आपण त्यावेळी सांगीतल्या की, माझा प्रोजेक्टला विरोध नाही. झोपडपट्टीधारकांना विरोध नाही. महापालिकेचे तोंड उघडण्यासाठी मी बोलले. बिल्डरला NOC लागते आहे. म्हणून महापालिकेचे तोंड नाक दाबले. एवढा मोठा प्रोजेक्ट कायद्याच्या चौकटीत अडकला आहे. माझी विनंती आहे की, या परिसरात एकमेकांचा राग एकमेकांवर काढण्यासाठी झोपडपट्टी धारकांना टार्गेट करु नका. एखाद्या वाघासमोर शेळी ठेवल्यासारखे केले आहे. बाकी विषयांचा निकाल लागत नाही तोपर्यंत पुढील विचार करु नका. ड्रॉ झालेल्या लोकांना घरे देण्यात यावीत. लोकांचे हाल होत आहेत. झोपडपट्टी वाढत चालली आहे. मा.उल्हास शेट्टी यांनी सांगितले की, जुनी घरे खाली झालीतर लोक तेथे येऊन रहात आहेत. माझी विनंती आहे की, माझ्या प्रभागातील लोकांना न्याय मिळाला पाहीजे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल -६७ प्रतिकूल -०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट  केले.

----------

**मा.सविता साळुंके** - महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ३०५ विषय क्रमांक - १०
दिनांक - २७/६/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/BSUPप्र/२०९/२०१३, दि.१०/०६/२०१३
२) मा.शहर सुधारणा समिती सभा दि.११/०६/२०१३ ठ.क्र.११ नुसार

JnNURM-BSUP अंतर्गत अजंठानगर, मिलिंदनगर, विठ्ठलनगर, वेताळनगर व से.क्र.२२ निगडी येथील झोपडपट्टी पुनर्वसनासाठी Consent to Operate मिळणेकामी प्रकल्पातील मलनि:सारण व्यवस्था व घनकचरा प्रक्रियेची जबाबदारी कायमस्वरुपी (Life Time) स्विकारणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे**- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल - ६७ प्रतिकूल -०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----------

**मा.तानाजी खाडे** - महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक - ११
दिनांक - २७/६/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/१०/४८६/२०१३, दि.०६/०६/२०१३
२) मा.शहर सुधारणा समिती सभा दि.११/०६/२०१३ ठ.क्र.१२ नुसार

पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. यांचेसाठी पिंपरी चिंचवड मनपाच्या विकास नियंत्रण नियमावलीत समाविष्ट करावयाची तरतूद (appendix) पुढीलप्रमाणे -

**Appendix - Z**

**Commercial use of lands in the possession of the Pune Mahanagar Parivahan Mahamandal Ltd.**

**Sites reserved for PCMT, PCMT Depot, PCMT Parking, Bus Stand,Bus Terminus & PCMT allied purposes may be developed on the public private partnership basis or by other mode of development by**

**PMPML or PCMC Maximum F.S.I. permissible shall be 2.5 Out of that firstly one F.S.I. shall be allowed to be used for self permissible use of PMPML such as bus stand, bus parking, bus terminus, bus depot, office, workshop, cabins, toilet block etc., and balance F.S.I. shall be permissible for commercial use by PMPML with sanction of the Municipal Commissioner. PCMT parking and bus depot shall be allowed to be developed on ground floor only and immediate 3 to 4 floors shall be developed for parking purpose and the commercial use shall be allowed on the above permissible floors. Marginal spaces may be relaxed to avail additional F.S.I. with the approval of Municipal Commissioner.**

**Basic 1.0 F.S.I. shall be permitted for the development of land which is reserved for PCMT, Bus Depot; parking and additional F.S.I. shall be permissible as per sanction of Municipal Commissioner.** नुसार सदर प्रकरणी म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये फेरबदलाची कार्यवाही सुरु करणे, नागरिकांच्या हरकती/सुचना मागविणे, त्यानुसार सुनावणी घेणे व तदनंतर सदरचा प्रस्ताव मंजूरीसाठी शासनाकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.अरुण बो-हाडे –** मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.सिमा सावळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, महापालिकेच्या प्रशासनाने पीएमपीएलचा बसडेपोचे आरक्षण पीपीएलसाठी घोषित करताना नियमांबाबतीत तरतूद समाविष्ट करण्यासाठी कलम ३७ अन्वये मा.शहर सुधारणा समितीतून मा.महापालिका सभेपुढे विषय मंजुरीसाठी मांडला आहे. नगररचना विभागाच्या कार्यक्षम उपसंचालक भदाणे मॅडम यांचे मनापासून अभिनंदन करते. कौतुक करावेसे वाटते. ठराव झाला आहे का, निविदा झाली आहे का यासाठी तसदीच घेत नाहीत. अडीच FSI मिळतोय, मग त्याच्या पाठीमागे पळा, लाज वाटली पाहीजे. एवढ्या मोठ्या पदावर अधिकारी म्हणून काम करता. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सभागृहात आपल्या निदर्शनास आणून देते की, दि.२० सप्टेंबर २०१० रोजी ठराव क्रमांक ९९८ अन्वये महासभेने मंजूरी दिलेली आहे. त्यामध्ये हरकती/सूचना झालेल्या आहेत. आमची सुनावणी पेंडींग आहे. अडीच FSI म्हटला तर डोळे पांढरे होतात. कोणत्याही गोष्टीचा विचार न करता मा.शहर सुधारणा समितीतून विषय मंजूर करणार नाही म्हणून असे ठराव मा.महापालिका सभेपुढे आणले जातात. मा.प्रशांत शितोळे, मा.ऊल्हास शेट्टी हे सदस्य मागील वर्षी मा.शहर सुधारणा समितीमध्ये होते. ५ महिन्यांमध्ये मा.शहर सुधारणा समितीचा अजेंडा झिरो होता. सगळे विषय एका वेळीच का आले आहेत? सगळे घाईवर आले म्हणून एकाचवेळी मा.महापालिका सभेमध्ये सगळे विषय आणले आहेत. एवढे घाबरताय. बोलायचे काम करा. निम्मी हिंमत बोलण्यामुळे वाढते, निम्मी कर्तृत्वामुळे वाढते. फेरबदलाची कारवाई ३ वर्षांपूर्वी मंजूर केलेली आहे. तत्कालिन

आयुक्त श्री.आशिष शर्मा यांना विचारा. कलम २२७ अन्वये दि.१३/ /२०१२ रोजी नरवि/२१/१० नुसार जाहीरात प्रोसेसिंग केलेली होती. आपल्या माहितीसाठी कागदपत्रे आपल्याकडे देते. हरकती/सूचना मागवण्यासाठी जाहीरातीला अनुसरुन शिवसेनेच्या पदाधिका-यांनी दि.१२/११/१२ रोजी हरकती/सूचना दाखल केल्या. सूचना दाखल करुन घेण्यास जवळपास अडीच वर्ष लोटले. प्रशासनाला सुनावणी घ्यायला सवड झाली नाही. सदस्यांची दिशाभूल करण्यात आली असे समजायचे का. आम्ही मूर्ख आहोत का? प्रशासनाची हिंमत किती वाढली. तपास न करता वारंवार सभागृहात विषय आणले जातात. यावर काय कारवाई करणार आहात? कायदा धरून काम करतो. कन्सल्टंट आहे. आपण सभागृहात विषय आणला. सभागृहात कोणी सविस्तर माहिती दिलेली नसेल इतकी मी या विषयासंदर्भात फिरलेली आहे. मा.आयुक्त साहेब, आपण माझ्यापेक्षा वयाने लहान आहात. असे ठरावे जे आणतात त्यांच्याकडे आपले दुर्लक्ष होत नाही ना. तुम्ही त्यांचे लाड करता. आपण त्यांच्यावर डोळे झाकुन विश्वास ठेवता. म्हणून त्यांची अशी हिंमत होते. ते कसे बोलू शकतात. त्यांच्यावर काय कारवाई करणार आहात? Consent to operate आणायला ६० नियमावलीत करताय, ते करु शकणार नाही. करुन पण उपयोग होणार नाही. शहर सुधारणा समितीचा अजेंडा गेले ५ महिन्यांपासून झिरो असताना तुमची कधी हिंमत झाली नाही. एक वर्षापासून एवढे विषय या समितीवर नव्हते. काय करतोय आपण? Consent to Operate मध्ये सल्लागारांवर, राजन पाटील यांच्यावर कारवाई झाली आहे. १०० एकरामध्ये प्रोजेक्ट राबवतोय. जागा आहे का. आपल्याकडे त्या प्रकल्पातील एकावर कारवाई केली आहे. आपण कोर्टात जातो. प्रत्येक गोष्टीवर लाखो रुपये मोजावे लागतात. सिमा सावळे स्वतः साठी नाही लोकांसाठी कोर्टात जाते. अ प्रभागात बिल्डरचा प्रकल्प चालू आहे. तोच विरोधात गेला आहे. नगरसेवकाने अशा प्रकारचा विषय इथे मांडला तरी विषय हटवले जातात. आमची मजाक उडवतात. आम्ही मूर्ख आहोत. आपण सगळे विषय बघा. मागील वर्षात असलेला झिरो अजेंडा बघता सदस्यांची कशी हेळसांड केली आहे ते पहा. माझ्यासारख्यांना हायकोर्टात जायला लागले आहे. मला फरक पडत नाही. कायद्याला धरुन करता म्हणून तुमच्याकडून अपेक्षा करते. आपल्या माहितीकरिता हा ठराव व संबंधित सर्व कागदपत्रे माझ्याकडे आहेत.

**मा.मंगला कदम** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, यांच्यासाठी हरकती/सूचना मागवल्या आहेत. आपण हा विषय मंजूर करावा अशी विनंती करते.

**मा.सिमा सावळे**–मा.महापौर साहेब, मला खुलासा हवा आहे. विषय कसा मंजूर करताय?

**मा.अनंत को-हाळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,पुणे पीएमपीएल यांच्यासाठी पिंपरी चिंचवड मनपा विकास नियंत्रण नियमावलीत समाविष्ट करावयाच्या तरतुदी

इंग्रजीमध्ये आल्या होत्या. पूर्वी २४ तारखेला त्याविषयी निवेदन दिले होते. मा.नगरसचिव यांना देखील पत्र दिले होते. या तरतुदी मराठीत रुपांतरीत करुन मिळाव्यात म्हणून नगररचना विभागाला निवेदन दिले होते. पिंपरी चिंचवड विकास नियंत्रण नियमांतर्गतचा विषय सर्वांसमोर ठेवा जोपर्यंत डी.सी. रुल मराठीत येत नाही. भदाणे मॅडम यांना विचारले होते. त्या म्हणाल्या आपले काम चालू आहे. त्याला वेळ लागेल. तो मातृभाषेत मराठीत द्यावा. तो लगेच मिळेल. मा.आयुक्त यांनी सांगितले, असेलतर भाषांतरील करुन द्या. जोपर्यंत नियमावली मराठीत मिळत नाही, तोपर्यंत या विषयीचे सर्व विषय तहकूब ठेवण्यात यावेत.

**मा.योगेश बहल** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सदरचे विषय महाराष्ट्र एम.आर.टी.पी. † क्ट कलम १ अन्वये फेरबदल कारवाई सुरु करण्यासाठी आहेत. सदर प्रस्ताव मंजूर करण्यासाठी शासनाकडे पाठवावा. मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो – सदरचा विषय कायम होण्याची वाट न पाहता सदर विषयाचे हरकती सुचना मागवून विषय पुढील (अंतिम) कार्यवाही करता शासनास पाठविण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना देण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.अजित गव्हाणे –** मा.महापौर साहेब, सदर उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.तानाजी खाडे –** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक - ३०६ | विषय क्रमांक - ११ |
| दिनांक - २७/६/२०१३ | विभाग- मा.आयुक्त |

संदर्भ :१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/१०/४८६/२०१३, दि.०६/०६/२०१३

२) मा.शहर सुधारणा समिती सभा दि.११/०६/२०१३ ठ.क्र.१२ नुसार

पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. यांचेसाठी पिंपरी चिंचवड मनपाच्या विकास नियंत्रण नियमावलीत समाविष्ट करावयाची तरतूद (appendix) पुढीलप्रमाणे -

**Appendix - Z**

**Commercial use of lands in the possession of the Pune Mahanagar Parivahan Mahamandal Ltd.**

**Sites reserved for PCMT, PCMT Depot, PCMT Parking, Bus Stand,Bus Terminus & PCMT allied purposes may be developed on the public private partnership basis or by other mode of development by PMPML or PCMC Maximum F.S.I. permissible shall be 2.5 Out of that firstly one F.S.I. shall be allowed to be used for self permissible use of PMPML such as bus stand, bus parking, bus terminus, bus depot, office, workshop, cabins, toilet block etc., and balance F.S.I. shall be permissible for commercial use by PMPML with sanction of the Municipal Commissioner. PCMT parking and bus depot shall be allowed to be developed on ground floor only and immediate 3 to 4 floors shall be developed for parking purpose and the commercial use shall be allowed on the above permissible floors. Marginal spaces may be relaxed to avail additional F.S.I. with the approval of Municipal Commissioner.**

**Basic 1.0 F.S.I. shall be permitted for the development of land which is reserved for PCMT, Bus Depot; parking and additional F.S.I. shall be permissible as per sanction of Municipal Commissioner.** नुसार सदर प्रकरणी म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये फेरबदलाची कार्यवाही सुरु करणे, नागरिकांच्या हरकती/सुचना मागविणे, त्यानुसार सुनावणी घेणे व तदनंतर सदरचा प्रस्ताव मंजूरीसाठी शासनाकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे तसेच सदरचा विषय कायम होण्याची वाट न पाहता सदर विषयाचे हरकती सुचना मागवून विषय पुढील (अंतिम) कार्यवाही करता शासनास पाठविण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना देण्यास मान्यता देणेत आहे.

अनुकूल -६७ प्रतिकूल -०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----------

**मा.उल्हास शेट्टी** - महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १२

दिनांक - २७/६/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/१०/५४६/२०१३, दि.१०/०६/२०१३

२) मा.शहर सुधारणा समिती सभा दि.११/०६/२०१३ ठ.क्र.१३ नुसार

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जुन्या हद्दीचे विकास योजना नकाशावर पुररेषा दर्शविणे व पुररेषेसंबंधी मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत नियम क्र.९.४ नव्याने समाविष्ट करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणेस, फेरबदलाची सुचना प्रसिध्द करुन नागरिकांच्या

हरकती/सुचना मागविणे, त्यानुषंगाने सुनावणी घेऊन निर्णय घेणे व तदनंतर फेरबदलाचा प्रस्ताव शासनास मंजूरीसाठी सादर करणे ही सर्व वैधानिक कार्यवाही करण्यास मा.आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.राजू मिसाळ –** मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.योगेश बहल –** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो आहे -
१) पवना नदीवर असणारे बंधारे काढल्याने Flood Lines ची पातळी निश्चितपणे कमी होणार आहे. २) सर्व नद्यांचे De-Silting करणे आवश्यक आहे. काही प्रमाणात De-Silting बंधारे तोडल्याने झालेले आहे. ३) या क्षेत्रातील जाणकारांच्या मते बंधारे तोडल्याने व De-Silting केल्याने पूररेषेची पातळी सुमारे १.५० मीटरने कमी झालेली आहे. या बाबीचा विचार करता आता दर्शविलेल्या निळया पूररेषेच्या पातळीपेक्षा १.५० मीटर ने कमी येणा-या पातळीपर्यंत ना-विकास क्षेत्र प्रस्तावित करावे व याप्रमाणे निषिध्द क्षेत्राची फेरआखणी करणेस तसेच फेरबदल प्रस्तावात नमूद केलेल्या शेकडो हेक्टर ना विकास क्षेत्रामध्ये अतिक्रमण,अनधिकृत बांधकाम अथवा झोपडपटटी होणार आहे, त्यामुळे ना-विकास क्षेत्र प्रस्तावित करण्यापेक्षा निळया व लाल पूररेषेची फक्त आखणी करुन मंजूर विकास योजनेतील झोनप्रमाणे कार्यवाही करणे योग्य होईल. यासाठी सदर क्षेत्रातील विकसनास परवानगी देताना निळी पूररेषा/निषिध्द क्षेत्र विचारात न घेता Habitable Slab ची उंची लाल पूररेषेच्या वर ५०० मिलीमीटर ठेवून त्याखालील क्षेत्र पार्किंग करिता वापरता येईल व अशाप्रकारचे बांधकामास Structural Stability प्रमाणपत्र घेऊन मंजूर विकास नियंत्रण नियमावली प्रमाणे अनुज्ञेय चटई क्षेत्र व टी.डी.आर.चा वापर करुन परवानगी द्यावी. तसेच परवानगी देतेवेळी Habitable Slabच्या खाली कोणतेही प्रकारचे बंदिस्त/अथवा प्रवाहाला अडथळा होईल असे बांधकाम करता येणार नाही. ज्या ठिकाणी नदीच्या कडेला ग्रीन बेल्ट दर्शविलेला नाही त्याठिकाणी ३० मीटर पर्यंत बांधकामास परवानगी देऊ नये परंतु विकसनाचे Potential उर्वरित क्षेत्रात वापरता यावे तसेच नदीच्या कडेने पूररेषेमध्ये ना विकास क्षेत्र प्रस्तावित करणेपेक्षा मंजूर डी.पी.नुसार विकसन करावे व निळया पूररेषेपर्यंतच्या क्षेत्रात रेडीरेकनरच्या २५% दराने रिव्हर फ्रंट डेव्हलपमेंट चार्ज म्हणून प्रिमियम अकरावा व अशा प्रकारे जमा होणा-या निधीमधून नदी सुशोभीकरण, De-Silting तसेच नदीला समांतर व नदीपासून ३० मीटर मध्ये १८ मीटर रुंदीचा Elevated Road डेव्हलप करावा. मनपाने यापूर्वीच श्री.पी.के.दास यासारख्या वास्तूविशारदाची नेमणूक करुन अशा प्रकारच्या योजनेत पुढाकार घेतलेला आहे. मात्र मनपाच्या तिजोरीवर भार न देता अशा प्रकारच्या प्रीमियमच्या निधीमधून River Front Development चा प्रकल्प राबवून इतर महापालिकांसमोर एक आदर्श ठेवावा सदर ठराव कायम होण्याची

वाट न पाहता माननीय आयुक्त यांना हरकती सूचना मागवणे व इतर पुढील कार्यवाही करण्याकरिता अधिकार देण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.प्रसाद शेट्टी** – मा.महापौर साहेब, सदर उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.प्रशांत शितोळे** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो - पिंपरी चिंचवड मनपाच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये म.प्रा.व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये, नियमामध्ये फेरबदल करणेबाबत मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी मा.महानगरपालिका सभेच्या मान्यतेकामी प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यामध्ये मा.आयुक्त यांनी नवीन नियम प्रस्तावीत केले असून प्रस्तावित नियम क्र.९.४. या नियमामध्ये खालील प्रमाणे बदल व सुधारणा व्हावी.

a) Reservation of open users like Garden, play Ground, Cremation Center, Burial Ground, Roads, Sewage Treatment plants, Water Treatment plants, Projects related to water supply and Sewage Treatment plants shall be allowed in blue lines. Private developer can apply to commissioner for the same and shall be allowed to applicant with the consent of Irrigation Department, Temporary structures shall allowed within the months of October to June in year. प्रस्तावित नियम क्र.९.४ मध्ये सुधारणा होऊन पुढील कार्यवाही व्हावी.

**मा.प्रसाद शेट्टी** – मा.महापौर साहेब, सदर उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.विलास नांदगुडे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, अत्यंत महत्वाचा विषय याठिकाणी सभागृहात विचारण्यात आलेला आहे. मा.योगेश बहल यांनी सुद्धा अतिशय चांगल्या उपसूचना याठिकाणी मांडल्या आहेत. खरेतर या पूररेषेमुळे अनेक प्लॉटधारक शेतक-यांचे फार मोठे नुकसान झालेले आहे. पूररेषेमुळे पाटबंधारे विभागाकडे संपर्क साधला, त्यावेळी मी त्यांना सांगितले, पूररेषेमुळे आम्हाला स्थिर उंची मिळेल. नदीच्या बाजूला जे पाणी येते, त्यापेक्षा उंची मिळाल्यामुळे प्रोजेक्टकरिता बांधकाम परवानगी घेण्यास काही हरकत राहणार नाही. तरीसुद्धा हा प्रोजेक्ट इतके दिवस लोंबकळत पडला आहे. आयुक्त साहेबांनी याबाबतीत पुढाकार घेतला आहे. हे सुद्धा अभिनंदनीय आहे. मा.योगेश बहल यांनी सूचना मांडली की, ३० मी. चा ग्रीन बेल्ट नदी बाजूला उठवा. परंतू सूचना करायची आहे, ३० मी. ऐवजी ५० मी. चा ग्रीनबेल्ट ठेवला व २४ मी.चा रस्ता केलातर ते शहराच्या दृष्टीकोणातून अतिशय सुंदर होणार आहे. माझी उपसूचना आपण स्विकारावी अशी विनंती आहे.

मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो - नदीच्या बाजूने ५० मी. क्षेत्र हे हरीतपटटा म्हणून ठेवावे व त्यामधून २४ मीटर रस्ता प्रस्तावित करावा त्यामुळे नदीचे सुशोभिकरण चांगले

होईल व नदीच्या बाजूने रस्ता प्रस्तावित केल्यामुळे वाहतुकीचा प्रश्न सुटेल व नदीच्या बाजूने (नदीसुधार प्रकल्प) जे आपण करणार आहोत त्यासाठी जाण्या येण्यासाठी त्याचा चांगला उपयोग होईल.तसेच नदी पातळी व निळी पूररेषा यामधील क्षेत्र (गावठाण भाग वगळून) हे ना विकास क्षेत्र म्हणून प्रस्तावित आहे. गावठाण भागातील क्षेत्रात बांधकाम/पुर्न:विकास हे पाटबंधारे विभागाने घालून दिलेल्या अटी, शर्ती व परवानगीने करता येईल असे प्रस्तावित केले आहे. परंतू गावठाण भागातील क्षेत्रात बांधकाम/पुर्न:विकास करताना प्रत्येक वेळी पाटबंधारे विभागाची परवानगी घेणे सोईचे ठरणार नाही. गावठाण भागातील क्षेत्रात बांधकाम/पुर्न:विकास करताना पाटबंधारे विभागाने घालून दिलेल्या अटी, शर्ती निश्चित कराव्यात. तसेच पाटबंधारे विभागाच्या अटी, शर्तीस अधिन राहून बांधकाम/पुर्न:विकास परवानगी महानगरपालिकेनेच देण्यास मान्यता देण्यात यावी.

**मा.अजय सायकर** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.अश्विनी चिंचवडे** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते - नदी पातळी व निळी पूररेषा यामधील क्षेत्र (गावठाण भाग वगळून) हे ना विकास क्षेत्र म्हणून प्रस्तावित आहे. गावठाण भागातील क्षेत्रात बांधकाम/पुर्न:विकास हे पाटबंधारे विभागाने घालून दिलेल्या अटी, शर्ती व परवानगीने करता येईल असे प्रस्तावित केले आहे. परंतू गावठाण भागातील क्षेत्रात बांधकाम/पुर्न:विकास करताना प्रत्येक वेळी पाटबंधारे विभागाची परवानगी घेणे सोईचे ठरणार नाही. गावठाण भागातील क्षेत्रात बांधकाम/पुर्न:विकास करताना पाटबंधारे विभागाने घालून दिलेल्या अटी, शर्ती निश्चित कराव्यात. तसेच पाटबंधारे विभागाच्या अटी, शर्तीस अधिन राहून बांधकाम/ पुर्न:विकास परवानगी महानगरपालिकेनेच देण्यास मान्यता देण्यात यावी.

**मा.आशा शेंडगे** – मा.महापौर साहेब, सदर उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मनपाच्या जुन्या हद्दीच्या मंजूर विकास आराखडयावर पूररेषा दर्शविणे व पुररेषा संबंधी महापालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीत नियम क्र.९.४ नव्याने समाविष्ट करणेकामी कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणेकामी सभेच्या मान्यतेचा प्रस्ताव सभागृहासमोर मांडण्यात आलेला आहे. महापालिकेच्या जुन्या हददीतील विकास आराखडयावर पूररेषा दर्शविणेसाठी वैधानीक कार्यवाही करण्याबाबतची पत्रे मी दिनांक १८/८/२०१०, दिनांक १४/५/२०१२ व दिनांक १३/६/२०१२ रोजी दिले होते व तब्बल तीन वर्षांनी मी केलेल्या कायदेशीर मागणीची दखल घेऊन कार्यवाही प्रस्तावित केल्याने मी प्रथमतः आयुक्तांचे आभार मानते. खरे तर पुररेषेतील

टीडीआर वाटपाची खिरापत आयुक्तांनी बंद केल्याने पुररेषा दर्शविण्याची कायदेशीर बाब नगररचना विभागाला नाईलाजाने करावी लागत आहे. उत्तराखंड येथे आलेल्या पुरामुळे हजारो नागरीकांना आपले जीव गमवावे लागले आहेत व लाखो कुटूंब उध्वस्त झाले आहेत. यातून धडा घेऊन पुररेषा दर्शविण्याची वैधानिक कार्यवाही लवकरात लवकर करुन त्याची कठोर अंमलबजावणी प्रशासनाने करावी. विकासाच्या नावाखाली आपले खिसे भरण्यात गुंग असलेल्या दलालांच्या दबावाला भीक घालू नका. मा.महापौर साहेब, पुररेषासंबंधी महापालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीत नव्याने समाविष्ट करण्यात येत असलेल्या नियम क्र.९.४ नुसार जुन्या हददीच्या मंजूर विकास आराखडयावर पुररेषा दर्शविताना नदी पातळी व निळया पुररेषेतील क्षेत्र हे नाविकास क्षेत्रात समाविष्ट होते. असे असतानाही प्रत्यक्षात नदी पातळी व निळया पुरेरेषेतील क्षेत्र हे निवासी विभागात दर्शविण्यात आले आहे. नगररचना विभागाने प्रस्तावित केलेला नियम व नकाशा हे दोन्ही एकमेकाशी विसंगत आहे. पुररेषा दर्शविताना नदी पातळी व निळया पुररेषेतील क्षेत्र हे नाविकास क्षेत्र असल्याने विकास आराखडयावर सदरचे क्षेत्र हे नाविकास म्हणून दर्शविणे वैध ठरते त्यामुळे त्याबाबतचे बदल करण्यात यावे. तसेच नव्याने समाविष्ट करण्यात येत असलेल्या नियम ९.४ नुसार नदी पातळी व निळया पुररेषेतील नाविकास क्षेत्रात केवळ खुला स्वरुपाच्या आरक्षणांचा विकास करणे शक्य आहे. परंतु यापुर्वी मंजूर असलेले अनेक बिल्डेबल आरक्षणे आहेत त्यामुळे सदर पुररेषा दर्शविताना त्यामध्ये येणारे सर्व विकसनक्षम आरक्षणे हे निरुपयोगी ठरणार आहेत. तरी त्याबाबतचे Town Planning Norms नुसार बदल करण्यात आलेले नाही. अशाप्रकारे अर्धवट प्रस्ताव ठेवून पूररेषेच्याबाबत कोणताही निर्णय होऊ नये याची खबरदारी नगररचना विभागाने घेतलेली दिसते. मा.महापौर साहेब, महापालिकेच्या जुन्या हददीच्या विकास आराखडयावर नियमसंगत बदल दर्शवून सदरचा प्रस्ताव सभागृहासमोर मांडण्यात यावा. तुम्ही केलेल्या चांगल्या कामाची पावती म्हणून पुन्हा एकदा मनापासून आभार मानते.

**मा.उल्हास शेटटी** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व उपसूचना स्विकारल्या आहेत.

यानंतर उपसूचनांप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ३०७ विषय क्रमांक - १२
दिनांक - २७/६/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/१०/५४६/२०१३, दि.१०/०६/२०१३

२) मा.शहर सुधारणा समिती सभा दि.११/०६/२०१३ ठ.क्र.१३ नुसार

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जुन्या हद्दीचे विकास योजना नकाशावर पुररेषा दर्शविणे व पुररेषेसंबंधी मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत नियम क्र.९.४ नव्याने समाविष्ट करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणेस, फेरबदलाची सुचना प्रसिध्द करुन नागरिकांच्या हरकती/सुचना मागविणे, त्यानुषंगाने सुनावणी घेऊन निर्णय घेणे व तदनंतर फेरबदलाचा प्रस्ताव शासनास मंजूरीसाठी सादर करणे ही सर्व वैधानिक कार्यवाही करण्यास मा.आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मा.महापालिका सभेची मंजूरी आवश्यक असल्याने मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जुन्या हद्दीचे विकास योजना नकाशावर पुररेषा दर्शविणे व पुररेषेसंबंधी मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत नियम क्र.९.४ नव्याने समाविष्ट करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणेस, फेरबदलाची सुचना प्रसिध्द करुन नागरिकांच्या हरकती/सुचना मागविणे, त्यानुषंगाने सुनावणी घेऊन निर्णय घेणे व तदनंतर फेरबदलाचा प्रस्ताव शासनास मंजूरीसाठी सादर करणे ही सर्व वैधानिक कार्यवाही करण्यास मा.आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच १) पवना नदीवर असणारे बंधारे काढल्याने Flood Lines ची पातळी निश्चितपणे कमी होणार आहे. २) सर्व नद्यांचे De-Silting करणे आवश्यक आहे. काही प्रमाणात De- Silting बंधारे तोडल्याने झालेले आहे. ३) या क्षेत्रातील जाणकारांच्या मते बंधारे तोडल्याने व De-Silting केल्याने पूररेषेची पातळी सुमारे १.५० मीटरने कमी झालेली आहे. या बाबीचा विचार करता आता दर्शविलेल्या निळया पूररेषेच्या पातळीपेक्षा १.५० मीटर ने कमी येणा-या पातळीपर्यंत ना-विकास क्षेत्र प्रस्तावित करावे व याप्रमाणे निषिध्द क्षेत्राची फेरआखणी करणेस तसेच फेरबदल प्रस्तावात नमूद केलेल्या शेकडो हेक्टर ना विकास क्षेत्रामध्ये अतिक्रमण, अनधिकृत बांधकाम अथवा झोपडपटटी होणार आहे, त्यामुळे ना-विकास क्षेत्र प्रस्तावित करण्यापेक्षा निळया व लाल पूररेषेची फक्त आखणी करुन मंजूर विकास योजनेतील झोनप्रमाणे कार्यवाही करणे योग्य होईल. यासाठी सदर क्षेत्रातील विकसनास परवानगी देताना निळी पूररेषा/निषिध्द क्षेत्र विचारात न घेता Habitable Slab ची उंची लाल पूररेषेच्या वर ५०० मिलीमीटर ठेवून त्याखालील क्षेत्र पार्किंग करिता वापरता येईल व अशाप्रकारचे बांधकामास Structural Stability प्रमाणपत्र घेऊन मंजूर विकास नियंत्रण नियमावली प्रमाणे अनुज्ञेय चटई क्षेत्र व टी.डी.आर.चा वापर करुन परवानगी द्यावी. तसेच परवानगी देतेवेळी Habitable Slab च्या खाली कोणतेही प्रकारचे बंदिस्त/अथवा प्रवाहाला अडथळा होईल असे बांधकाम करता येणार नाही. ज्या ठिकाणी नदीच्या कडेला

ग्रीन बेल्ट दर्शविलेला नाही त्याठिकाणी ३० मीटर पर्यंत बांधकामास परवानगी देऊ नये परंतु विकसनाचे Potential उर्वरित क्षेत्रात वापरता यावे तसेच नदीच्या कडेने पूररेषेमध्ये ना विकास क्षेत्र प्रस्तावित करणेपेक्षा मंजूर डी.पी.नुसार विकसन करावे व निळया पूररेषेपर्यंतच्या क्षेत्रात रेडीरेकनरच्या २५ % दराने रिव्हर फ्रंट डेव्हलपमेंट चार्ज म्हणून प्रिमियम अकरावा व अशा प्रकारे जमा होणा-या निधीमधून नदी सुशोभीकरण, De- Silting तसेच नदीला समांतर व नदीपासून ३० मीटर मध्ये १८ मीटर रुंदीचा Elevated Road डेव्हलप करावा. मनपाने यापूर्वीच श्री.पी.के.दास यासारख्या वास्तूविशारदाची नेमणूक करुन अशा प्रकारच्या योजनेत पुढाकार घेतलेला आहे. मात्र मनपाच्या तिजोरीवर भार न देता अशा प्रकारच्या प्रीमियमच्या निधीमधून River Front Development चा प्रकल्प राबवून इतर महापालिकांसमोर एक आदर्श ठेवावा सदर ठराव कायम होण्याची वाट न पाहता माननीय आयुक्त यांना हरकती सूचना मागवणे व इतर पुढील कार्यवाही करण्याकरिता अधिकार देण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड मनपाच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये म.प्रा.व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये, नियमामध्ये फेरबदल करणेबाबत मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी मा.महानगरपालिका सभेच्या मान्यतेकामी प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यामध्ये मा.आयुक्त यांनी नवीन नियम प्रस्तावीत केले असून प्रस्तावित नियम क्र.९.४. या नियमामध्ये खालील प्रमाणे बदल व सुधारणा व्हावी.

a) Reservation of open users like Garden, play Ground, Cremation Centre, Burial Ground, Roads, Sewage Treatment plants, Water Treatment plants, Projects related to water supply and Sewage Treatment plants shall be allowed in blue lines. Private developer can apply to commissioner for the same and shall be allowed to applicant with the consent of irrigation Department, Temporary structures shall allowed within the months of October to June in year. प्रस्तावित नियम क्र.९.४ मध्ये सुधारणा होऊन पुढील कार्यवाही व्हावी. तसेच नदीच्या बाजूने ५० मी. क्षेत्र हे हरीतपटटा म्हणून ठेवावे व त्यामधून २४ मीटर रस्ता प्रस्तावित करावा त्यामुळे नदीचे सुशोभिकरण चांगले होईल व नदीच्या बाजूने रस्ता प्रस्तावित केल्यामुळे वाहतुकीचा प्रश्न सुटेल व नदीच्या बाजूने (नदीसुधार प्रकल्प) जे आपण करणार आहोत त्यासाठी जाण्या येण्यासाठी त्याचा चांगला उपयोग होईल.तसेच नदी पातळी व निळी पूररेषा यामधील क्षेत्र (गावठाण भाग वगळून) हे ना विकास क्षेत्र म्हणून प्रस्तावित आहे. गावठाण भागातील क्षेत्रात बांधकाम/पुर्न:विकास हे पाटबंधारे विभागाने घालून दिलेल्या अटी, शर्ती व परवानगीने करता येईल असे प्रस्तावित केले आहे. परंतू गावठाण भागातील क्षेत्रात बांधकाम/पुर्न:विकास करताना प्रत्येक वेळी पाटबंधारे विभागाची परवानगी घेणे सोईचे ठरणार नाही. गावठाण भागातील क्षेत्रात बांधकाम/पुर्न:विकास करताना पाटबंधारे विभागाने घालून दिलेल्या अटी, शर्ती निश्चित

कराव्यात. तसेच पाटबंधारे विभागाच्या अटी, शर्तीस अधिन राहून बांधकाम/ पुर्न:विकास परवानगी महानगरपालिकेनेच देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल -६७ प्रतिकूल -०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.उल्हास शेट्टी** - महापौर साहेब, विषय क्रमांक १३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक - १३

दिनांक - २७/६/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/१०/५४७/२०१३ दि.१०/०६/२०१३

२) मा.शहर सुधारणा समिती सभा दि.११/०६/२०१३ ठ.क्र.१४ नुसार

मा.उच्च न्यायालयाने मनपा ठराव क्र.९८७ मधील बीआरटी प्रिमियम बद्दल उपसुचनेनुसार घेतलेला ठराव रद्द केला असल्याने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची प्रक्रिया सुरु करणेकामी मा.महापालिका सभेची नव्याने मान्यता घेणे आवश्यक आहे. बीआरटी कॉरिडोअरचे नियमावलीतील नियम क्र.एन २.५, एन २.५.१, एन २.५.२, एन २.५.३, एन २.५.४, मध्ये सुधारणा करणे व नियम क्र. एन २.५.७ नव्याने समाविष्ट करणे योग्य होईल. फेरबदल प्रस्तावाचा तपशिल प्रस्तावात नमुद आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत बीआरटी कॅरिडॉरचे नियमावलीतील नियम क्र.एन २.५, एन २.५.१, एन २.५.२, एन २.५.३, एन २.५.४, मध्ये सुधारणा करणे व नियम क्र. एन २.५.७ नव्याने समाविष्ट करणेची तरतूद करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करण्यास, फेरबदलाची सुचना प्रसिध्द करुन नागरिकांच्या हरकती/सुचना मागविणे, त्यानुषंगाने सुनावणी घेऊन निर्णय घेणे व तदनंतर फेरबदलाचा प्रस्ताव शासनास मंजूरीसाठी सादर करणे ही सर्व वैधानिक कार्यवाही करण्यास मा.आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.राजू मिसाळ** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.संजय काटे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आज विषयपत्रिकेवर जो बी.आर.टी. प्रिमियम मध्ये फेरबदलाचा विषय आहे त्याबाबत ब-याच सन्माननियांनी आपल्या भावना व विचार व्यक्त केलेल्या आहेत. मलाही याबाबत थोडे बोलावयाचे आहे. मा.आयुक्त साहेब, मला एक प्रश्न पडतो की, आपल्याकडे एखादा नियम आला की तो किती वर्षांचा विचार करुन आणला जातो. हेच मला समजत नाही? ब्रिटीश काळात जे नियम होते. उदा. भुमिसंपादनाचा कायदा असेल, बांधकाम परवानगीचा विषय असेल किंवा अन्य सार्वजनिक क्षेत्रात ब्रिटीश काळात जी नियमावली होती. ती आजही ब्रिटीश भारतातून जाऊन ६५ वर्षे झाली. तरीही थोडाफार बदल करुन चाललेली आहे. म्हणजेच ब्रिटीश प्रशासन हे जरी हुकूमशाहीतील प्रशासन होते तरी कुठलेही नियम बनविताना नागरीकांना वारंवार त्रास होणार नाही याचा विचार करुन ते नियम बनवित होते. परंतु आज आपले लोकशाहीतील प्रशासन हे जणु काही लोकांना त्रास देण्यासाठीच आहे की काय? असा प्रश्न माझ्यासारख्याला पडतो. कारण बी.आर.टी. प्रकल्प आपल्या शहरात ज्या ८ रस्त्यांवर राबविला जातो आहे, त्यापैकी एक मुख्य रस्ता म्हणजे मुंबई-पुणे रस्ता होय. या रस्त्यावर माझी २.५ एकर मिळकत/प्रॉपर्टी आहे. ही मिळकत सन २००४ मध्ये विकसीत करण्यास घेतली. आमची जागा ही औद्योगिक झोनमध्ये होती. त्यामुळे पाहिजे त्याप्रकारे विकास करता येत नव्हता. नियम आडवे येत होते. तरी त्यातुन पुढे जावु म्हटले, त्यावेळेस त्या जागेस १ FSI होता. बांधकाम परवानगी विभागाच्या नियमानुसार T.D.R. लोड करता येत नव्हता. त्यावर आम्ही प्रशासन प्रश्न विचारला की, T.D.R. का लोड करता येणार नाही काय कारण? तर अधिकारी म्हणाले की, हायवेपासुन ४० मी. अंतरापर्यंत T.D.R. लोड करण्यास मनाई आहे. कारण काय? तर जास्तीचा FSI वापरला तर जास्त बांधकाम होईल आणि पर्यायाने त्या ठिकाणी जास्त लोकांची वर्दळ होईल व वेडेवाकडी वाहने लावणे, ट्रॅफिक जाम होणे, असे प्रकार होतील. त्यामुळे T.D.R. लोड करण्यास परवानगी नाही अशी प्रशासनाची भुमिका होती. मग आम्ही आपला प्लॅन बनविला. प्लॅन बांधकाम परवानगी विभागात दाखल करायचा तर त्यावेळेस कळाले की, आय.टु.आर. येतोय, थोडं थांबा! आय.टु.आर. आला तर प्लॉटचा चांगल्या प्रकारे विकास करता येईल म्हणुन प्लॅन दाखल केला नाही. थोडं थांबलो. कालांतराने आय.टु.आर. चा नियम आला. मग आय.टु.आर. करुन घेण्यासाठी आमची धावपळ सुरु झाली. ती ऑर्डर करुन आणण्यात आमची दोन ते अडीच वर्षे गेली. तोपर्यंत इकडे बी.आर.टी.एस. कॉरीडॉर आला व आमची जागा बी.आर.टी.एस. कॉरीडॉर मध्ये आली, नियम बदलले. ज्या जागेवर पूर्वी T.D.R. लोड करता येत नव्हता. त्या जागेवर आता एक F.S.I. ऐवजी १+ ०.४+०.४+०.२ म्हणजेच जवळ जवळ दोन F.S.I. ची मान्यता मिळु लागली. आम्ही म्हटलं की, आता गर्दी नाही का वाढणार? ट्रॅफिक जाम होणार नाही का? तर प्रशासन म्हणाले की, F.S.I. वाढविला त्याबरोबर पार्कींग वाढवलंय, त्यावर कळालं की, जेवढे

बांधकामाचे क्षेत्रफळ त्याच्या दुप्पट पार्कींग आणि त्यावर कहर म्हणुन त्यातील २५ टक्के पार्कींग महापालिकेस फुकट द्यायची आणि जो जास्तीचा T.D.R. वापरणार त्यावर १२००/- रुपये प्रति चौ.फुटाने महानगरपालिकेस प्रिमियम भरावयाचा, म्हणजेच ती जास्तीची जमीन विकत आणल्यासारखेच झाले. त्यावेळेस आम्ही म्हणालो की, ते चुकीचे आहे. एवढा प्रिमियम आणि पार्कींग चुकीचे आहे. पण प्रशासनाने दुर्लक्ष केले आणि स्वतःच्या अधिकाराचा वापर करुन नियम मंजूर केला. त्याचा परिणाम असा झाला की, बी.आर.टी.एस. कॉरीडोरमधील मिळकती विकसित करण्यास कोणीही जमीन मालक अथवा व्यावसायिक तयार होईना, त्यामुळे बी.आर.टी.एस. रुटवरील विकास पाहीजे तसा झाला नाही. किंबहुना विकासच खुंटला असं म्हटलं तरी वावगं ठरणार नाही. म्हणजेच बी.आर.टी.एस. नियमावली पुर्णतः फेल गेली. मग, प्रशासन सुद्धा आमच्या सुरात सुर मिसळायला लागले की, तो दुप्पट पार्कींगचा व प्रिमियमचा नियम चुकीचा झाला वगैरे वगैरे. मग, आम्ही म्हटलं की, ह्यांच काय जातयं, चला आपलं कामाला लागा. प्लॅन दाखल करु. झालं, आम्ही प्लॅन दाखल केला. आम्हाला आय.टु.आर. च्या नियमानुसार ५ टक्के जागा महापालिकेला द्यायची म्हणून आम्ही मागे लागलो तर आता प्रशासन म्हणतय, थांबा थांबा.. आम्ही म्हणालो, आहो झालं काय? ५ टक्के जागा घ्याना! तरी हे म्हणतात थांबा थांबा.... म्हटलं आता काय झाले, तर ५ टक्के जागा ही हायवे टचच द्या, अशी प्रशासनाची भुमिका. आम्ही म्हटलं का? कशासाठी, साईडला देतो, बाजुला देतो. तर नाही नाही पुढेच पाहीजे. हायवे टचचं पाहीजे, आम्ही म्हटलं का? तर कळाले मेट्रो.. झालं परत अडकलो. म्हटलं जाऊ द्यात, अडथळे हे भुमिपुत्राच्या पाचवीलाच पुजलेत! ही अडथळ्यांची शर्यत पार करुन पुढे जाऊ म्हणून नविन मेट्रोचे नियम काय आहेत ते पाहु. जाऊन पाहतो तर काय म्हणे आमच्या जागेचा थोडासा भाग मेट्रो स्टेशनने बाधीत होतो आहे असे आम्हाला कळाले. मग आम्ही आमची यंत्रणा कामाला लावली तर कळाले की, हे दुसरीकडचे स्टेशन कोणाच्यातरी सोयीसाठी आमच्या बोकांडी आणुन टाकले. आपल्या डीडीटीपींना भेटलो तर त्या सहजच म्हणाल्या, सगळीच जागा देवुन टाका ना. आता काय बोलायचं? मॅडम तुम्ही म्हणता सगळी जागा द्या. आता तुम्हाला माझ्याच कुटूंबातील संपादीत जमीनीची माहिती द्यायची झाली तर सांगतो. माझ्या कुटूंबाची शासकीय व निमशासकीय प्रकल्पांसाठी २२३ एकर जागा संपादित व आरक्षित आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात माझ्या कुटूंबाची जमीन शहराच्या विकासासाठी कारणी लागली. मॅडम तुम्हाला सांगतो, ह्या शहराचा विकास होत असताना या ठिकाणच्या भुमीपुत्रांच्या जमिनी गेल्याने या ठिकाणता भुमीपुत्र रस्त्यावर आला, कंगाल झाला, दिशाहीन झाला. ओपन कॅटेगरीमध्ये असल्याने कुठल्याच सवलती नाहीत हे महापालिकेचे व शासनाचे प्रकल्प नसुन भुमीपुत्रांची थडगी आहेत अशी माझी भावना आहे. पुन्हा बी.आर.टी.च्या विषयाकडे येतो. मेट्रोच्या लगत असणा-या मिळकतींना आता चार F.S.I. मिळणार. पार्कींग

किती तर पार्कींग एकदम कमी लागणार म्हणजे सन २००४ साली ज्या जागेवर T.D.R. लोड करता येत नव्हता, त्याच जागेवर सन २००८ मध्ये म्हणजे बी.आर.टी.एस. आल्यानंतर २.० F.S.I. आणि आता २०१३ नंतर चार F.S.I. व पार्किंग कमी म्हणजेच १० वर्षांत ३ नियम तेही एकदम विरोधाभास टोकाचे! आणि आता परत फेरबदलाचा प्रस्ताव. असाच आणखी एक विषय मी आपणास सांगतो तो म्हणजे पाणी बिल, पाणीपट्टी जी लोकं पाण्याच बिल भरणार नाहीत, त्याचचं बिल पुढील वर्षी दुप्पट, तरी नाही भरलं तर तिप्पट, चौपट असा एक नियम आपल्या प्रशासनाने आणला होता. परिणाम काय झाला. लोकांची बिलं फुगली. ज्याची बिलाची रक्कम १,६००/- रुपये होती ती दंडामुळे २० ते २२ हजार झाली. लोकांनी बिलं भरलीच नाही. प्रशासनाची नाचक्की झाली. प्रशासनाची नाचक्की झाली नामुष्की ओढवली. मग काय आता माघार कशी घ्यायची मग काय, फेरबदल नको त्यापेक्षा अभय योजना आणली आणि कशी तरी झालेली चुक झाकुन टाकली. अहो काय चाललय काय? का छळता, एकदाचा काय तो नियम बनवा ना! म्हणून असे वाटते की, ब्रिटीश प्रशासन बरं होतं. ते असं सारखं बदलत तर नव्हतं. तर आता बीआरटीएस फेरबदल चुक प्रशासनाची पण राजकीय मंडळी एकमेकाकडे संशयाने बघायला लागली. कोण म्हणतो अरे हा बिल्डरांचा प्रतिनिधी आहे तर कोण म्हणतो अरे हयाची सेटींग झाली. त्याची स्वत:ची अडकली तर काहीजण चातक पक्ष्याप्रमाणे आपल्याला काय मिळणार की नाही याची वाट पाहतायत तर काहीजण फक्त विरोधाला विरोध असो, म्हणून राष्ट्रवादी कॉँग्रेसचा सत्ताधारी पक्षाचा एक जबाबदार प्रतिनिधी म्हणून सांगतो की, हे होत असताना कुठे भ्रष्टाचार होणार नाही ना, कुठे पुन्हा दुरुस्ती करावी लागणार नाही ना याची दक्षता घ्यावी लागणार आहे तसेच ज्या रस्त्यांवर बीआरटी कॉडीडोर आहे त्या रस्त्यांवर तेवढया प्रमाणात डेव्हलप केलेले आहे का? नाहीतर नंतर सगळया यंत्रणेवर ताण वाढला आणि सगळं विस्कळीत झालं आणि परिस्थिती आवाक्याबाहेर गेली अशी प्रकारचे प्रसंग उदभवायला नको आणि मग पुन्हा दुरुस्ती फेरबदल असं व्हायला नको. त्याचप्रमाणे बीआरटी कॉडीडोर डिक्लअर करताना जे रुट यामध्ये घेतलेले आहेत त्यासाठी काय क्रायटरीया लावला काय निकष लावला हे ही पाहणं गरजेचे आहे. सगळया बाजुचा समतोल राखुन निर्णय घेणे आवश्यक आहे. सगळयांनी याकडे सकारात्मक दृष्टीने पाहून व शहराचा विकास दृष्टीसमोर ठेवून योग्य तो निर्णय घ्यावा. व शहरातील सर्वसामान्य नागरीक, व्यापारी, कारखानदार, बांधकाम व्यवसायीक यांच्याकडून कररुपाने विकसन शुल्करुपाने जास्तीचे पैसे न ओरबडता कमीत कमी आकारणी कशी करता येईल हे ही पाहणे हे आपले कर्तव्य व जबाबदारी आहे. तरी मा.आयुक्त साहेब मी आशावादी आहे कारण आजच्या हया लोकशाही प्रशासनात देशी सरकारात परदेशी नावाचे आयुक्त आम्हाला लाभले. तरी डॉ.परदेशी साहेबांनी चालेला हा मनमानी व चुकीच्या कारभारास

पायबंध घालण्यासाठी प्रशासनास योग्य प्रमाणात डोस दयावेत व सर्वसामान्य नागरीकांचा हा छळ थांबवावा हीच विनंती.

**मा.प्रशांत शितोळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मा.काटे यांच्या अडचणी खूप आहेत. म्हणून त्यांनी कॅल्क्युलेशन सांगितले. महापालिकेची बिल्डींग सगळी महापालिकाच काटेंच्या परिसरात आपण वावरतोय. चांगला विषय ठेवला आहे. या विषयाला पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो आहे – पिंपरी चिंचवड मनपाच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये म.प्रा.व न.र.अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये बीआरटी कॉरिडॉर संबंधिचे नियम क्र.एन-२.५ मध्ये फेरबदल करणेबाबत मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी मा. महानगरपालिका सभेच्या मान्यतेकामी प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर प्रस्तावाबाबत फिडर रुट क्र.४ मध्ये बदल करण्याकरिता खालीलप्रमाणे उपसूचना सादर करण्यात येत आहे. बीआरटी फिडर रुट क्र.४ हा औंध-रावेत रस्त्यास समांतर असणारा रस्ता असून त्यामध्ये खालीलप्रमाणे बदल करुन वाढ करण्यात यावी.

१) बीआरटी औंध-रावेत रस्त्यापासून सध्या अस्तित्वात असलेला पुणे ऊरो व सामान्य रुग्णालयाच्या हद्दीवरुन पूर्व-पश्चिम असा सांगवी फाटा ते नवी सांगवी येथून पीडब्ल्यूडी मैदान-साई चौक-कृष्णा चौक-काटे पूरम चौक ते जिजाऊ उद्यान, पिंपळेगुरव पर्यंत पुढील क्रमांक ४ च्या फिडर रस्त्यास जोडण्यात यावा.

सदर रस्ता पुढे औंध-रावेत या बीआरटी मुख्य रस्त्यास व मुख्य बस टर्मिनल यास जोडणारा आहे व हा रस्ता ९०% रहिवासी विभाग असल्याने असंख्य नागरीकांची वर्दळ चालू असते. त्यामुळे सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा पूरेपुर उपयोग नागरिकांना होणार आहे. त्यामुळे बीआरटी नियम एन २.५ मधील फिडर रुट क्र. ४ मध्ये वरील प्रमाणे बदल करण्यात यावा. सदर ठराव कायम होणेची वाट न पहाता मा.आयुक्त यांना सुचना/हरकती मागविणे व इतर पुढील कार्यवाही करणेकरीता अधिकार देणेस मान्यता देणेत यावी.

तसेच पिंपरी चिंचवड मनपाच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये म.प्रा.व न.र.अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये नियमामध्ये फेरबदल करणेबाबत मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी मा. महानगरपालिका सभेच्या मान्यतेकामी प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यामध्ये मा.आयुक्त यांनी नवीन नियम प्रस्तावित केले असून प्रस्तावित नियम क्र.९.४ या नियमामध्ये खालील प्रमाणे बदल व सुधारणा व्हावी.

a) Reservation of open users like Garden, play Ground, Cremation Center, Burial Ground, Roads, Sewage Treatment plants, Water Treatment plants, Projects related to water supply and Sewage Treatment plants shall be allowed in blue lines. Private developer can apply to commissioner for the same and shall be allowed to applicant with the consent of Irrigation Department,

Temporary structures shall allowed within the months of October to June in year.

वरीलप्रमाणे प्रस्तावित नियम क्र.९.४ मध्ये सुधारणा होवून पुढील कार्यवाही व्हावी. सदर ठराव कायम होणेची वाट न पहाता मा.आयुक्त यांना सुचना/हरकती मागविणे व इतर पुढील कार्यवाही करणेकरीता अधिकार देणेत यावा.

तसेच पिंपरी चिंचवड मनपाच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये म.प्रा.व न.र.अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये बीआरटी कॉरिडॉर संबंधिचे नियमामध्ये फेरबदल करणेबाबत मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी मा.महानगरपालिका सभेच्या मान्यतेकामी प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर प्रस्तावाबाबत खालीलप्रमाणे बीआरटी कॉरिडॉर नियम एन २.५.८ हा नव्याने समाविष्ट करण्याकरिता उपसूचना सादर करीत आहे. बीआरटी कॉरिडॉर व फिडर रस्ते तसेच भविष्यातील मेट्रो रेल्वे प्रकल्प यांचा विचार करता. या सर्व मार्गावरील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सुरळीत झाल्यानंतर नागरीकांची वर्दळ व संपूर्ण शहराचा विकास मोठया प्रमाणावर होणार आहे. या बाबी लक्षात घेता नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनाने व गेल्या काही वर्षातल्या अनेक सार्वजनिक व खाजगी इमारतीमधील आगीमुळे झालेल्या दुर्घटनांमुळे अनेक ठिकाणी झालेली जिवित व वित्त हानी यांचा विचार करता पिंपरी चिंचवड शहराचा भविष्यातील विकासाचा वेग पाहता याबाबत सुरक्षा उपाय व खबरदारी घेणे आवश्यक आहे. त्याकरिता बीआरटी कॉरिडॉर व त्याकरिता असलेली फिडर रुट यावरील विकास कामांबाबत खालीलप्रमाणे बीआरटी नियम एन २.५.८ नव्याने समाविष्ट करुन त्याप्रमाणे अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात यावी.

**<u>नवीन नियम एन - २.५.८</u>** - बीआरटी कॉरिडॉर व सर्व फिडर रस्ते यावर परवानगी दिल्या जाणा-या अग्निशामन सुविधा लागू असणा-या सर्व प्रकारच्या बांधकामांना सुरक्षा उपाय म्हणून महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ व २००९ अन्वये महाराष्ट्र फायर सर्व्हिसेस (महाराष्ट्र शासन) द्वारा मान्यता प्राप्त अभिकरण त्यामध्ये आगरोधक व आग व्यवस्थापन (**Passive Fire Protection**) दर्जा अ ते ड आणि अग्निप्रतिबंधात्मक प्रणाली **(Active Fire Protection)** दर्जा अ व ब आणि वरील वर्गवारी प्रमाणे महानगरपालिका नोंदणी अभिकरण दर्जा अ या वर्गातील मान्यताप्राप्त अभिकरणांना अग्निशमन सेवा व सुविधा देण्याची परवानगी देता येऊ शकेल. वरीलप्रमाणे नवीन नियम तयार करुन जनहितार्थ असल्याने वरील उपसूचनेला मान्यता देण्यात येत आहे. सदर ठराव कायम होणेची वाट न पहाता मा. आयुक्त यांना सूचना/हरकती मागविणे व इतर पुढील कार्यवाही करणेकरीता अधिकार देणेस मान्यता देणेत यावी.

**मा.प्रसाद शेट्टी** – मा.महापौर साहेब, सदर उपसूचनेला अनुमोदन देतो.

**मा.योगेश बहल** – मा.महापौर साहेब,मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो –

बीआरटी कॉरिडॉरमध्ये असणा-या मिळकती सध्याच्या प्रचलित नियमानुसार गृहीत धरलेल्या **Potential** (दोनपट एफ.एस.आय./टी.डी.आर.) वापरुन विकसीत करणे अशक्य आहे. बी.आर.टी.रस्त्याचा वापर फक्त १०० मीटर बी.आर.टी.कोरीडॉरमधील रहिवासी न करता संपूर्ण शहरातील रहिवासी व मिळकतधारक करणार आहेत. सद्य स्थितीत मंजूर झालेल्या नियमावलीमुळे बी.आर.टी. कॉरिडॉरमधील मिळकती विकसीत करण्याकरिता अतिशय प्रतिकूल परिस्थिती आहे. बीआरटी ची यशस्वी अंमलबजावणी करणेकरीता, बीआरटी कॉरिडॉरमधील मिळकतधारकांना **Incentive** देऊन त्यांच्याकडून प्रिमियम घेणे अथवा महापालिकेचा लाभ करुन घेणे योग्य होईल. ज्या योजनेचा लाभ शहरातील सर्व मिळकतधारकांना/ रहिवाशांना होणार आहे. अशा योजनेचा भुर्दंड ठराविक लोकांनाच सोसावा लागणे संयुक्तिक होणार नाही व म्हणूनच वाढीव **Potential** च्या बदल्यात प्रिमियम आकारणे. परंतु महापालिकेच्या मिळणा-या निधीवर परिणाम होऊ नये याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. शहरातील सर्व मिळकतधारकांना ४०% टी.डी.आर.वापरण्याकरिता कोणताही प्रिमियम भरावा लागत नाही. असेच तत्व बीआरटी कॉरिडॉरमधील मिळकतींना वापरावे व निधी संकलनासाठी बीआरटी कॉरिडॉरची रुंदी १०० मीटर ऐवजी रस्त्याच्या दुतर्फा २०० मीटर करावी व अशा २०० मीटर अंतरापर्यंतच्या मिळकतींना बी.आर.टी.चे नियम लावावेत व अशा मिळकत धारकांकडून ४०% एफ.एस.आय./टी.डी.आर.वापरणेकरिता कोणत्याही प्रकारचा प्रिमियम आकारु नये व ४०**%** पेक्षा जास्त टी.डी.आर. वापरल्यास प्रिमियम आकारणेस मान्यता देणेत यावी.

| **RULE NO** | **EXISTING RULE** | **PROPOSED RULE** | **SUGGESTED RULE** |
|---|---|---|---|
| **N-2.5.2 TDR Utilisation on payment of premium charges** | **TDR generated from any zone, from the sanctioned Development plan of old and extended limit shall be allowed in the BRT corrider on payment of premium charges, which should not be less than those decided vide** | **TDR generated from any TDR zone shall be allowed for utilisation in the BRT Corridor on payment of premium charges. The Premium charge shall be the difference of land rate where TDR is to be utilised & from where TDR** | **TDR generated from any TDR zone shall be allowed for utilisation in the BRT Corridor on payment of premium charges.The Premium charge shall be the difference of land rate where TDR is to be utilised & from where TDR has** |

| | | | |
|---|---|---|---|
| | General Body Resolution No 452,dt.18.09.2008. These Premium charges are to be decided by the Commissioner, PCMC from time to time. Premium shall not be charged for the 0.40 FSI of road widening area of receiving plot. | has been generated as per the prevailing Annual Statement of Rates ( ASR ) or at the rate of Rs.5000/- per sq m whichever is more. Premium rate = (Land rate as per ASR where TDR to be utilized land rate as per ASR from where TDR generated generated) or Rs. 5000/- per sq.m whih ever is more. The minimum rate of premium may be suitably revised as & when required, by the Municipal Commissioner No. Premium shall be chargeable for use of additional FSI permissible as per Rule No. N-2.3. | been generated as per the prevailing Annual Statement of Rates (ASR) or at the the rate of Rs.5000/- per sq m whichever is more. Premium rate= (Land rate as per ASR where TDR to be utilized – Land rate as per ASR from where TDR generated) or Rs.5000/- per sq.m which ever is more. The minimum rate of premium may be suitably revised as & when required, by the Minicipal Commissioner No. Premium to be charged for use of FSI/TDR upto to 40% as it is being followed elsewhere in the city. |

बी.आर.टी. कॉरीडॉरचे प्रचलित नियम व प्रस्तावित नियमावली पाहता छोटया मिळकती विकसीत करणे शक्य होणार नाही, ज्याप्रमाणे ले-आऊट मंजूर करणेकरिता मिळकतीचे कमीत कमी क्षेत्र २००० चौ.मी.असावे लागते त्याप्रमाणे बी.आर.टी.कॉरीडोरचे नियम २००० चौ.मी. अथवा २००० चौ.मी. पेक्षा मोठया मिळकतीनाच लावावे व अशा प्रकारच्या छोटया मिळकती आत्ताच्या प्रचलित नियमाप्रमाणेच विकसीत करणेस परवानगी दयावी व

बीआरटी कॉरीडोरचा कोणताही लाभ देऊ नये. सदर ठराव कायम होण्याची वाट न पाहता माननीय आयुक्त यांना हरकती सूचना मागविणे व इतर पुढील कार्यवाही करण्याकरिता अधिकार देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**मा.प्रसाद शेट्टी** – मा.महापौर साहेब, सदर उपसूचनेला अनुमोदन देतो.

**मा.उल्हास शेट्टी** – मा.महापौर साहेब, सर्व उपसूचना स्विकारल्या आहेत.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक -३०८ विषय क्रमांक - १३
दिनांक - २७/६/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/१०/५४७/२०१३ दि.१०/०६/२०१३
२) मा.शहर सुधारणा समिती सभा दि.११/०६/२०१३ ठ.क्र.१४ नुसार

मा.उच्च न्यायालयाने मनपा ठराव क्र.९८७ मधील बीआरटी प्रिमियम बद्दल उपसुचनेनुसार घेतलेला ठराव रद्द केला असल्याने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची प्रक्रिया सुरु करणेकामी मा.महापालिका सभेची नव्याने मान्यता घेणे आवश्यक आहे. बीआरटी कॉरिडोअरचे नियमावलीतील नियम क्र.एन २.५, एन २.५.१, एन २.५.२, एन २.५.३, एन २.५.४, मध्ये सुधारणा करणे व नियम क्र. एन २.५.७ नव्याने समाविष्ट करणे योग्य होईल. फेरबदल प्रस्तावाचा तपशिल प्रस्तावात नमुद आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत बीआरटी कॅरिडॉरचे नियमावलीतील नियम क्र.एन २.५, एन २.५.१, एन २.५.२, एन २.५.३, एन २.५.४, मध्ये सुधारणा करणे व नियम क्र. एन २.५.७ नव्याने समाविष्ट करणेची तरतूद करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करण्यास, फेरबदलाची सुचना प्रसिध्द करुन नागरिकांच्या हरकती/सुचना मागविणे, त्यानुषंगाने सुनावणी घेऊन निर्णय घेणे व तदनंतर फेरबदलाचा प्रस्ताव शासनास मंजूरीसाठी सादर करणे ही सर्व वैधानिक कार्यवाही करण्यास मा.आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मा.महापालिका सभेची मंजूरी आवश्यक असल्याने मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

मा.उच्च न्यायालयाने मनपा ठराव क्र.९८७ मधील बीआरटी प्रिमियम बद्दल उपसुचनेनुसार घेतलेला ठराव रद्द केला असल्याने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची प्रक्रिया सुरु करणेकामी मा.महापालिका सभेची नव्याने मान्यता घेणे आवश्यक आहे. बीआरटी कॉरिडोअरचे नियमावलीतील नियम क्र.एन २.५, एन २.५.१, एन २.५.२, एन २.५.३, एन २.५.४, मध्ये सुधारणा करणे व नियम क्र. एन २.५.७ नव्याने समाविष्ट करणे योग्य होईल. फेरबदल प्रस्तावाचा तपशिल प्रस्तावात नमुद आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत बीआरटी कॅरिडॉरचे नियमावलीतील नियम क्र.एन २.५, एन २.५.१, एन २.५.२, एन २.५.३, एन २.५.४, मध्ये सुधारणा करणे व नियम क्र. एन २.५.७ नव्याने समाविष्ट करणेची तरतूद करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करण्यास, फेरबदलाची सुचना प्रसिध्द करुन नागरिकांच्या हरकती/सुचना मागविणे, त्यानुषंगाने सुनावणी घेऊन निर्णय घेणे व तदनंतर फेरबदलाचा प्रस्ताव शासनास मंजूरीसाठी सादर करणे ही सर्व वैधानिक कार्यवाही करण्यास मा.आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड मनपाच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये म.प्रा.व न.र.अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये बीआरटी कॉरिडॉर संबंधिचे नियम क्र.एन-२.५ मध्ये फेरबदल करणेबाबत मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी मा. महानगरपालिका सभेच्या मान्यतेकामी प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर प्रस्तावाबाबत फिडर रुट क्र.४ मध्ये बदल करण्याकरिता खालीलप्रमाणे उपसूचना सादर करण्यात येत आहे. बीआरटी फिडर रुट क्र.४ हा औंध-रावेत रस्त्यास समांतर असणारा रस्ता असून त्यामध्ये खालीलप्रमाणे बदल करुन वाढ करण्यात यावी.

१) बीआरटी औंध-रावेत रस्त्यापासून सध्या अस्तित्वात असलेला पुणे ऊरो व सामान्य रुग्णालयाच्या हददीवरुन पूर्व-पश्चिम असा सांगवी फाटा ते नवी सांगवी येथून पीडब्ल्यूडी मैदान-साई चौक-कृष्णा चौक-काटे पूरम चौक ते जिजाऊ उद्यान, पिंपळेगुरव पर्यंत पुढील क्रमांक ४ च्या फिडर रस्त्यास जोडण्यात यावा.

सदर रस्ता पुढे औंध-रावेत या बीआरटी मुख्य रस्त्यास व मुख्य बस टर्मिनल यास जोडणारा आहे व हा रस्ता ९०% रहिवासी विभाग असल्याने असंख्य नागरीकांची वर्दळ चालू असते. त्यामुळे सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा पूरेपुर उपयोग नागरिकांना होणार आहे. त्यामुळे बीआरटी नियम एन २.५ मधील फिडर रुट क्र. ४ मध्ये वरील प्रमाणे बदल करण्यात यावा. सदर ठराव कायम होणेची वाट न पहाता मा.आयुक्त यांना सुचना/हरकती मागविणे व इतर पुढील कार्यवाही करणेकरीता अधिकार देणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच पिंपरी चिंचवड मनपाच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये म.प्रा.व न.र.अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये नियमामध्ये फेरबदल करणेबाबत मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी मा. महानगरपालिका सभेच्या मान्यतेकामी प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यामध्ये मा.आयुक्त यांनी नवीन नियम प्रस्तावित केले असून प्रस्तावित नियम क्र.९.४ या नियमामध्ये खालील प्रमाणे बदल व सुधारणा व्हावी.

a) Reservation of open users like Garden, play Ground, Cremation Centre, Burial Ground, Roads, Sewage Treatment plants, Water Treatment plants, Projects related to water supply and Sewage Treatment plants shall be allowed in blue lines. Private developer can apply to commissioner for the same and shall be allowed to applicant with the consent of irrigation Department, Temporary structures shall allowed within the months of October to June in year.

वरीलप्रमाणे प्रस्तावित नियम क्र.९.४ मध्ये सुधारणा होवून पुढील कार्यवाही व्हावी. सदर ठराव कायम होणेची वाट न पहाता मा.आयुक्त यांना सुचना/हरकती मागविणे व इतर पुढील कार्यवाही करणेकरीता अधिकार देणेत येत आहे.

तसेच पिंपरी चिंचवड मनपाच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये म.प्रा.व न.र.अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये बीआरटी कॉरिडॉर संबंधिचे नियमामध्ये फेरबदल करणेबाबत मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी मा.महानगरपालिका सभेच्या मान्यतेकामी प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर प्रस्तावाबाबत खालीलप्रमाणे बीआरटी कॉरिडॉर नियम एन २.५.८ हा नव्याने समाविष्ट करण्याकरिता उपसूचना सादर करीत आहे. बीआरटी कॉरिडॉर व फिडर रस्ते तसेच भविष्यातील मेट्रो रेल्वे प्रकल्प यांचा विचार करता. या सर्व मार्गावरील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सुरळीत झाल्यानंतर नागरीकांची वर्दळ व संपूर्ण शहराचा विकास मोठया प्रमाणावर होणार आहे. या बाबी लक्षात घेता नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनाने व गेल्या काही वर्षातल्या अनेक सार्वजनिक व खाजगी इमारतीमधील आगीमुळे झालेल्या दुर्घटनांमुळे अनेक ठिकाणी झालेली जिवित व वित्त हानी यांचा विचार करता पिंपरी चिंचवड शहराचा भविष्यातील विकासाचा वेग पाहता याबाबत सुरक्षा उपाय व खबरदारी घेणे आवश्यक आहे. त्याकरिता बीआरटी कॉरिडॉर व त्याकरिता असलेली फिडर रुट यावरील विकास कामांबाबत खालीलप्रमाणे बीआरटी नियम एन २.५.८ नव्याने समाविष्ट करुन त्याप्रमाणे अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

<u>**नवीन नियम एन - २.५.८**</u> - बीआरटी कॉरिडॉर व सर्व फिडर रस्ते यावर परवानगी दिल्या जाणा-या अग्निशामन सुविधा लागू असणा-या सर्व प्रकारच्या बांधकामांना सुरक्षा उपाय म्हणून महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ व २००९ अन्वये महाराष्ट्र फायर सर्व्हिसेस (महाराष्ट्र शासन) द्वारा

मान्यता प्राप्त अभिकरण त्यामध्ये आगरोधक व आग व्यवस्थापन (**Passive Fire Protection**) दर्जा अ ते ड आणि अग्निप्रतिबंधात्मक प्रणाली **(active Fire Protection)** दर्जा अ व ब आणि वरील वर्गवारी प्रमाणे महानगरपालिका नोंदणी अभिकरण दर्जा अ या वर्गातील मान्यताप्राप्त अभिकरणांना अग्निशमन सेवा व सुविधा देण्याची परवानगी देता येऊ शकेल. वरीलप्रमाणे नवीन नियम तयार करुन जनहितार्थ असल्याने वरील उपसूचनेला मान्यता देण्यात येत आहे. सदर ठराव कायम होणेची वाट न पहाता मा. आयुक्त यांना सूचना/हरकती मागविणे व इतर पुढील कार्यवाही करणेकरीता अधिकार देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच बीआरटी कॉरिडॉरमध्ये असणा-या मिळकती सध्याच्या प्रचलित नियमानुसार गृहीत धरलेल्या **Potential** (दोनपट एफ.एस.आय./ टी.डी.आर.) वापरुन विकसीत करणे अशक्य आहे. बी.आर.टी.रस्त्याचा वापर फक्त १०० मीटर बी.आर.टी.कोरीडॉरमधील रहिवासी न करता संपूर्ण शहरातील रहिवासी व मिळकतधारक करणार आहेत. सद्य स्थितीत मंजूर झालेल्या नियमावलीमुळे बी.आर.टी. कॉरिडॉरमधील मिळकती विकसीत करण्याकरिता अतिशय प्रतिकूल परिस्थिती आहे. बीआरटी ची यशस्वी अंमलबजावणी करणेकरीता, बीआरटी कॉरिडॉरमधील मिळकतधारकांना **Incentive** देऊन त्यांच्याकडून प्रिमियम घेणे अथवा महापालिकेचा लाभ करुन घेणे योग्य होईल. ज्या योजनेचा लाभ शहरातील सर्व मिळकतधारकांना/ रहिवाशांना होणार आहे. अशा योजनेचा भुर्दंड ठराविक लोकांनाच सोसावा लागणे संयुक्तिक होणार नाही व म्हणूनच वाढीव **Potential** च्या बदल्यात प्रिमियम आकारणे. परंतु महापालिकेच्या मिळणा-या निधीवर परिणाम होऊ नये याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. शहरातील सर्व मिळकतधारकांना ४०% टी.डी.आर.वापरण्याकरिता कोणताही प्रिमियम भरावा लागत नाही. असेच तत्व बीआरटी कॉरिडॉरमधील मिळकतींना वापरावे व निधी संकलनासाठी बीआरटी कॉरिडॉरची रुंदी १०० मीटर ऐवजी रस्त्याच्या दुतर्फा २०० मीटर करावी व अशा २०० मीटर अंतरापर्यंतच्या मिळकतींना बी.आर.टी.चे नियम लावावेत व अशा मिळकत धारकांकडून ४०% एफ.एस.आय./टी.डी.आर.वापरणेकरिता कोणत्याही प्रकारचा प्रिमियम आकारु नये व ४०**%** पेक्षा जास्त टी.डी.आर. वापरल्यास प्रिमियम आकारणेस मान्यता देणेत येत आहे**.**

| RULE NO | EXSISTING RULE | PROPOSED RULE | SUGGESTED RULE |
| --- | --- | --- | --- |

| | | | |
|---|---|---|---|
| **N-2.5.2 TDR Utilisation on payment of premium charges** | **TDR generated from any zone, from the sanctioned Development plan of old and extended limit shall be allowed in the BRT corrider on payment of premium charges, which should not be less than those decided vide General Body Resolution No 452,dt.18.09.2008. These Premium charges are to be decided by the Commissioner, PCMC from time to time. Premium shall not be charged for the 0.40 FSI of road widening area of receiving plot.** | **TDR generated from any TDR zone shall be allowed for utilisation in the BRT Corridor on payment of premium charges. The Premium charge shall be the difference of land rate where TDR is to be utilised & from where TDR has been generated as per the prevailing Annual Statement of Rates (ASR) or at the rate of Rs.5000/- per sq m whichever is more. Premium rate = (Land rate as per ASR where TDR to be utilized land rate as per ASR from where TDR generated generated) or Rs. 5000/- per sq.m which ever is more. The minimum rate of premium may be suitably revised as & when required, by the Municipal Commissioner** | **TDR generated from any TDR zone shall be allowed for utilisation in the BRT Corridor on payment of premium charges. The Premium charge shall be the difference of land rate where TDR is to be utilised & from where TDR has been generated as per the prevailing Annual Statement of Rates (ASR) or at the the rate of Rs.5000/- per sq m whichever is more. Premium rate= (Land rate as per ASR where TDR to be utilized – Land rate as per ASR from where TDR generated) or Rs.5000/- per sq. m which ever is more. The minimum rate of premium may be suitably revised as & when required, by the Municipal Commissioner No. Premium to be charged for use of FSI/TDR up to to 40% as** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | **No. Premium shall be chargeable for use of additional FSI permissible as per Rule No. N-2.3.** | **it is being followed elsewhere in the city.** |

बी.आर.टी. कॉरीडॉरचे प्रचलित नियम व प्रस्तावित नियमावली पाहता छोटया मिळकती विकसीत करणे शक्य होणार नाही, ज्याप्रमाणे ले-आऊट मंजूर करणेकरिता मिळकतीचे कमीत कमी क्षेत्र २००० चौ.मी.असावे लागते त्याप्रमाणे बी.आर.टी.कॉरीडोरचे नियम २००० चौ.मी. अथवा २००० चौ.मी. पेक्षा मोठया मिळकतीनाच लावावे व अशा प्रकारच्या छोटया मिळकती आत्ताच्या प्रचलित नियमाप्रमाणेच विकसीत करणेस परवानगी दयावी व बीआरटी कॉरीडोरचा कोणताही लाभ देऊ नये. सदर ठराव कायम होण्याची वाट न पाहता माननीय आयुक्त यांना हरकती सूचना मागविणे व इतर पुढील कार्यवाही करण्याकरिता अधिकार देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अनुकूल -६७ प्रतिकूल -०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.उल्हास शेटटी** - महापौर साहेब, विषय क्रमांक १४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक - १४

दिनांक - २७/६/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/१०/५४८/२०१३, दि.१०/०६/२०१३

२) मा.शहर सुधारणा समिती सभा दि.११/०६/२०१३ ठ.क्र.१५ नुसार

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत टीडीआर इंडेक्सबाबत नियम क्र. एन २.४.५ मध्ये तरतूद करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करण्यास,

फेरबदलाची सुचना प्रसिध्द करुन नागरिकांच्या हरकती/सुचना मागविणे, त्यानुषंगाने सुनावणी घेऊन निर्णय घेणे व तदनंतर फेरबदलाचा प्रस्ताव शासनास मंजूरीसाठी सादर करणे ही सर्व वैधानिक कार्यवाही करण्यास मा.आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मा.महापालिका सभेची मंजूरी आवश्यक असल्याने मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**मा.राजू मिसाळ** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

**मा.योगेश बहल** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो - सन १९९५ साली मंजूर झालेली विकास योजना फक्त १५**%** ते २०**%** इतकीच अंमलात आलेली आहे. आजसुध्दा अनेक आरक्षणे व रस्ते महापालिकेच्या ताब्यात आलेली नाहीत. आरक्षित जमिनीच्या मिळकतधारकांची मानसिकता व त्यांची परिस्थिती समजावून घेणे आवश्यक आहे. आपल्या शेजारील मिळकतधारकांच्या जमिनीची किंमत अथवा त्यातून मिळणारा मोबदला/उत्पन्न याची तुलना केल्यास मोठी विषमता आढळते. अशा परिस्थितीत आरक्षणाच्या जमिनी ताब्यात देण्याची या जमिनमालकांची मानसिकता नसते. भूसंपादनाची क्लिष्ट प्रक्रिया पाहता अशा मिळकती टी.डी.आर. च्या बदल्यात ताब्यात घेणे अधिक सोयीस्कर वाटते. आतापर्यंत ताब्यात आलेल्या बहूतांशी आरक्षित जमिनी या टी.डी.आर. च्या बदल्यात आलेल्या आहेत. परंतु याप्रमाणे जर आपण आरक्षित जमिनींना **Indexing** लावल्या तर या जमिनी फक्त भूसंपादनाने ताब्यात घ्याव्या लागतील व त्याकरिता महापालिकेस मोठया निधीची आवश्यकता भासेल व मोठा कालावधी लागेल. तरी आपण अशा प्रकारचे **Indexing** न करता सरसकट सर्व आरक्षित जमिनीना जमिनी पोटी १.० व **Incentive** म्हणून अतिरिक्त १.० असा दुप्पट टी.डी.आर.दयावा.

सदर ठराव कायम होण्याची वाट न पाहता माननीय आयुक्त यांना हरकती सूचना मागविणे व इतर पुढील कार्यवाही करण्याकरिता अधिकार दयावेत. तसेच १९९५ साली मंजूर झालेल्या महापालिकेच्या जुन्या हददीच्या विकासयोजनेवर निळी व लाल पूररेषा अद्याप मंजूर नाहीत या ठिकाणी प्रपत्रातील रकाना क्र. ६ यामधील तरतूदी न वापरता रकाना क्र.७ मधील तरतूदी वापरणे योग्य होईल.

| | Permissible (Proposed) TDR Index | | Suggested TDR Index | |
|---|---|---|---|---|
| **7** | **Where Flood lines are not shown on Development Plan** | | **Where Flood lines are not shown on Development Plan** | |
| **a)** | **Reserved land falls within distance of** | **0.2 0** | **Reserved land falls within distance of 30 m** | **0.50** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | **30 m form river boundry and falling between Green Belt and No Development Zone.** | | **form river boundry and falling between Green Belt and No Development Zone.** | |
| **b)** | **Reserved land falls outside distance of 30 m form river boundry and falling between No Development Zone.** | **0.5 0** | **Reserved land falls outside distance of 30 m form river boundry and falling between No Development Zone** | **0.50** |
| **c)** | **Reserved land falls within distance of 30 m form river boundry and falling between No Development Zone** | **0.5 0** | **Reserved land falls within distance of 30 m form river boundry and falling between No Development Zone.** | **1.00** |
| **d** | **Reserved land falls outside a distance of 30 m form river boundry and falling between No Development Zone.** | **1.0 0** | **Reserved land falls outside a distance of 30 m form river boundry and falling between No Development Zone.** | **1.00** |

| **Sr.** | **Existing Provision** | **Proposed Provision** | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | N 2.4.5.- The built up area for the purpose of F.S.I. credit in the form of a D.R.C. shall be equal to the Gross area of the resevered plot to be surrendered and will proportionately increase or decrease according to the permissible F.S.I. of the zone where from the T.D.R.has originated. | N 2.4.5. The built up area for the purpose of F.S.I. credit in the form of a D.R.C. shall be equal to the Gross area of the reseverd plot to be surrendered and will proportionately increase or decrease according to the permissible F.S.I of the zone where from the the T.D.R. has originated which is more partculary mentioned in Table No 31<br><br>Table No. 31 | | | | |
| | | Sr. No. | Desription of surrounding land use classification of the reserved land in which it falls | Permissible T.D.R.Index (Proposed | Desription of surrounding land use classification of the reserved land in | Suggested Index |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Index) | which it falls | |
| | | 1 | Reserved land falls in Developable Zones i.e. Residential, Commercial C1/C2, Industrial, public Semi public) as per sanctioned Development plan. | 1.00 | Reserved land falls in Developable Zones i.e. Residential, Commercial C-1/C2, Industrial, Public Semi Public) as per sanctioned Development plan. | 1.00 |
| | | 2 | On one side of the reserved land Developable Zone & on the side there is Green Zone /No Development Zone. | 1.00 | On one side of the reserved land Developable zone & on the side there is Green Zone/No Development Zone. | 1.00 |
| | | 3 | Reserved land within a distance of 100 m form Developable Zone boundary but falling between Green Zone/ No Development Zone. | 1.00 | Reserved land within a distance of 200 m form Developable Zone boundary but falling between Green Zone/ No Development Zone. | 1.00 |
| | | 4 | Reserved land outside a distance of 100 m form Developable Zone boundry but falling between Green Zone /No Development Zone. | 0.50 | Reserved land outside a distance of 200 m form Developable Zone boundry but falling between Green Zone /No Development Zone. | 0.50 |
| | | 5 | Development Zone on two opposite sides of the No Development Zone exists ( Which is land locked between developable Zones) and if distance between this zone is not more than 300 m and reservation is falling between this zone. | 1.00 | Development Zone on two opposite sides of the No Development Zone exists ( Which is land locked between developable Zones) and if distance between this zone is not more than 300 m and reservation is falling between this zone. | 1.00 |
| | | 6 | Where flood lines marked on Development Plan. | | Where flood lines marked on Development Plan. | |
| | | a) | Reserved land from Developable zone but falling between River boundary & Blue Flood | 0.50 | Reserved land from Developable zone but falling between River boundary & Blue Flood Line. | 1.00 |
| | | b) | Reserved land from Green Belt/No Development zone but falling between River | 0.20 | Reserved land from Green Belt/No Development zone but falling between | 0.50 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | boundary & Blue Flood Line. | | River boundary & Blue Flood Line. | |
| | | c) | Reserved land from Residential zone but falling between Blue & Red Flood Line. | 1.00 | Reserved land from Residential zone but falling between Blue & Red Flood Line. | 1.00 |
| | | d) | Reserved land from No Development zone but falling between Blue & Red flood Line. | 0.50 | Reserved land from No Development zone but falling between Blue & Red flood Line. | 0.50 |
| | | 7 | Where flood lines are not shown on Development plan | | Where flood lines are not shown on Development plan | |
| | | a) | Reserved land falls within distance of 30 m form river boundary and falling between Green Belt and No Development zone. | 0.20 | Reserved land falls within distance of 30 m form river boundary and falling between Green Belt and No Development zone. | 0.50 |
| | | b) | Reserved land falls outside distance of 30 m form river boundary and falling between No Development zone. | 0.50 | Reserved land falls outside distance of 30 m form river boundary and falling between No Development zone. | 0.50 |
| | | c) | Reserved land falls within distance of 30 m form river boundary and falling between No Development Zone | 0.50 | Reserved land falls within distance of 30 m form river boundary and falling between No Development Zone. | 1.00 |
| | | d) | Reserved land falls outside a distance of 30 m form river boundary and falling between Development zone. | 1.00 | Reserved land falls outside a distance of 30 m form river boundary and falling between Development zone. | 1.00 |

पाटबंधारे विभाग आपल्यावर जबाबदारी घ्यायला तयार नाही. सभागृहात विषय आला आहे. म्हणून विषय देत असताना डायरेक्ट यांचे म्हणणे दफ्तरी दाखल केले होते. प्रशासनाने कोणतीही कारवाई केली नाही. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या समोर विषय झाल्याप्रमाणे मॉडीफिकेशन करुन मेन्शन करावे असे ठरले असताना ब्लू लाईन लगेच काढून घेता येणार नाही. ती डेव्हलप करावी हा नंतरचा विषय आहे. नदी पात्राला लागून डी.पी. रोड केला तर या पद्धतीने डायरेक्ट ३० मी. पर्यंत ग्रीनबेल्ट सोडला तर, ब्लू लाईन, रेड लाईन पर्यंतच्या उंच बिल्डींगी बांधायला अनुमती द्यावी. स्टॅबिलिटी सर्वे घ्यावा. मनुष्यहानी होणार नाही. पार्कींगमधून पाणी निघून जावे अशी त्या मागची संकल्पना आहे. म्हणून एक्झिस्ट रेशियो न धरता डेव्हलपमेंट रुलप्रमाणे आपण परमिशन द्यावी अशा प्रकारची सूचना आहे.

रेड लाईनची मर्यादा ५०० मी. पर्यंत जोडायची म्हटले तर अधिक पार्कींगची गरज पडेल. भविष्यात पूर आला तर मनुष्य हानी होणार नाही. आर्किटेक्टकडून घेऊन २५ टक्के प्रिमियम रेकनर, † ग्रीमेंट केल्यास जेणेकरुन भविष्यात नदी सुधारणा योजना म्हणतोय. नदी पात्रालगत कॉलेजेस, कंपन्या जवळ असतात. कंपन्या सिशोअरला जवळ असतात. म्हणून महापालिकेला त्यातील प्रिमियम मिळावा. शहर बकाल होणार नाही याची काळजी घ्यावी. मनुष्य हानी होऊ नये म्हणून चांगल्या पद्धतीने उपसूचना केलेली आहे. तशाच पद्धतीने आपण आम्हाला सहकार्य करावे.

**मा.प्रसाद शेटटी** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, खरेतर बीआरटीएसचा विषय हायकोर्टात गेला आहे. माझे म्हणणे डायसवर आपल्याला देते आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, अशा प्रकारचा नियमात फेरबदल करताना विरोधी पक्षाचे म्हणणे सुद्धा ऐकून घ्यावे. ऐकून घ्यायला सुद्धा पैसे पडतात का. विषय क्र. १३साठी लेखी निवेदन देत आहे. सभा कामकाजात माझे म्हणणे समाविष्ट करुन घ्यावे. विषय क्र.१४ मध्ये, खरेतर सभागृहाचे नियम असतात. एखाद्या अधिका-यावर कारवाई होणार असेल, तो अधिकारी सभेत बसला असेलतर त्याला सभागृहाबाहेर जावे लागते. बीआरटीएसमध्ये ज्यांचा इंटरेस्ट आहे तेच याठिकाणी बोलत आहेत. पूररेषेत ज्यांचा इंटरेस्ट आहे तेच प्रश्न मांडत आहेत. हायकोर्टात रिट पिटीशन दाखल केलेतर घेतलेला निर्णय वाया जाऊ शकतो. ज्यावेळी मा.बहल यांचे नाव घेऊन इथे बोलले होते. त्यांचा जीआरसी नंबर इथे ५३९,५५०,५७१,५७२ रद्द करावा म्हणून अडीच वर्षापासून अर्ज केलेला आहे. पूररेषेतील टीडीआर आहे. उपसूचना देऊन हेच लोक यांच्या उपसूचना मंजूर करतात. हा सभा कामकाजाचा नियम होऊ शकत नाही. बीआरटीएसवर काम करायचे नाही. अशा प्रकारचा पर्सनल इंटरेस्ट असलेल्या लोकांना किंवा नगरसेवकांना बोलायला देताय. मा.महापौर मॅडम यांचा अनुभव मोठा राहीला आहे. यांना सभा कामकाजाचे नियम मी काय सांगणार. म्हणजे आम्ही मूर्ख आहोत. जर हे शहाणे आहेत तर यांनी स्वतःहून उपसूचना द्यायला पाहीजेत. स्वतःच्या विषयाला स्वतःच उपसूचना घुसवायच्या. बोपखेलचा विषय देऊन ७/८ महिने झाले. आरक्षण बदलाचा विषय आहे. सर्वे नंबर १ मध्ये यावर आपण काही कारवाई करत नाही. मा.बहल यांचे पत्र आहे, पूररेषेतील दोनही जागा त्यांच्या आहेत. आरक्षणात फेरबदल केल्यानंतर आजही याठिकाणी काहीही कारवाई करत नाही. सभागृहात असले म्हणून त्यांच्यावर कारवाई होणार नाही का. नियमानुसार कारवाई होत नाही तिथे विकास होत नाही. पूररेषेतील आरक्षण आमच्या माथी मारले. यांचेच पत्र होते. फेरबदलाच्या जागा तुम्हाला देऊ. आमच्या जागा पूररेषेत नव्हत्या हे आम्ही माहिती करुन दिले. तिथे बांधकाम करायचे होते. पूररेषेच्या जागा आपण घेतल्या.

आपण त्यात आजसुद्धा काही केलेले नाही. नियम कोणाला आहेत. विषय मंजूर होतात. जे गरीब, गांजलेले आहेत, त्यांना कोणी वाली नाही. त्यांच्यासाठी नियम होतो. जे खूर्चीवर बसलेले आहेत, त्यांच्यासाठी नियम नाहीत. वारंवार तक्रारी करुन सुद्धा आपण कारवाई करत नाही. 4.5 मध्ये जे फेरबदल करण्यात येत होते. चिंचवड गावाच्या पूररेषेतील क्षेत्रात टीडीआर द्यायला मंजूरी दिली होती. त्याचे साक्षीदार तुम्ही आहात. मला माहित नाही. नगररचना विभागाचा नेमका कोणता विषय मंजूर केला. खूप विषय अजेंडावर आणले आहेत म्हणून तो विषय दुर्लक्षित केला. मला माहित नाही. त्याआधी मी तुम्हाला पत्र दिले होते. फोन केला होता. म्हणून ते थांबवलेले होते. त्यांची सुपारी घेतली आहे म्हणून अधिका-यांनी विषय लगेच आणले. ज्या विषयासाठी इतके दिवस आम्ही भांडतोय, इतके वर्षांत विषय येत नाहीत. सभागृहात मुस्क्या दाबणे चालू आहे. म्हणजे विषय लपला जातो अशातला भाग नाही. खरेतर या विषयात आपल्याला विनंती असेल की, ज्या-ज्या लोकांना असा इंटरेस्ट आहे त्यांच्या नावासहित सांगू शकते. त्यांचा डीआरसी माझ्याबरोबर आहे. कोणाचे नाव घेऊन बांधकाम करायचे आहे,उपसूचना सुद्धा सभागृहात दुस-याला वाचायला द्या. ज्याला जसे हवे होते तसे सभागृह वापरायचे. आम्हाला विरोध करायचा अधिकार नाही का? आमचे अधिकार पायदळी तुडवायचे. असा प्रकार सभागृहात चालू द्यायचा नाही. आम्ही निवडून आलो नाहीत का. आत्ताच बीआरटीएस संदर्भात लेखी निवेदन दिलेले आहे. सभा कामकाजात माझे लेखी निवेदन समाविष्ट करुन घेण्यात यावे -

महापालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील टिडीआर इंडेक्सबाबत असलेल्या नियम एन.२.४.५ मध्ये फेरबदल करणेकामी कलम ३७च्या कार्यवाहीबाबतचा प्रस्ताव सभागृहासमोर मांडण्यात आला आहे. सन २०१० मध्ये काही सदस्यांच्या हटटामुळे याच नियमावलीतील फेरबदलाचा प्रस्ताव दप्तरी दाखल केला होता. आता तीन वर्षानंतर सदबुध्दी सुचल्यामुळे हा प्रस्ताव नव्याने मांडण्यात आला आहे. नियमात तरतूद नसतानाही नगररचना विभागाने पुररेषेतील क्षेत्रात तसेच नाविकास क्षेत्रात डी.आर.सी.क ५४९, ५५०, ५७१ व ५७२ द्वारे टीडीआरचे वाटप यापुर्वी केलेले आहे. त्याबाबत लेखी तक्रार देऊन सुध्दा टीडीआर दलालांच्या दबावामुळे कोणतीच कारवाई केली जात नाही. त्यांनी केलेल्या बेकायदेशीर कामांवर पांघरुन घालण्यासाठी एन.२.४.५ मध्ये आता फेरबदल करण्यात येत आहेत. चिंचवड येथील पुररेषेतील क्षेत्राच्या टीडीआरच्या प्रकरणास टीडीआर कमिटीने मंजूरी दिली होती टी.डी.आर.देण्याआधीच याबाबत मी लेखी तक्रार केल्यामुळे सदर प्रकरण स्थगीत करण्यात आले होते. नगररचना विभागाच्या एका बडया अधिका-याने त्या प्रकरणाची सुपारी घेतली होती. मा.आयुक्तांनी प्रकरण स्थगीत केल्याने घेतलेली सुपारी परत करावी लागणार असल्याने आता नियमात बदल करण्याचा खटाटोप त्या अधिका-यांकडून सुरु आहे.

निळया पुररेषा व लाल पुरेरेषेतील क्षेत्रात १ चा टीडीआर देणे प्रस्तावित करण्यात आले आहे. निळया पुररेषा व लाल पुररेषेतील क्षेत्रात विकास करताना लाल पुररेषेच्या पेक्षा ०.५ मी. उंच बांधकाम करावे लागते. अशा ठिकाणी विकसनक्षम आरक्षण विकसीत करताना अतिरिक्त खर्च हा महापालिकेला सोसावा लागणार आहे. त्यामुळे अशा ठिकाणी १ चा टीडीआर देताना महापालिकेवर पडणारा अतिरिक्त खर्च हा संबंधितांकडून वसुल करण्यात यावा. सभागृहासमोर मांडलेल्या प्रस्तावामध्ये अनेक त्रुटी असुन त्या दुरुस्त करणे अत्यंत गरजेचे आहे. तरी सदर प्रस्तावावर सखोल अभ्यास करुन नव्याने प्रस्ताव मांडण्यात यावा.

**मा.श्रीकर परदेशी (**महापालिका आयुक्त**)** – सन्मा.महापौर साहेब, सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, दोन/तीन मुद्यांबाबत स्पष्टीकरण करणे आवश्यक वाटते. सन्मा.सदस्य रामदास बोकड यांच्या वॉर्डात जे आरक्षण पडलेले आहे. त्यात हायटेंशन लाईन करुन विकसकाने बिल्डींग परमिशनसाठी फाईल दाखल केली होती. त्याची फाईल थांबवली आहे. त्यात महापालिकेचे हित जोपर्यंत जोपासले जात नाही, तोपर्यंत परमिशन दिली जाणार नाही. चिंचवड गावात डीआरसी इश्यू केलेला नाही. असे दोन विषय सभागृहात चर्चेत आहेत. डीआरसी प्रिमियम, टीडीआर याबाबत मा.संजय काटे यांनी बरीच पूर्ण तयारी करुन निवेदन केले आहे. वस्तुतः हा हायपोथेटिकल इश्यु आहे. किती प्रिमियम आकारला तर किती फायदा होईल. ४ वर्षापूर्वी ठराव केला होता, टीडीआर अलॉट करावा. ३०००, ६,०००, ९,००० असा हायपोथेटीकल केला होता. त्यावरुन अंदाज बांधला होता. एवढा रेव्हेन्यू मिळेल. तो फॉर्म्युला तेवढा लोकांना मान्य झाला नाही. त्यामुळे तेवढा रेव्हेन्यू मिळाला नाही. म्हणून त्यात फेरबदल प्रस्ताव केला. रेडीरेकनर प्रमाणे टीडीआर घ्यावा. त्यात मध्यंतरी उपसूचना आणली. हायकोर्टाने निर्णय दिला की, असे उपसूचनेद्वारे करता येत नाही. म्हणून हा विषय सभागृहात आणला आहे. एकंदरीत शहराचे उत्पन्न कसे वाढू शकेल त्यासाठी हा विषय घेतला आहे. वॉटर टॅक्स, प्रॉपर्टी टॅक्स बाबतीत दर ठेवले होते. मा.शहर सुधारणा समिती किंवा फलाफला समिती सांगते प्रिमियम किती आकारावा. हा सभागृहाचा अधिकार आहे. जास्तीत जास्त लोकांनी पॉलिसी स्विकारली पाहीजे. शहरात रेव्हेन्यू वाढला पाहीजे. पॉलिसीत सुधारणा करुन आणली आहे. हायकोर्टाचा निर्णय रद्दबादल ठरवला म्हणून पुन्हा प्रस्ताव सादर केलेला आहे. टीडीआरबाबत २ वर्षापूर्वी संचालक, नगररचना यांनी उर्वरीत प्रक्रिया पूर्ण करुन शासनाकडे सादर करावी असे ठरले होते. परंतू त्यावेळी प्रस्ताव दसरी दाखल केला म्हणून कलम ३७ प्रमाणे करावयाच्या प्रक्रियेसाठी केलेला ठराव खंडीत झाला. तोच विषय इथे ठेवला आहे. मा.महापौर यांची परवानगी घेऊन खुलासा करतो की, कन्सल्टंट यांच्यावर EWS बाबतीत कारवाई करावी असा मुद्दा मा.श्रीरंग बारणे यांनी मांडला. संबंधित अधिकारी यांना दीड महिन्यापूर्वी शो कॉज नोटीस दिलेली आहे. कन्सल्टंट, स्थापत्य पॅनलचे आर्किटेक्ट,

लॅण्ड स्केपिंग आर्किटेक्ट, लिगल पॅनेल आर्किटेक्ट यांना ५ ते १० वर्षापूर्वी नेमले गेले आहे. नावासहीत फाईल होती म्हणून मा.स्थायी समितीत मुद्दा मांडला होता. पॅनल रिवाईज करतोय. महापालिका क्वॉलिफिकेशनचे निकष घालून देईल त्याप्रमाणे सर्व कन्सल्टंट रिवाईज केले जातील.

**मा.बाळासाहेब तरस** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मला आयुक्तांकडून खुलासा पाहीजे आहे. विषय क्र.१२ बाबत जुन्या हद्द विकास नकाशासाठी पूररेषा मंजूर विकासाचा महत्वाचा विषय आहे. नवीन समाविष्ट गावांसंदर्भात पूररेषेसंदर्भात काय उपाययोजना करणार आहोत हे आयुक्तांनी थोडक्यात सांगावे. नवीन समाविष्ट गावांत जवळजवळ २०० मी. चे ब्ल्यू लाईन व रेडलाईनचे मार्कींग होते. जुन्या हद्दीत, नवीन समाविष्ट गावांवर अन्याय होईल असे वाटते आहे. १००० मी. मध्ये जास्तीत जास्त २०० मी. ग्रीन झोन, रेड लाईन, ब्ल्यू लाईन, नवीन व जुन्या यात विरोधाभास होतो आहे असे वाटते आहे.

**मा.महापौर** – विषय मंजूर झाला आहे त्यावर आत्ता खुलासा देता येणार नाही.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक -३०९ विषय क्रमांक - १४
दिनांक - २७/६/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/१०/५४८/२०१३, दि.१०/०६/२०१३
२) मा.शहर सुधारणा समिती सभा दि.११/०६/२०१३ ठ.क्र.१५ नुसार

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत टीडीआर इंडेक्सबाबत नियम क्र. एन २.४.५ मध्ये तरतूद करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करण्यास, फेरबदलाची सुचना प्रसिध्द करुन नागरिकांच्या हरकती/सुचना मागविणे, त्यानुषंगाने सुनावणी घेऊन निर्णय घेणे व तदनंतर फेरबदलाचा प्रस्ताव शासनास मंजूरीसाठी सादर करणे ही सर्व वैधानिक कार्यवाही करण्यास मा.आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच सन १९९५ साली मंजूर झालेली विकास योजना फक्त १५**%** ते २०**%** इतकीच अंमलात आलेली आहे. आजसुध्दा अनेक आरक्षणे व रस्ते महापालिकेच्या ताब्यात आलेली नाहीत. आरक्षित जमिनीच्या मिळकतधारकांची मानसिकता व त्यांची परिस्थिती समजावून घेणे आवश्यक आहे. आपल्या शेजारील मिळकतधारकांच्या

जमिनीची किंमत अथवा त्यातून मिळणारा मोबदला/उत्पन्न याची तुलना केल्यास मोठी विषमता आढळते. अशा परिस्थितीत आरक्षणाच्या जमिनी ताब्यात देण्याची या जमिनमालकांची मानसिकता नसते. भूसंपादनाची क्लिष्ट प्रक्रिया पाहता अशा मिळकती टी.डी.आर. च्या बदल्यात ताब्यात घेणे अधिक सोयीस्कर वाटते. आतापर्यंत ताब्यात आलेल्या बहूतांशी आरक्षित जमिनी या टी.डी.आर. च्या बदल्यात आलेल्या आहेत. परंतु याप्रमाणे जर आपण आरक्षित जमिनींना **Indexing** लावल्या तर या जमिनी फक्त भूसंपादनाने ताब्यात घ्याव्या लागतील व त्याकरिता महापालिकेस मोठया निधीची आवश्यकता भासेल व मोठा कालावधी लागेल. तरी आपण अशा प्रकारचे **Indexing** न करता सरसकट सर्व आरक्षित जमिनीना जमिनी पोटी १.० व **Incentive** म्हणून अतिरिक्त १.० असा दुप्पट टी.डी.आर.दयावा. सदर ठराव कायम होण्याची वाट न पाहता माननीय आयुक्त यांना हरकती सूचना मागविणे व इतर पुढील कार्यवाही करण्याकरिता अधिकार दयावेत. तसेच १९९५ साली मंजूर झालेल्या महापालिकेच्या जुन्या हददीच्या विकासयोजनेवर निळी व लाल पूररेषा अद्याप मंजूर नाहीत या ठिकाणी प्रपत्रातील रकाना क्र. ६ यामधील तरतूदी न वापरता रकाना क्र.७ मधील तरतूदी वापरणे योग्य होईल.

| | Permissible (Proposed) TDR Index | | Suggested TDR Index | |
|---|---|---|---|---|
| 7 | Where Flood lines are not shown on Development Plan | | Where Flood lines are not shown on Development Plan | |
| a) | Reserved land falls within distance of 30 m form river boundary and falling between Green Belt and No Development Zone. | 0.20 | Reserved land falls within distance of 30 m form river boundary and falling between Green Belt and No Development Zone. | 0.50 |
| b) | Reserved land falls outside distance of 30 m form river boundary and falling between No Development Zone. | 0.50 | Reserved land falls outside distance of 30 m form river boundary and falling between No Development Zone | 0.50 |
| c) | Reserved land falls within distance of 30 m form river boundary and falling between No Development Zone | 0.50 | Reserved land falls within distance of 30 m form river boundary and falling between No Development Zone. | 1.00 |
| d | Reserved land falls | 1.0 | Reserved land falls | 1.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | **outside a distance of 30 m form river boundary and falling between No Development Zone.** | **0** | **outside a distance of 30 m form river boundary and falling between No Development Zone.** | |

| Sr. | Existing Provision | Proposed Provision | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | N 2.4.5.- The built up area for the purpose of F.S.I. credit in the form of a D.R.C. shall be equal to the Gross area of the reserved plot to be surrendered and will proportionately increase or decrease according to the permissible F.S.I. of the zone where from the T.D.R. has originated. | N 2.4.5. The built up area for the purpose of F.S.I. credit in the form of a D.R.C. shall be equal to the Gross area of the reserved plot to be surrendered and will proportionately increase or decrease according to the permissible F.S.I of the zone where from the the T.D.R. has originated which is more particularly mentioned in Table No 31<br><br>Table No. 31 | | | | |
| | | Sr. No. | Description of surrounding land use classification of the reserved land in which it falls | Permissible T.D.R. Index (Proposed Index) | Description of surrounding land use classification of the reserved land in which it falls | Suggested Index |
| | | 1 | Reserved land falls in Developable Zones i.e. Residential, Commercial C1/C2, Industrial, public Semi public) as per sanctioned Development plan. | 1.00 | Reserved land falls in Developable Zones i.e. Residential, Commercial C-1/C2, Industrial, Public Semi Public) as per sanctioned Development plan. | 1.00 |
| | | 2 | On one side of the reserved land Developable Zone & on the side there is Green Zone /No Development Zone. | 1.00 | On one side of the reserved land Developable zone & on the side there is Green Zone/No Development Zone. | 1.00 |
| | | 3 | Reserved land within a distance of 100 m form Developable Zone boundary but falling between Green Zone/ No Development Zone. | 1.00 | Reserved land within a distance of 200 m form Developable Zone boundary but falling between Green Zone/ No Development Zone. | 1.00 |
| | | 4 | Reserved land outside a distance of 100 m form Developable Zone boundary but falling between Green Zone /No Development Zone. | 0.50 | Reserved land outside a distance of 200 m form Developable Zone boundary but falling between Green Zone /No Development Zone. | 0.50 |
| | | 5 | Development Zone on two opposite sides of the | 1.00 | Development Zone on two opposite | 1.00 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | No Development Zone exists ( Which is land locked between developable Zones) and if distance between this zone is not more than 300 m and reservation is falling between this zone. | | sides of the No Development Zone exists ( Which is land locked between developable Zones) and if distance between this zone is not more than 300 m and reservation is falling between this zone. | |
| | | 6 | Where flood lines marked on Development Plan. | | Where flood lines marked on Development Plan. | |
| | | a) | Reserved land from Developable zone but falling between River boundary & Blue Flood | 0.50 | Reserved land from Developable zone but falling between River boundary & Blue Flood Line. | 1.00 |
| | | b) | Reserved land from Green Belt/No Development zone but falling between River boundary & Blue Flood Line. | 0.20 | Reserved land from Green Belt/No Development zone but falling between River boundary & Blue Flood Line. | 0.50 |
| | | c) | Reserved land from Residential zone but falling between Blue & Red Flood Line. | 1.00 | Reserved land from Residential zone but falling between Blue & Red Flood Line. | 1.00 |
| | | d) | Reserved land from No Development zone but falling between Blue & Red flood Line. | 0.50 | Reserved land from No Development zone but falling between Blue & Red flood Line. | 0.50 |
| | | 7 | Where flood lines are not shown on Development plan | | Where flood lines are not shown on Development plan | |
| | | a) | Reserved land falls within distance of 30 m form river boundary and falling between Green Belt and No Development zone. | 0.20 | Reserved land falls within distance of 30 m form river boundary and falling between Green Belt and No Development zone. | 0.50 |
| | | b) | Reserved land falls outside distance of 30 m form river boundary and falling between No Development zone. | 0.50 | Reserved land falls outside distance of 30 m form river boundary and falling between No Development zone. | 0.50 |
| | | c) | Reserved land falls within distance of 30 m form river boundary and falling between No Development | 0.50 | Reserved land falls within distance of 30 m form river boundary and | 1.00 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | Zone | | falling between No Development Zone. | |
| | | d) | Reserved land falls outside a distance of 30 m form river boundary and falling between Development zone. | 1.00 | Reserved land falls outside a distance of 30 m form river boundary and falling between Development zone. | 1.00 |

अनुकूल -६७ प्रतिकूल -०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.तानाजी खाडे** - महापौर साहेब, विषय क्रमांक १५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक - १५

दिनांक - २७/६/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/१७/७८/२०१३, दि.११/०६/२०१३

२) मा.शहर सुधारणा समिती सभा दि.११/०६/२०१३ ठ.क्र.१६ नुसार

आंध्रा धरणातून घ्यावयाच्या पाण्यासाठी नविन जलशुध्दिकरण केंद्र बांधण्यासाठी चिखली येथील गट क्र. १६५४ पै. मधील आरक्षण क्र. १/८८ – अ ८.०० हेक्टर क्षेत्रासाठी मंजूर विकास योजना प्रस्ताव मनपा उपयोगाचे ऐवजी जलशुध्दीकरण केंद्र (WTP) असे अभिनाम करण्याचा फेरबदल प्रस्ताव मान्य असल्यास मौजे चिखली येथील गट क्र. १६५४ मधील मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्र. १/८८–अ मनपा उपयोग या आरक्षणाच्या एकूण १५.६१ हेक्टर क्षेत्रापैकी सुमारे ८.०० हेक्टर जागा आरक्षण क्र. १/८८ – ड जलशुध्दीकरण केंद्र (WTP) असे अभिनाम बदल करणेसाठी म.प्रा. व न.र. अधि. १९६६ चे कलम ३७ अन्वयेची सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन तसा प्रस्ताव मान्यतेसाठी शासनास पाठविणेत येत आहे.

**मा.अरुण बो-हाडे –** मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.स्वाती साने -** मा.आयुक्त साहेब, मा.महापौर साहेब, चिखली येथील गट क्र.१६५४ला निविदा झाल्यापासून मी व साने काका दोघेही पाठपुरावा करत होतो. या संदर्भात अधिका-यांनी उत्तर दिले, २ एकरसाठी कोर्ट केस आहे. ऑटोक्लस्टर इथे मिटींग झाली, त्यावेळी सुद्धा अधिका-यांनी हेच सांगितले होते. पूर्ण त्या गट क्र. १६५४ वर हा प्रोजेक्ट कसा काय आला. आत्तापर्यंत आम्ही दिलेला प्रोजेक्ट नियमांत अडकून राहीलाय. चिखली

इथे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न खूप खुप बिकट होत चालला आहे. मोठमोठ्या स्किम चालू आहेत. पाण्याच्या टाकीची अवस्था अतिशय वाईट आहे. या प्रोजेक्टला दोन अडीच वर्षे लागणार असतील तर पर्यायी सुविधा करुन द्यावी. या गटामध्ये प्रोजेक्ट करायला आमचा विरोध नाही. त्यांच्याबरोबर आमचा प्रोजेक्ट सुद्धा समाविष्ट करुन घ्यावा, तोपर्यंत हा विषय तहकूब करावा.

**मा.भारती फरांदे –** मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.तानाजी खाडे –** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक -३१० विषय क्रमांक - १५
दिनांक -२७/६/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :१) मा.महापालिका आयुक्त यांचजा.क्र.नरवि/कावि/१७/७८/२०१३,
दि.११/०६/२०१३
२) मा.शहर सुधारणा समिती सभा दि.११/०६/२०१३ ठ.क्र.१६ नुसार

विषय क्रमांक १५ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल -६७ प्रतिकूल -०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.तानाजी खाडे** - महापौर साहेब, विषय क्रमांक १६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक - १६
दिनांक - २७/६/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :१) मा.जितेंद्र ननवरे, मा.तानाजी खाडे यांचा प्रस्ताव -
२) मा.शहर सुधारणा समिती सभा दि.११/०६/२०१३ ठ.क्र.१७ नुसार

मौजे च-होली येथील जुना स.नं. ३४७ व ३५२ नविन स.न. ३१७ व ३१८ ही जमीन पिंपरी चिंचवड महानगरपालिका मंजूर विकास आराखडयामध्ये शेती विभागामध्ये समाविष्ट आहे. सदरची जमीन ही विकास आराखडयामधील रहिवास विभागालगत आहे. च-होली येथील जुना स.नं. ३४७ व ३५२ नविन स.न. ३१७ व ३१८ ही जमीन शेती

विभागामधून रहिवास विभागामध्ये समाविष्ट करण्यासाठी म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्ताव तयार करणेस मान्यता देणेत यावी व यासंबंधीत हरकती/सुचना मागविणे व त्यावर निर्णय घेऊन प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी सादर करणेचे सर्व अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.अरुण बो-हाडे –** मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.नितीन काळजे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, संबंधित विषय माझ्या प्रभागातील आहे. फक्त दोनच सर्वे नंबर आर झोनमध्ये न करता पूर्ण च-होलीतील सर्व ग्रीन झोन आर झोन करावा, तोपर्यंत हा विषय तहकूब ठेवण्यात यावा. मी या विषयाची पूर्ण माहिती घेतलेली आहे. कृपा करुन हा विषय तहकूब करावा अशी विनंती आहे. आम्ही असेच निवडून आलेलो आहोत का, आम्हाला विचारात घेतले जात नाही.

**मा.संदीप चिंचवडे** - महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन देतो.

**मा.महापौर -** विषय क्रमांक १६ तहकूब करणेत येत आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक -३११ विषय क्रमांक - १६
दिनांक -२७/६/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :१) मा.जितेंद्र ननवरे, मा.तानाजी खाडे यांचा प्रस्ताव -
२) मा.शहर सुधारणा समिति सभा दि.११/०६/२०१३ ठ.क्र.१७ नुसार

विषय क्रमांक १६ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल -६७ प्रतिकूल -०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.अरुण बो-हाडे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक - १७
दिनांक - २७/६/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/१/कावि/३०१/२०१३

दि.६/२/२०१३.

२) मा.क्रीडा समिती सभा दिनांक २१/२/२०१३ ठराव क्र.४७.

३) मा.विधी समिती सभा दिनांक १/३/२०१३ रोजी ठराव क्र.१२४

४) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.३०६९ दिनांक १२/३/२०१३

५) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/१/कावि/६१५/१३ दि.१९/३/२०१३

६) मा.महापालिका सभा ठराव क्र.२९१ दि.२०/५/२०१३

प्रस्तावात सविस्तर क्रिडा धोरण मसुदा परिशिष्ट-अ, क्रिडा धोरण मसुदा परिशिष्ट-ब, क्रिडा धोरण मसुदा परिशिष्ट-क, क्रिडा धोरण मसुदा परिशिष्ट-ड, मध्ये नमुद केलेप्रमाणे मनपा क्रिडा धोरण मसुद्यास तसेच ३ डिसेंबर अपंग दिनानिमित्त अंध, अपंग, व मतिमंद विद्यार्थ्यांच्या क्रीडा स्पर्धा आयोजित करणेकामी परिशिष्ट अ/ब मध्ये नमूद तपशिलाचा मूळ धोरण मसुद्यात समावेश करुन परिपूर्ण क्रीडा धोरण मसुद्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.तानाजी खाड़े** - महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

**मा.रामदास बोकड** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, क्रिडा धोरणासंदर्भात हा विषय गेल्या २ मिटींगमध्ये सभागृहात आला आहे. परंतू याठिकाणी आयुक्त साहेबांना विनंती करायची आहे, असे दत्तक योजनेचा विषय सभागृहात आला. आम्ही या विषयाला मान्यता दिली. परंतू वर्षभर क्रिडा समितीत काम केल्यानंतर मी हा विषय अडवायचा प्रयत्न केला. खेळाडूंना पन्नास रुपये भत्ता द्यायचे ठरले. पत्रकार परिषद घेऊन मा.महापौर यांनी हे अमान्य केले व २०० रुपये भत्ता देण्याचे जाहीर केले गेले. गेले ३ महिने खेळाडूंना भत्ता दिलेला नाही हे सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो. सभागृहापुढे दत्तक योजना ठेवली व मंजूर केली. त्याचा अभ्यास अधिका-यांनी, क्रिडा सहा. आयुक्तांनी केला नाही. दत्तक योजनेचे ८३ खेळाडू आहेत. एका खेळाडूला रु.६,००० मानधन. खेळाचे किटस् व अनुदान यांचा विचार केलातर एक खेळाडूला ७५,००० खर्च येतो. दत्तक योजनेसाठी बजेटमध्ये २० लाखांची तरतूद केलेली आहे. माझी सभागृहाला विनंती आहे की, दत्तक योजनेसाठी जे २० लाखांचे बजेट आहे. ते ५० ते ६० लाखांचे बजेट करावे. दरमहा २०० रुपये देण्यात यावेत. महापौरांनी जाहीर केलेला भत्ता लवकरात लवकर देण्यात यावा. दुरुस्तीनंतर क्रिडा धोरण सभागृहापुढे मंजूर करावे. तोपर्यंत क्रिडा धोरणाचा विषय तहकूब ठेवावा अशी आयुक्त साहेबांना विनंती करतो.

**मा.तानाजी खाडे** – मा.महापौर साहेब,सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.शमीमताई पठाण**- मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, क्रिडा धोरणाचा विषय याठिकाणी सादर केलेला आहे. सगळीकडे शासन व आपणही या धोरणाद्वारे खेळाडूंना सहकार्य करतोय, प्रोत्साहन देतोय. ५ वर्षे झाली. माझ्या वॉर्डात एकच क्रिडांगण उपलब्ध आहे. ५ वर्षांपूर्वी तिथे झोपडपट्टी पुनर्वसनासाठी पत्राशेड बांधलेल्या होत्या. याठिकाणी प्रभागात मुलांना खेळायला दुसरी कुठलीही जागा नाही. मोठमोठे गृहप्रकल्प उभे राहीले आहेत. मुलांवर अन्याय होतो आहे. क्रिडा धोरण राबवतोय. माझ्या वॉर्डात कुठेही क्रिडांगण नाही. हा विरोधाभास नाही का? त्याठिकाणी पत्रा शेड हलवाव्यात व मुलांना न्याय द्यावा अशी विनंती करते.

**मा.महापौर** ***:-*** विषय क्रमांक १७ तहकूब करणेत येत आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक -३१२ विषय क्रमांक - १७
दिनांक -२७/६/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/१/कावि/३०१/२०१३ दि.६/२/२०१३.
२) मा.क्रीडा समिती सभा दिनांक २१/२/२०१३ ठराव क्र.४७.
३) मा.विधी समिती सभा दिनांक १/३/२०१३ रोजी ठराव क्र.१२४
४) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.३०६९ दिनांक १२/३/२०१३
५) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/१/कावि/६१५/१३ दि.१९/३/२०१३
६) मा.महापालिका सभा ठराव क्र.२९१ दि.२०/५/२०१३

विषय क्रमांक १७ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल -६७ प्रतिकूल -०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे** - महापौर साहेब, विषय क्रमांक १८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -३१३ विषय क्रमांक - १८
दिनांक - २७/६/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पापु/जनि/Shi/४१/२०१३,

दि.१६/५/२०१३

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा च-होली येथील मैलाशुध्दीकरण प्रकल्प डिसेंबर १२ पासून कार्यान्वित झालेला आहे. त्यामुळे आळंदी नगरपरिषदेच्या हद्दीतील त्यांचे भागातील नैसर्गिक उतारानुसार येणा-या ड्रेनेजलाइन्स जोडणेस परवानगी देता येणे शक्य आहे. त्यामुळे इंद्रायणी नदीचे होणारे प्रदुषण रोखण्यास, पर्यावरणाचा समतोल राखण्यास व त्या भागातील सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न सुटण्यास मदत होणार असल्याने आळंदी नगरपरिषद हद्दीतील ड्रेनेज लाईन्स म.न.पा.च्या मुख्य ड्रेनेज लाईनला जोडणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.अरुणा भालेकर** - महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

**मा.श्रीरंग बारणे** – मा.महापौर साहेब, आयुक्त साहेबांनी हा विषय ठेवलेला आहे. आळंदी नगरपरिषदेच्या हद्दीतील नैसर्गिक उतारानुसार येणा-या ड्रेनेज लाईन्स जोडण्याचा विषय आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या हद्दीत जी अनधिकृत बांधकामे झाली, त्यांचे ड्रेनेज लाईन्स जोडण्याचे काम करताय. परंतू आळंदी नगरपरिषदेच्या हद्दीतील जी बांधकामे आहेत, ती अधिकृत का अनधिकृत आहेत हे सुद्धा सभागृहाला सांगायला पाहीजे. बरीचशी बांधकामे अनधिकृत आहेत. एकीकडे पिंपरी चिंचवडमधील करदाते प्रामाणिकपणे कर भरतात. त्यांना एक न्याय व हद्दीबाहेरील लोकांना वेगळा न्याय. केवळ इंद्रायणी नदीत प्रदूषण होते, हा मुद्दा पकडून चुकीच्या पद्धतीने कामे होत असतील तर त्याला माझा विरोध आहे. ज्या ड्रेनेज लाईन्स जोडल्या जातील ते बांधकाम अधिकृत का अनधिकृत हे सुद्धा सभागृहाला सांगितले पाहीजे. हद्दीबाहेरील मैला वाहून नेण्याचे काम आपण करताय याची कल्पना सभागृहाला द्यावी. विषयाच्या अनुषंगाने सर्व माहिती सभागृहाला सांगावी. बांधकामे मंजूर आहेत का अनधिकृत हे सुद्धा सभागृहाला सांगावे.

**मा.प्रशांत शितोळे –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,खरेतर आपल्याकडे मुळात २५० ते २७५ एम.एल.डी.चे प्लॅन्ट आहेत. आपण प्लॅन्ट आपल्यासाठी बांधलेले आहेत. आळंदी नगरपरिषदेसारख्या छोट्या नगरीत अर्धी नदी प्रदूषित होत असेल, तेथे नैसर्गिक अडचणी असतील तर अशा प्रकारची सुविधा त्यांना दिली पाहीजे. काल सुद्धा तुम्ही डीपीडीसीमध्ये असताना सांगितले, २१० एमएलडी इनटेक आमचा आहे. २०० एमएलडी कपॅसिटी असताना शंभर टक्के कपॅसिटी दुस-याच्या हद्दीत घेऊन आपल्याला करायचा नाही. अधिकृत का अनधिकृत बांधकामांना कनेक्शन जोडणार. ड्रेनेज लाईनचे कनेक्शनला कोण जबाबदार आहे. रुपया रुपयाचा विचार करतोय. विरोधाभास सांगतोय. इथे शंभर टक्के ड्रेनेज लाईनला कनेक्टीव्हीटी आहेत. फ्लो आहे तिथे मेंटेनन्स करतो का. नदी कडेचे चेंबर मध्ये जाऊन बघा. डुकरे असतात. सगळे पाणी त्यात जाते. कित्येक चेंबरला आजही प्लास्टर केलेले

नाही. हे कोण बघणार. १५ वर्षांपूर्वी काम झाले आहे. ठेकेदाराचे बील शंभर टक्के दिलेले आहे. केवळ आतून मुलामा दिलेला आहे. अशा प्रकारे कामे होणार असतील तर एखाद्या धार्मिक स्थळाला चांगल्या सुविधा देण्याचा आपला प्रयत्न असेल तर अशी सुविधा द्यायला आपण निश्चित नाही म्हणणार नाही. मूळात अस्तित्वात असणा-या अडचणी लक्षात घेऊन यांना बरोबर घेणार असाल तर आपण आपल्या अडचणी का वाढवायच्या. तुमच्याकडून कॉन्ट्रॅक्टरवर कारवाई करा म्हणून विभागाला आदेश दिले. ड्रेनेड क्लिन करत नाही म्हणून मी फोन केला. १ कोटी खर्च झाला. चेंबर साफ होणार नाही का. निविदा प्रक्रिया शॉर्ट टर्म करावी. अत्यावश्यक सेवांना कुठेतरी मुभा दिली पाहीजे. ड्रेनेज चेंबर लिकेज होत नाही. लिक होते. लोकांच्या संपवेलमध्ये ड्रेनेजचे पाणी जाऊन रोगराई पसरेल. मुलांना, बायाबापड्यांना काही झालेतर, त्यातून आरोग्याचा प्रश्न उद्बवत असेल तर संबंधितांबर कारवाई व्हायला पाहीजे. तुम्ही कार्यवाहीत फास्ट व्हा. आम्हाला कोणाला धडा शिकवायचा नाही. आपले काम, आपली जबाबदारी व्यवस्थित पार पाडावी. या विषयाच्या अनुषंगाने अडचणी सुटतील. चांगल्या पद्धतीने, चांगल्या दर्जाचे काम व्हावे. आमची सुद्धा इच्छा आहे, चांगल्या दर्जाचे ठेकेदार आले पाहीजेत. फ्रि कॉंपिटीशन असेल तर शॉप † क्ट लागू करा. ज्या लोकांना याबाबतीत काम केले त्यांना मर्यादा ठेवल्या पाहीजेत. शाळांच्या साफसफाईच्या टेंडरसाठी ५० ठेकेदार आले. सांगायचे तात्पर्य हेच की, कॉम्पिटीशनमध्ये एकमेकांशी कॉम्पेटीटीव्ह ठरतील असेच स्पर्धक आले पाहीजेत. कोणाची स्पर्धा कोणाबरोबर करायची ठरले तर अवघड आहे. या गोष्टी या निमित्ताने लक्षात घ्या. अतिशय जबाबदारीचा विभाग आहे. आळंदी नगरपरिषदेला पाणी दिल्यानंतर इन्स्पेक्शन पार्टी म्हणून आपली सुद्धा जबाबदारी वाढणार आहे. ही जबाबदारी घ्यायला आपले लोक तयार आहेत का. त्यांच्याकडून अडचणी आल्यातर आम्हाला पहावे लागेल. आपल्यामुळे त्यांच्याकडे प्रदूषण राहणार नाही. त्यांच्याकडे आपल्यामुळे प्रदूषण येणार नाही हे पाहिले पाहिजे. दोन/तीन गोष्टी या विषयाच्या अनुषंगाने सांगितल्या. त्यात आयुक्त साहेबांनी लक्ष घालावे व या विषयाला मंजुरी द्यावी असे सांगतो.

**मा.शारदा बाबर** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, इंद्रायणी नदीच्या शुद्धीकरणाचा विषय पहिल्यांदा आला आहे. त्याचे स्वागत करते. हा सर्वांच्याच जिव्हाळ्याचा विषय आहे. इंद्रायणी नदीचे शुद्धीकरण झाले नाहीतर उद्या गंगा, यमुना नद्यांसारखी अवस्था होऊ शकते. आपला च-होली येथील मैलाशुद्धीकरण प्रकल्प किती क्षमतेचा आहे. आळंदी इथून इंद्रायणी नदीतील किती मैला शुद्धीकरणासाठी घेणार आहोत. इंद्रायणी नदीत मैलाशुद्धीकरण न करता किती जातो याची मला माहिती पाहिजे. आजरोजी आपल्या प्रकल्पात किती मैला शुद्धीकरण होते. आपल्या प्रकल्पाची एवढी क्षमता आहे का. आळंदी इथून किती एम.एल.डी. येणार आहे त्याची माहिती हवी आहे. आपली तेवढी क्षमता आहे का. शुद्धीकरण न करता इंद्रायणी

नदीमध्ये किती मैला जातो हे माहिती पाहीजे. नाहीतर उपकार केले आणि वाया गेले असे व्हायला नको.

**मा.सुलभा ऊबाळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, इथे आळंदी नगरपरिषदेचे अध्यक्ष, त्यांची सर्व ज्येष्ठ मंडळी, खासदार यांच्या समवेत आपल्याला भेटायला आले होते. आपल्याकडून त्यांना काय त्रास होतो. तळवडेपासून इंद्रायणी आपल्या हद्दीत आली आहे. आपल्याकडून नदीत ड्रेनेजचे पाणी सोडले जाते. पिण्याच्या पाण्याची अडचण झाली आहे. हे पाणी पिऊ शकत नाहीत. बरीच वर्षे सभागृहात विषय आला, तो तहकूब झाला. आपण थांबवू शकलो नाही. आयुक्तांनी शिफारस करुन सुद्धा ती सुविधा देऊ शकलो नाही. पालखीच्या वेळी तात्पुरते पाणी देतो. ड्रेनेजची व्यवस्था करुन देतोय. याला पूतना मावशीचे प्रेम म्हणायचे का याबद्दल शंका वाटते. मैला शुद्धीकरण प्रकल्पाची कपॅसिटी पाहता पूर्णपणे मैला शुद्ध होत नाही. त्यात येणारा मैला जोडून घेऊन आपल्याला शिक्षा करतोय का. पूर्ण क्षमतेने काम चालले आहे का? यामागे दुसरा हेतू आहे. केलेल्या कामाचे निश्चित कौतुक करु. त्यांनी बाकी अडचणी सांगितल्या होत्या की, डुडुळगावात खड्ड्यात रस्ता आहे. तिथे चांगले रस्ते पाहिजेत. मा.विनय गायकवाड यांनी याबद्दल वारंवार सांगितले होते. या गोष्टींकडे लक्ष द्यावे. तळवडेपासून किती इनटेक देतोय, त्याची सिच्युएशन सांगा.

**मा.अंबादास चव्हाण** (सहशहर अभियंता,पाणीपुरवठा) – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, जेएनएनयूआरएममध्ये तळवडे पासून चिखली, च-होली पर्यंत १८ मी.ची लाईन टाकायचे काम केले आहे. आपल्या हद्दीतून जवळजवळ ७०० स्क्वे. फूट जागा संपादन करावी लागणार आहे. यासाठी ६ कोटी खर्च करावा लागला असता. ५५,०००/- प्रति महिना खर्च करावा लागला असता. याप्रमाणे भविष्यात सुमारे २ कोटी ६० लाख प्रति महिना महापालिकेवर बोजा पडतो आहे. म्हणून त्यांच्या हद्दीतून नळ जोडायला मा.महापालिका सभेत मान्यता दिली, त्याप्रमाणे लाईन टाकली आहे. काळे कॉलनी, साखरे मठ या एरियातून ट्रीट करायची विनंती केली. त्या बेसिसवर परमिशन दिलेली आहे. त्यांचे १ एम.एल.डी. पाणी यात येते आहे. तेवढे ट्रीट करतोय. च-होली मैलाशुद्धीकरणाची क्षमता २१ एलएलडी आहे. भविष्यात ४ एलएलडी पर्यंत पाणी ट्रीटमेंटसाठी येणार आहे. अधिकृत बांधकामांनाच ही लाईन वापरायची परमिशन देणार आहोत.

**मा.अजित गव्हाणे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,याठिकाणी आळंदी नगरपरिषदेचे ड्रेनेजचे पाणी शुद्धीकरणाचा विषय आला आहे. मा.चव्हाण साहेबांनी खुलासा करताना सांगितले की, १ एलएलडी पाणी ट्रीट करणार आहोत. याअनुषंगाने मा.सुलभाताईंनी विषय मांडला आहे. तळवडेपासून च-होलीपर्यंत आपण च-होली इथे ट्रीटमेंट प्लॅन्ट उभा केलेला

आहे. या परिसराचा विचार करत असताना आपल्या लक्षात आले की, भविष्यात मोठ्या प्रमाणात डेव्हलपमेंट होणार आहे. त्या दृष्टीकोणातून कामकाज चालू आहे. ते करत असताना माझ्या माहितीप्रमाणे च-होली एसटीपी प्लॅन्टचे ५ ते ६ वर्षापूर्वी टेंडर निघाले होते. प्रत्यक्षात आपण पूर्ण क्षमतेने आजही केलेले आहे. फक्त २१ एमएलडी पूर्ण केलेले आहे. जेएनएनयूआरएमचा फंड आलातर काम करु अशा प्रकारची माहिती मिटींगमध्ये दिलेली आहे. याअनुषंगाने यानिमित्ताने विचारायचे आहे की, जेएनएनयूआरएमचा फंड नेमका कधी मिळणार आहे. प्रत्यक्षात कधी काम सुरु होणार आहे. भविष्याचा विचार करता पूर्ण क्षमतेने एसटीपी प्लान्ट सुरु करणे गरजेचे आहे. शहराचा बारीक विचार केलातर मतदार संघाप्रमाणे शहराची डेव्हलपमेंट होते. पिंपरी मतदार संघाचा अभ्यास केला तर तो मतदार संघ कंजेस्टेड आहे. भोसरी हा नव्याने विकसित भाग आहे. इथे भविष्यकाळात मोठ-मोठ्या इमारती होणार आहेत. शहरात अधिकृत डेव्हलपमेंट व्हावी ही अपेक्षा पूर्ण व्हायची असेलतर पूर्ण क्षमतेने च-होलीचा एसटीपी प्लान्ट सुरु करणे गरजेचे आहे. आपल्या ड्रेनेज सिस्टीममुळे इंद्रायणी नदी अनेक वर्षांपासून प्रदूषित होते आहे. अशाप्रकारे आळंदी नगरपरिषदेतील भाविकांना अनेक वर्षांपासून प्रदूषित पाणी गेलेले आहे. ही पवित्र नदी पिंपरी चिंचवड शहरातील घाण पाण्याने प्रदूषित होते आहे. ती प्रदूषणापासून मुक्त व्हावी अशी भावना सर्वांनी व्यक्त केली आहे. त्याअनुषंगाने पूर्ण क्षमतेने एसटीपी प्लान्ट सुरु करावा. अनधिकृत बांधकामांना या लाईन्स जोडणार का हा वेगळा भाग आहे. यानिमित्ताने आयुक्त साहेबांनी तशाप्रकारची सूचना करावी. जेएनएनयूआरएमचे फंड मिळणार नसतील तर महापालिका फंडातून अर्धवट अवस्थेतील च-होली एसटीपी प्लान्ट पूर्ण करावा अशी अपेक्षा आहे.

**मा.नितीन काळजे**– मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आत्ता विषयावर चर्चा चालू आहे. पण ऑलरेडी एक वर्षापूर्वीच त्यांनी या लाईन्स जोडलेल्या आहेत. या भागानुसार उतार आपल्याकडे येतो. काळे कॉलनी इथून आपल्या लाईन्स गेलेल्या आहेत. तिथे भारत पाकीस्तान असा वाद चालू असतो. आळंदी नगरपरिषद त्यांच्यावर अजिबात खर्च करत नाही. त्यांना रस्त्यावर आणून सोडले आहे. आपण सर्व खर्च त्यांना करायला सांगावा. पाणी आळंदी नगरपरिषदेकडून दिले पाहिजे. देहूगावातील सगळे भाविक आपलेच पाणी पीत आहेत. यात लक्ष दिलेतर अतिउत्तम होईल. आळंदी नगरपरिषदेतील लोक, चोविसावाडी, वडमुखवाडी येथील लोकांना अंत्यविधीसाठी आळंदी क्रॉस करुन पलिकडे जावे लागते. आपल्या भागात स्मशानभूमी नाही. घाणीमुळे तेथील वातावरण खराब आहे त्यामुळे तिथे जावेसे वाटत नाही. आपण त्यांच्याकडून काम करतोय. अलिकडील भागात स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करुन मिळावी. हा प्रश्न मार्गी लावावा. कमीत कमी १५ वर्षांपासून हा विषय चालू आहे. नवीन गावे महापालिका हद्दीत समाविष्ट झाल्यानंतर महापालिकेकडून

स्मशानभूमीसाठी निधी टाकला आहे. सध्या एवढ्या अडचणी आहेत. आळंदी इथे जाऊन अंत्यविधी करावे लागत आहेत. आपल्या भागात स्मशानभूमीचे काम व्हावे अशी विनंती करतो.

**मा.प्रसाद शेट्टी** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, माझी विनंती आहे की, पिंपरी चिंचवडमध्ये ड्रेनेज लाईनची सगळ्यात जास्त समस्या आहे. चिंचवड स्टेशनमध्ये आपण कॉन्ट्रॅक्ट दिलेले आहे. ड्रेनेज साफ करायचे कॉन्ट्रॅक्ट फक्त ५ लाखांचे दिलेले आहे. ५ मुलांना ५ प्रभागांत काम करावे लागते. चिंचवड स्टेशन, आनंदनगर, इंद्रायणीनगर, काळभोरनगर, शाहूनगर, विद्यानगर असा प्रभाग आहे. ५ मुलांना पेट्रोल अलाऊंस नाही. शाहू नगरमध्ये कंम्प्लेण्ट आलीतर तो चिंचवडे स्टेशनचे काम सोडून तिथे पळत असतो. त्याच्याकडे गाडी नाही. त्याचे पेमेण्ट फक्त ६ ते ७ हजार इतके आहे. ठेकेदाराबरोबर काय † ग्रीमेंट केली माहिती नाही. पावसाळा सुरु झाला तसा प्रत्येक ड्रेनेजच्या चोकअपमुळे गेले १ महिन्यापासून दुषित पाणी येते आहे. वारंवार तक्रारी केलेल्या आहेत. पावसाळा असल्यामुळे पाणीपुरवठ्याच्या लोकांना घाण पाणी कुठून येते हे आजपर्यंत कळालेले नाही. अर्धी पाण्याची लाईन, ड्रेनेज लाईन मधून गेलेली आहे. स्वतःचे घर नीट नाही आणि दुस-याचे घर नीट करायला चाललो आहोत.

**मा.श्रीकर परदेशी** (महापालिका आयुक्त) – मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सदस्य, च-होली येथील शुद्धीकरण प्रकल्पाकरीता नदी अलिकडील नागरिकांना ड्रेनेज पाईपलाईन कनेक्शन देण्याबाबतचा हा विषय आहे. ही पाईपलाईन मुळात त्यांच्या हद्दीतून गेलेली आहे. गेली नसती तर भांडवली खर्च व नंतर येणार देखभाल दुरुस्ती खर्च सुद्धा मोठ्या प्रमाणात आला असता. त्याचसाठी चर्चा झाली होती. तुमची सुद्धा यंत्रणा त्यात जोडून देत आहोत. आपले पाणी जिथे मिसळत आहे तिथे आळंदी सारखे तिर्थक्षेत्रात ते पाणी जमा होते आहे. मानवतेच्या दृष्टीकोणातून हे करणे योग्य आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळ याचा विचार करते. पवना नदी, इंद्रायणी, मुळा नदी यांचे शुद्धीकरण करणे कायदेशीररित्या बंधनकारक आहे. ड्रेनेज लाईन जोडून देऊन करणे योग्य आहे असे माझे म्हणणे आहे. हे टेक्निकली शक्य आहे. २० एमएलडी ते ६० एमएलडी इतके जमा होते. सध्या १ एलएलडी ट्रीट करु शकतो. सेक्शन ८० नुसार, महापालिका हद्दीबाहेरील खर्च करायचा ठराव करु शकतो. मा.अजित गव्हाणे यांनी मुद्दा मांडला की, भविष्यातील मुद्दा लक्षात घेता ६० एमएलडी पाणी जमा होते. मोशी इथे आंतरराष्ट्रीय कन्व्हेन्शन सेंटर सुरु होते आहे. त्याभागातील विकास लक्षात घेता, लोकसंख्यावाढ अपेक्षित आहे हे लक्षात घेता जेएनएनयूआरएम अंतर्गत † डीशनल डीपीआर सादर केलेला आहे. अजून २० एमएलडी प्रस्तावित केलेला आहे. २०१६-१७ पर्यंत अन्य २० एमएलडी प्रकल्प तयार होऊ शकतो. तशी अडचण येणार नाही. अधिकृत/अनधिकृत

बांधकामांचा विचार करता निश्चितपणे आपल्या हद्दीत हा भाग येत नाही. पूर्ण पुणे व पिंपरी चिंचवड शहराच्या परिसरातील अनधिकृत बांधकामांसंदर्भात मा.उच्च न्यायालय यांनी मा.जिल्हाधिकारी यांना निर्देश दिलेले आहेत. पिंपरी चिंचवड मधील धोरण अंगिकारले असून थेट पद्धतीने संरक्षण द्यायचे नाही. आयुक्त कार्यालयांकडून जिल्हाधिका-यांना कळवले जाईल. कनेक्शन देत असताना जे धोरण स्विकारले, त्याच पद्धतीने नवीन अनधिकृत बांधकामांना त्यांनी देऊ नये. त्याप्रमाणे त्यांना मॉनिटरींग करण्यासाठी कळवण्यात येईल.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल -६७ प्रतिकूल -०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.भारती फरांदे** –मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक - १९

दिनांक - २७/६/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/क.मु./१७/२०१३,
दि.०५/०६/२०१३

भोसरी स.नं.१ येथील आरक्षण क्र.४३१ मध्ये अद्ययावत रुग्णालय व वाचनालय बांधणेकामी येणा-या र.रु.१९,४५,००,०००/-(अक्षरी र.रु.एकोणीस कोटी पंचेचाळीस लाख फक्त) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणे व त्याप्रमाणे काम करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

**मा.अरुणा भालेकर**–मा.महापौर साहेब,सदर विषय तहकूब करणेत यावा अशी सूचना मांडतो.

**मा.स्वाती साने** – मा.महापौर साहेब,सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रमांक १९ तहकूब करणेत येत आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक-३१४ विषय क्रमांक - १९
दिनांक -२७/६/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/क.मु./१७/२०१३,
दि.०५/०६/२०१३

विषय क्रमांक १९ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल -६७ प्रतिकूल -०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -३१५ विषय क्रमांक - २०
दिनांक - २७/६/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/क.मु./१८/२०१३,दि.०५/०६/२०१३

मनपा हद्दीमधील पुणे आळंदी रस्त्यालगत स.नं.७८ येथे संत ज्ञानेश्वर महाराज व संत नामदेव महाराज यांचे भेटीचे समुह शिल्प उभारणेकामी येणा-या र.रु.६,१६,००,०००/- (अक्षरी र.रु.सहा कोटी सोळा लाख फक्त) चे पुर्वगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.स्वाती साने** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

**मा.श्रीरंग बारणे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, हा विषय मंजूर करत असताना जवळपास ६ कोटी १६ लाख खर्चाला मंजुरी देतोय. यासाठी समारंभदेखील झाला आहे. ५० लाखांची तरतूद असताना ६ कोटी १६ लाखांना मंजूरी घेतोय. विषयाला विरोध नाही. आपल्याकडून माहिती पाहिजे. ६ कोटी १६ लाखांची निविदा काढत असताना आपण ही तरतूद कुठून वर्ग करणार आहोत. निविदा प्रक्रियेसाठी काय नियोजन केलेले आहे याचा देखील खुलासा करावा.

**मा.सुलभा ऊबाळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आत्ताच मा.आप्पा बारणे यांनी सांगितले, बजेटमध्ये तरतूद कमी आहे. याची निविदा काढण्यात आलेली आहे का याची माहिती द्यावी. निविदा काढली असेल तर किती निविदा वर्ग करण्यात आलेली आहे. खर्च कुठे तरी थांबणार आहे का पुढे सुद्धा वाढणार आहे याची शाश्वती द्यावी.

**मा.कांबळे** (शहर अभियंता) – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आत्ता प्रशासकीय मान्यतेसाठी विषय आला आहे. त्याची निविदा आपण मान्यता मिळाल्यानंतर काढणार होतो. तरतूद म्हणून अन्य प्रभागांतून वर्गीकरण करुन करणार आहोत. या कामासाठी एवढा खर्च १ वर्षात होणार आहे. त्यामुळे राहिलेला खर्च पुढील वर्षातील खर्चातून केला जाईल. निविदा प्रक्रिया करुन होणार आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल -६७ प्रतिकूल -०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.स्वाती साने** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २१ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -३१६ विषय क्रमांक - २१

दिनांक - २७/६/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/क.मु./१९/२०१३,दि.०५/०६/२०१३

लांडेवाडी येथील नाशिक महामार्गालगत प्रवेशद्वार (कमान) उभारणेकामी येणा-या र.रु.१,३३,३०,०००/-(अक्षरी र.रु.एक कोटी तेहतीस लाख तीस हजार फक्त) चे पुर्वगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे** - महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

**मा.सुलभा ऊबाळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते –

प्रभाग क्र.५ (टाळगांव) चिखली येथे स्वागत कमान उभारावी त्यासाठी येणा-या प्रशासकीय खर्चास मान्यता देण्यात यावी.

**मा.अश्विनी चिंचवडे** – मा.महापौर साहेब, सदर उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.स्वाती साने** – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक -३१६ विषय क्रमांक - २१

दिनांक - २७/६/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/क.मु./१९/२०१३,दि.०५/०६/२०१३

लांडेवाडी येथील नाशिक महामार्गालगत प्रवेशद्वार (कमान) उभारणेकामी येणा-या र.रु.१,३३,३०,०००/- (अक्षरी र.रु.एक कोटी तेहतीस लाख तीस हजार फक्त) चे पुर्वगणनापत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र.५ (टाळगांव) चिखली येथे स्वागत कमान उभारावी त्यासाठी येणा-या प्रशासकीय खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

अनुकूल -६७ प्रतिकूल -०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.महापौर** – सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करणेत येत आहे.

(मोहिनीताई विलास लांडे)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक – नस/४/कावि/७३४/१३
दिनांक – ०६/०८/२०१३

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.